साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ......... ०१ ०६
दुसरे खेपेस ......... ०१

Six monthly ......... 3 ...... ,, ..., 8 as
Single copy......................... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY AUGUST 3 1896 — NO 30

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख ३ माहे आगस्ट सन १८९६ इ० — अंक ३०

## जाहिरात.

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मार्गे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

### नोटीस

लक्षुमी मर्द किसन वठीण राहणार नागद तालुके बाळापूर जिल्हे अकोलें इस नोटीस देणार किसन वल्लद येडू वठी राहणार मौजे पिलकवडी तालुक अकोट जिल्हा अकोलें. नोटीशीनें असें कळवितों कीं तूं माझी लग्नाची वायको आहेस तूं आज अदमासें आठ महिने झाले तूं आपल्या मायच्या येथें राहण्यास गेलीस मी तुजला घेण्या करितां तीन चार वेळ आलें परंतु तूं आपले मायचें घर सोडून आपले घरी येत नाहींस व एक महिना होत आला मी मांजरीचा वठी किसन व चांदूरचा वठी रामजी या उभयतांस बरोबर घेऊन तुजला घेण्या करितां आलों परंतु तूं आपले मायचे व भाऊ सुक्या याचे शिकविण्या वरून आली नाहींस याजकरितां तुजला ही नोटीस दिली आहे तर नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत मजपाशीं मुकाव्यानं यावेस असें झालें नाहीं तर तुजला ताब्यांत घेण्याबद्दल कोर्टांत काम चालवून तुजला सरकार मार्फत ताब्यांत घेतली जाईल व तुझे मायवर व भावावर तुजला विनाकारण गैरशिस्त शिकविलें ह्मणून उभयतांवर फिर्याद करून माझें जें नुकसान होईल ती व ह्या नोटीशीचा खर्च असें सर्व भरून घेतले जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता. २७-७-९६ इसवी. ( सही )

सहीची निशाणी इस्तरी किसन
वल्लद येडु वठी याच्या हातची
असे. दस्तुर तुकाराम वल्लद
गंभीरजी पाटील राहणार
मौजे पिलकवडी.

### नोटीस

रा. रामप्रताप वल्लद रामधन मारवाडी व रामजी वल्लद संभाजी मते राहणार मौजे गुंज तालुके पुसद यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मा उभयतांची गुंज येथें "रामधन रामप्रताप" या नांवची दुकान असून दुकानचे बाबतींत तुमचा आपसांत वाद चालल्यामुळें त्याचा निकाल करण्याकरितां तुह्मी उभयतांनीं पुसद येथील पंच नेमून दिले. वाद मिटविण्या करितां दुकानच्या वह्याची जरूरी असल्यामुळें पंचास वह्या मागतील त्या वेळेस देण्या करितां तुह्मी उभयतांनीं आमचे जवळ दप्तरें बांधलेल्या वह्या आणून ठेविल्या आणि त्याचवेळेस तह्मी आह्मास सांगितलें कीं आह्मी (रामप्रताप व रामजी ) दोघे वह्या मागण्यास आलों ह्मणजे पावती घेऊन वह्या आह्मास द्याव्यात. एकमेकांचे गैरहजरींत एकमेकास देऊं नयेत. अशा अटीवर ठेविल्या आहेत. वह्या तुह्मी दोघे येऊन घेऊन जाव्यात असें बरेच वेळां सांगून पाठविलें पत्रें लिहून पाठविलीं अखेर समक्ष बरेच वेळां [ रामप्रतापास ] ह्मटलें आणि चौघा समक्षही ह्मटलें तरी तुह्मी दोघे येऊन वह्या नेल्या नाहींत. अखेर काल तारीख २८ जुलई सन १८९६ इसवी रोजीं पुसद मुक्कामीं तुह्मी ( रामप्रताप ) आले त्या वेळेसही बरेच मनुष्यांसमक्ष वह्या नेण्यास सांगितलें तरी तुमचे [ रामप्रताप ] ह्मणणें पडेल कीं ८ दिवसांनीं घेऊन जाऊं. एकंदरींत तुह्मी उभयतांनीं मिळून येऊन वह्या घेऊन जात नाहींत करितां नोटीस दिली जाते कीं नोटीस पावल्या पासून ४ चार दिवसांत येऊन आमच्या नोटीशीचा खर्च देऊन वह्या तुह्मी उभयतांनीं घेऊन जाव्यात आणि पावल्याबद्दल आह्मास पावती द्यावी असें तुमचेकडून न झाल्यास संरक्षण संबंधी आणि भाड्याचे जागेबद्दल तुमचेपासून पैसे घेऊं. आह्मी तुमचे अशा कृत्यास जबाबदार नाहींत. नोटीस दिली तारीख २९ माहे जुलई सन १८९६ इसवी. मुकाम पुसद.

( सही मारवाडींत ) शिवदयाळ भोलाराम मारवाडी मुकाम पुसद
दस्तुर खुद्द.

## जाहिरात

### दवाखाना स्वदेशी.

!! थोडें लक्ष देऊन वाचा व अनुभव घ्या !!
थोड्या किमतींत हटकून गुण.

येथे प्रवाल, सुवर्ण रौप्य, लोह, ताम्र, अभ्रक, वंग वगैरे सर्व प्रकारचीं शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेलीं शुद्ध भस्में; सूवर्ण मालिनी वसंत, हेमगर्भ, लक्ष्मीविलास, इत्यादि सर्व मात्रा; गुलवेलीचें सत्व, आसव, हीम, कल्क, लेप, चूर्णें चातुर्थिक तिजारे, दुजोर व दररोज येणाऱ्या हिंवावरील बाटल्या व गोळ्या, तशाच गजकर्णीवरील बाटल्या व डब्या; परमा, प्रदर, बाळंत रोग, आणि सर्व प्रकारच्या रोगावरील रामबाण औषधें प्रभृती व सटवीचीं यंत्रें, बदाम पाक व इतर पाक सर्व पाक, सौभाग्य सूंट इत्यादि सर्व अति स्वस्त दरानें हव्या त्या वेळेस विक्रीस तयार आहेत. रोगाची परीक्षा प्रथम करून नंतर औषधें देण्यांत येतील. सर्व रोगांवरील औषधें शुद्ध वनस्पतीचीं केलेलीं आहेत. पर गांवीं औषधें व्ही. पी. नें पोष्ट मार्फत रवाना केलीं जातात.

पत्ता व सही.
शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना आकोला. शहरांत
वऱ्हाड. १८९१

### श्लोक ( भुजंग प्रयात )

श्री सच्चिदानंद नारायण सरस्वती परमानंद. श्री स्वामीचे शेवेसीः—

नमो षड्गुणैश्वर्य संपन्न मूर्ते,
नमो सच्चिदानंद कारुण्य मूर्ते,
नमो वेदवंद्या, नमो ब्रह्ममूर्ते,
नमो सद्गुरोनाथ युष्मत्पदातें १
अविद्यागजा मोडुनी मुक्तमोतीं
नतां देतसां आपल्या शुद्ध हातीं;
भवीं तापती लोक तापत्रयानें,
कृपा आपुली ताप त्यांचा लया ने २
तुह्मी अर्पिता ज्यास कैवल्यें दान
ह्मणाना तिथें थोर वा हा लहान;
अभेदे जसा भानु सर्वा प्रकाशी
तसें आपुलें चित्त भावीं जनासी ३
भवाच्या तमाला कराया विखंड
चिदाकाश चंडांशु तुह्मी प्रचंड;
यमा दंडण्या दंड युग्मीं उदंड
असे शक्ति; सामर्थ्य ऐसें अखंड ! ४
चकोरां जसा चंद्र पोशी करानें,
तुह्मी त्या परी शांत संवीक्षणानें
भुकेल्यास संतृप्तता ओगॅरिता,
अशी थोरवी नाकळे आकळीतां ! ५
अहो! उन्मनीचेंहि जें पक्क पीठ
स्थिरावून सिंहासनीं त्या सुधीट,
तुह्मी शासिता ब्रह्म गोलांस बापा,
गरीमा असा मापितां येन मापा ! ६
अशी सोज्वला आपुली किर्ति मातें
मुखें सांगती मित्र सानंद चित्तें;
तसें आपुले शिष्य तान्या महंत
प्रभा वास गातात येथें अनंत ! ७
जसा रामदासास कल्याण होता

" १ः षड्गुण= यश, श्री, कीर्ति औदार्य विज्ञान व वैराग्य. २ मोक्षाचें दान. ३ समजणें.

मछिंद्रास गोरक्ष वा शिष्य होता
तसे आपले शिष्य सत्शील शांत!
तुह्माला मिळालेत हे भाग्यवंत ८
मुखें आपल्या प्रेमळा पुण्यलीला
प्रसन्नांतरें सांगती ते अह्माला;
भुले भृंग जेवीं सुवासास नित्य
भवत्पाद युग्मी तसें होय चित्त. ९

४ वाढणें. ५ न आकळे=नाकळे, ६ तूर्येची पक्क अवस्था, तिला उन्मनी ह्मणतात. ७ आसन, स्थान. ८ अनेक ब्रह्मांडास ९ मोठेपणा

करूनी पुढें व्यीज हें पत्रिकेचें
गुरो! पातलों दर्शना त्वत्पदाचें.
न जावें समर्थीकडे रिक्त पाणी
मला ठाउकी ही असे शास्त्र वाणी, १०
ह्मणूनी करीं घेउनी चित्त काया
समर्थां तुझ्या अर्पितों आज पायां
ह्मणायास माझें जगीं सर्व होतें
प्रभो, अर्पिले आपुल्या मी पदीं तें. ११
विलासी जनांच्या विलासा समग्र
सदां गाउनी घासिलें म्या रसाग्र,
विवर्णून रूपें सुरम्यांगनांचीं
वृथा आजपर्यंत मी शुद्ध वेची ! १२
तुह्मा सारखे संत योगींद्र यांची
स्तुती आज केली असे मात्र साची
करूनी स्तुती चार वाचा ऋणाला
अजी ! फेडुनी दास उत्तीर्ण झाला ! १३
नसे अल्पही शांति चित्तास कांहीं
नसे स्थैर्य बुद्धीस तेणें मुळींही
अहो रात्र चिंतानळीं मग्न आहे
न लागे कुठें लक्ष माझें, गुरो हे ! १४
न साहित्य जाणें, न गीर्वाण जाणें,
कवि वांग नाहीं न काव्यास जाणें,
निघालें जसें स्तोत्र वाचें स्वभावें
तसें अर्पितों गोड मानून घ्यावें १५
करीं घेतल्या त्या कण्या आणि पोहे
ह्मणेना परब्रह्म तो कीं 'नको हें'
कथा ह्या तुह्मा ठाउक्या, मी कशाला
उगी सांगुनीया करूं आग्रहाला १६
बसे दिव्य सिंहासनीं चक्रवर्ती
पुढें याचकाचे थवे धांव घेती
मुखें वर्णितां थोरव्या भूपतीच्या
करी भूप तो कामना पूर्ण त्यांच्या १७
तुह्मी भूपतीचेहि भूपाल सत्य
प्रदीप्तात्म सिंहासनीं बैसलात
सहर्षे पवाडे मुखें गाउनीया
प्रभो येतसे याचना मी कराया १८
नको राज्य मातें, नको स्वर्ग मातें,
नको सत्य कैलास वैकुंठ वा तें
नको चार मुक्ती, नको बोध मातें
नको चित्कळा, ह्या न चैतन्य मातें १९
नसे मूर्ति ज्याला, नसे रूप ज्याला
गुणातीत जें, ठाव नाहीं जयाला,

१० मिष. ११ जिभेचें टोंक. १२ परा, पश्यंती. मध्यमा व वैखरी ह्या चार वाचा.

विकारा न ये, जें असे निर्विकल्प
परब्रह्म ऐसें न द्या यास अल्प. २०
तुह्मी स्वर्ग माझे, तुह्मी देव माझे,
चिदानंद माझे, तुह्मी ब्रह्म माझे,
अशा चालत्या बोलत्या दैवताला
त्यजूनी, असारास घेऊं कशाला. २१
असे आस ही द्या गुरो दर्शनास
तुह्मी शीघ्र येऊनिया या स्थळास
दिनाचे तुह्मी नाथ सिंधू दयेचे
करा पूर्ण हे बोल या किंकराचे. २२
दुजे मागणें मागतो लक्ष द्यावें,
कृपादृष्टिनें नित्य मातें पहावें,
मनीं चांगली वासना, संत संग,
पदीं आपुल्या भाव द्या हीं अभंग. २३
मनानें धनानें तनूनें झिजावें
पराकारणें प्राण वेंचून जावें
अनंतोपकारा करानें करावें
वराला अशा चिद्धना यास द्यावें. २४
शिळी भाकरी कामधेनूस मागे
तसें कल्पवृक्षास पाषाण मागें
ह्मणे दे गरीबीच चिंतामणीला
वदावें असा कोण होऊन गेला. २५
प्रभो सद्गुरो, हे समर्था अनंता
मला सार सर्वस्व तूं एक आतां
अहो शांतरूपा नव्हा रोषयुक्त
जरी मागणें मागता मी अनुक्त. २६
मुले हट्ट घेतात माते समीप
जरी मागती सर्व कांहीं अनल्प
तरी उक्त तें त्यांतलें माय देते
तुह्मा उक्त वाटेल तें द्या आह्मातें. २७
अगा सच्चिदानंदकंदा यतेंद्रा
पुन्हा मागणें मागतों एकदां, द्या.
न लावा विलंबा पदाब्जांस दावा
मनोभाव हा शेवटीं शीघ्र न्यावा. २८

BEE

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १० शके १८१८

हल्लीं असा शास्त्रीय शोध निघाला आहे कीं प्रकाशलेखनकलेच्या योगानें मनुष्याच्या मनांतील चिंतित वस्तुंची देखील प्रतिमा हुबेहुब उतरून घेता येते. हा शोध डाक्टर बाराडक नांवाच्या विद्वान गृहस्थानें काढला आहे. रांटजेन यांनीं अदृश्य व गुप्त वस्तुमात्राची प्रतिमा घेणारे कांहीं किरण शोधून काढिले आहेत त्यांच्या प्रकाशानें अपारदर्शक पदार्थातून या किरणांचा प्रवेश होऊन त्या पलिकडील वस्तूचें चित्र किरणांच्या प्रभावानें कांचपात्रावर आपोआप उमटतें. हा शोध अद्भूत वाटला पण यापेक्षां मोठें नवल ह्मणजे डाक्टर बाराडक यांचा शोध होय. अतींद्रिय व अगोचर वस्तु ज्या मनाचा सृष्टी मध्यें वास्तव्य करितात त्यांची प्रतिमा नव्या शोधानें उपलब्ध होते. हें खरोखर अवर्णनीय १९ व्या शतकांतील नवल होय. मनुष्यानें अंधारांत जाऊन आपला हात प्रकाशलेखनाच्या कांचपात्रावर ठेवावा ह्मणजे त्याच्या मनानें कल्पिलेल्या वस्तूची प्रतिमा काळसरश्या दिसणाऱ्या छायेमध्यें उमटलेली दृष्टीस पडते. ईश्वरी अगाध लीला बुद्धिमंताच्या द्वारें अशाच प्रकाशित होत असतात.

---

मुंबईच्या 'प्रेसिडेन्सी आसोशिएशन' सभेनें देशकल्याणाची कामें फार नामी आरंभिलीं आहेत. या सार्वजनिक संस्थेच्या मुख्य चालकांमध्यें नामदार फरोजशा मेथा, दिनशा एदलजी वाचा, चंदावरकर, धर्मसी इत्यादि नांवाजलेली गृहस्थमंडळी आहे. राजकीय गोष्टींत लोकमताचें यथार्थ प्रकाशन या संस्थेच्या द्वारानें चांगलें होतें इतकेंच नाहीं तर पुष्कळ अंशीं लोकमताची योग्य स्थापना होऊन त्याला चांगली दिशा लागते. लोकमताचें दर्शन राज्यकर्त्यांस प्रसंगानुसार होत जाईल अशी व्यवस्था या सभेनें सुरळीतपणें चालविली आहे. सांप्रतच्या कार्यमालेच्या स्वरूपावरून ही सभा सर्व विद्यमान सार्वजनिक सभा मध्यें पहिल्या प्रतीची ठरून तिचा लौकिक सर्वत्र गाजेल अशी लोकांस उमेद येत चालली आहे. जो राजकीय विषय लोकहिताचा आहे आणि जो लोकांस व सरकारास सारख्या तुलावटीनें कळला पाहिजे तो विषय या सभेच्या हातून बाजूस पडला असें कधीं निदर्शनास येतच नाहीं. अलिकडे बहुतेक सर्व राजकीय विषयांत या सभेनें राष्ट्रीय सभेच्या खालोखाल उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. राजदरबारीं देखील या सभेचा लौकिक व मानमरातब वृद्धिंगत पावत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

सार्वजनिक संस्थामध्यें मोठी उणीव ह्मटली ह्मणजे खरोखर कळकळीच्या, परार्थबुद्धीच्या, व प्रयत्नशीलांच्या विद्वान लोकांची होय. लोकहितवादाच्या थोकार्यांत दक्षता, तत्परता, व तल्लीनत्व फार ज्या उदार गृहस्थांचें असतें आणि हे गुण अंगीं असून त्या शिवाय गृहस्थिती मध्यें साधारण संपन्नता, सुखवस्तुपणा, विद्वत्ता व कार्यक्षमता इत्यादिकांची सामुग्री निराळी लागते. अशा प्रकारची योग्यता ज्यांच्या अंगीं आहे असे गृहस्थ प्रत्येक समाजांत काय किंवा प्रांतांत काय विरळ विरळ आढळतात. जसजसें राजकीय शिक्षण वाढतें, लोकांस देशहिताची चाड लागते, आणि लोकांच्या मनांत निरनिराळे हक्क संपादण्या विषयीं उत्कट आशा उद्भवतात तसतशी सार्वजनिक संस्थामधील चालकांची उणीव नाहींशी होत आणि त्या संस्थांच्या राजमार्गीनें सर्व जनसमूहाची राजकीय उन्नती होत जाते. आपल्या लोकांच्या राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें आह्मी नेटिव लोक अजून राजकीय उन्नतिशिखराच्या पायथ्याशींच आहों. पुष्कळ आरोहणमार्ग शिल्लक आहे आणि इतकें मागें किंवा खालीं तळाशी राहण्याचें कारण आमच्या राज्यकर्त्यांची राजनीतीच खरोखर आहे. इंडियन प्रजेला विद्यादान यथायोग्य करावयाचा संकल्प उदार बुद्धीनें प्रथम केला पण नंतर त्या दानतीचे सुपरिणाम दृष्टीसमोर येऊं लागले तेव्हां राज्यकर्ते मत्सरबुद्धीनें, व स्वार्थदृष्टीनें आमच्या राजकीय प्रगतीचे विद्वेषे बनत चालले आणि आमचा उत्कर्ष त्यांस सहन करण्याची शक्ती नेटिव व इंग्लिश यांच्या संमेलनानें क्रमाक्रमानें येई पर्यंत आमच्या राजकीय वाटा आडविल्या सारख्या झाल्या आहेत. हें संमेलन यथायोग्य होत जाईल अशी दिशा आमच्या प्रस्तुत चळवळींस लावण्याचें महाकार्य सार्वजनिक सभांचें आहे.

वऱ्हाडची सार्वजनिक सभा जितकी लोकोपयोगी होईल असें तिच्या चालकांच्या नामावळी वरून अनुमान होतें तें बहुत प्रकारें लटकें ठरतें इतकेंच नाहीं तर त्या सभेचें आलस्य, औदासीन्य, किंवा निर्व्यापारता हीं पाहून आह्मास अती वाईट वाटतें. या सभेच्या अंगीं कर्तृत्वशक्ती मोठी आहे हें आह्मी ही कबूल करितों पण जी कर्तव्यपरायणता तिच्या चालकांच्या अंगीं दिसून आली पाहिजे ती समाधानकारकशी दिसत नाहीं हें पाहून सखेद विस्मय वाटतो. उदाहरणार्थ, या सभेनें चालू असलेल्या साऱ्याच्या वाढीबद्दल सरकारापाशीं दाद मागण्याचा विचार केला, दोन वर्षां पूर्वीं जाहिर सभा भरविली, व सरकारास अर्ज केला. परंतु या प्रकरणीं अखेरच्या मजले पर्यंत निकरानें मांडलें पाहिजे आणि इष्ट गोष्ट साध्य होईपर्यंत प्रयत्नाची कांस सोडतां कामा नये हा बुद्धिवाद निदान सार्वजनिक सभेस सांगण्याचें कांहीं प्रयोजन नसावें. वास्तविक प्रकार याच्या उलट अनुभवास येत आहे पण आह्मी उमेद बाळगतों कीं मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोशिएशनचा कित्ता वऱ्हाडची सार्वजनिक सभा चांगला वळवील व लोकहिताचें संकल्पित ब्रीद पूर्णतेनें सिद्धीस नेईल.

---

मुंबईच्या 'प्रेसिडेन्सी आसोशिएशन' सभेच्या मार्फतीनें इंडियाच्या स्टेट सेक्रेटरीस वैद्यक खात्याच्या सुधारणे संबंधानें एक मुद्देसूत विनंतीपत्र रवाना केलें आहे आणि हें विनंतीपत्र धाडलें गेलें त्या समयास दुसरा एक शुभ शकून झाला तो असा कीं, विलायतेस जे इंडियाच्या खर्च प्रकरणीं रायल कमिशन बसलें आहे त्याच्या समोर डाक्टर बहादूरजी यांची साक्ष वरील विनंतीच्या विषयावर घेण्याची कबूली रायल कमिशननें कळविली आहे.

गेल्या एप्रिल महिन्यांत १९ व्या तारखेस मुंबईस जंगी सभा भरली होती. तिच्या आज्ञेवरून नामदार फेरोजशहा मेथा यांनीं स्टेट सेक्रेटरीस वैद्यक खात्या संबंधानें एक अर्ज धाडला आहे. त्यांतील मुख्य मुद्दे असे आहेत कीं, 'इंडियन मेडिकल सरव्हिस' ह्मणून इंग्रजी वैद्य तयार करून पुरविण्याची संस्था आहे. ही संस्था लष्करी खात्यांत लागणाऱ्या वैद्यांचा पुरवठा करण्यासाठीं प्रथम निघाली पण पुढें या संस्थेचें देव्हारें इतकें माजलें कीं इंडियांतील सिव्हील खात्यांतील नेमणूका देखील तिच्या आश्रयाखालील गोऱ्या डाक्टरांनीं आटोपून घेतल्या. हल्लीं नेटिव लोक डाक्टरीचा धंदा उत्तम शिकलेले असे पुष्कळ आहेत तेव्हां शाळाखात्यांतील, व आरोग्यविषयक खात्यांतील नेमणूका व इतर शास्त्रीय प्रयोगविषयक हुद्यांच्या जागा लष्करी डाक्टरांसच न देतां विद्वता, अनुभव, व शास्त्रीय व्यासंग हीं पाहून योग्यते प्रमाणें नेटिव लोकांस ही देण्यात याव्या असा अर्जातला मूळ मजकूर आहे. या सुधारणेनें खर्चाच्या बाजूनें फायदा असून गुणाच्या पारखी प्रमाणें इंग्लिश व नेटिव लोकांस हुद्देदारीच्या जागा मिळत जातील आणि वैद्यशास्त्राला देखील राजाश्रयामुळें निराळें उत्तेजन मिळून तें उत्तरोत्तर भरभराटीस येत जाईल.

वैद्यक शास्त्रांतील नैपुण्य व पारंगतता हीं पाहून गुणाच्या प्रमाणानें सिव्हील खात्यांतील नेमणुका केल्या पाहिजेत हें तत्व सर्वत्र सन्मान्य आहे. १८६८ च्या सुमारास पाश्चिमात्य तऱ्हेनें शिकलेले डाक्टर उपलब्ध नव्हते तेव्हां मुख्य मुख्य जागा 'इंडियन मेडिकल सर्व्हीस' या संस्थेच्या लोकांस दिल्या जात होत्या पण हल्लीं मेडिकल कालेजांत शिकलेले सवरलेले लोक इंग्रजी डाक्टरांपेक्षां देखील विद्येनें पुढें असतात आणि अशांची संभावना योग्यते प्रमाणें सरकारी नौकरींत होत नाहीं तें बरोबर नाहीं. मेडिकल कालेजांतील प्रोफेसरांच्या जागीं लष्करी डाक्टरांची भरती गुणाकडे दुर्लक्ष्य करून करितात पण तें करणें नापसंत आहे असें डाक्टर हंटर यांच्या ह्मणण्यावरून शाळाखात्याच्या डायरेक्टरांस कळविण्यांत आलें होतें. डाक्टर कार्टर व मि. हार्ट इत्यादि गृहस्थांनीं सप्रमाण प्रतिपादित केलें आहे कीं केमिकल अनलायझर, सानिटरी कमिशनर, वेड्यांच्या आश्रमाचे सुपरिनटेंडेट, पोलिटिकल एजंट अशा भिन्न भिन्न प्रकारच्या जागीं देखील इंडियन मेडिकल सरव्हीस पैकीं लोकांस नेमतात आणि त्या योगें भलत्याच कामीं भलताच मनुष्य येऊन नेमणूकीची अप्रयोजकता, मनुष्याची अयोग्यता, व सरकारची गुणग्रहणशून्यता हीं एकदम दिसून येतात.

सनदी डाक्टराचा पगार ६०० रुपये दरमहा पासून २५०० रुपये दरमहा पर्यंत वाढणारा असतो. बिनसनदी डाक्टरांची योजना विद्येच्या मातबरीच्या मानानें केली तर ३५० रुपया पासून वाढणाऱ्या ७५० रुपया पर्यंतच्या पगारावर पुष्कळ नांवाजलेले लोक मिळून सरकारचा खर्चही कमी होईल. हल्लीं तर युनिव्हरसिटींत उत्तम ह्मणून नाणवलेल्या वैद्यास देखील १००।२०० रुपया पेक्षां अधीक पगाराच्या जागा मिळूं नयेत अशा कृत्रिम तजविजी केलेल्या आहेत.

लष्करी खात्याची वैद्यकशाखा निराळी करावी, आणि त्या करितां इंडियन मेडिकल सरव्हीस मधील लोकांच्या नेमणूका केल्या जाव्या; पण सिव्हील खात्याची वैद्यक शाखा स्वतंत्र निराळी करावी आणि त्यांतील नेमणूका इंडिया व युरोप या दोन्ही खंडांतील वैद्यांच्या समूहांतील निवडक लोकांच्या नांवानें केल्या जाव्यांत. अशा व्यवस्थेनें ३२ लक्ष रुपयांचा खर्च सालिना कमी होईल असा अंदाज आहे. हल्लीं लष्करी खात्यांत सनदी २८६ डाक्टर आहेत तर ३७४ सनदी डाक्टर सिव्हील खात्यांत आहेत. आणि अशा दांडगाईच्या नेमणुकामुळें खर्च अतोनात होऊन त्याच्या मोबदल्यांत वैद्यक

शास्त्राला उत्तेजन न मिळतां गुणी मनुष्यांचा अव्हेर किंवा अपमान सरकारच्या हातून वडत आहे. किती दोषमूलक व अपायकारक वैद्यकखातें सरकारनें तसेंच वर्षानुवर्षे चालविलें आहे हें सरकारास स्पष्टपणें कळविल्या नंतर चुकीची दुरुस्ती करण्याचें काम सरकारचें आहे. लोकमत सदा मार्गदर्शक असतें पण त्या दर्शना प्रमाणें मार्गगमन सरकारास करावयाचें असतें.

दरवर्षी मृगनक्षत्राच्या सुमारास आगामी पर्जन्या विषयीं सरकारी पंचमहाभूतशास्त्रज्ञ भविष्य वर्तवीत असतात. गेल्या २९ वर्षाच्या अनुभवांतल्या गोष्टींच्या प्रमाणावर, सादृश्येतच्या मानावर व यथासाध्य कार्यकारणभावाच्या ज्ञानावर हें भविष्य बसविलें असतें पण पर्जन्याची नियामक पूर्ववर्ती कारणमाला अत्यंत गूढ आहे आणि सृष्टीमध्यें पंचमहाभूतांपैकीं कोणतीं तत्वें बलवत्तर केव्हां होतील व निरनिराळा उपाधिसमुच्चय किती प्रकारचा उद्भुत होईल याचा कांहीं नेमच नसतो ह्मणून हें पर्जन्यभविष्य बहुत प्रसंगीं खोटें ठरतें आणि तोच मासला चालू वर्षी अनुभवास आला आहे.

यंदा महाराष्ट्रांत पर्जन्य कमी होईल किंबहुना दुष्काळही पडेल असें सरकारी भाकीत होतें व त्याची सत्यता विशेषें करून आमच्या प्रांतांत दिसून पडते कीं काय अशी भिती पडली होती पण ईश्वरी कृपेनें सर्वच अनुमान चुकलें. गेल्या १०।१२ दिवसांत पर्जन्य सर्व महाराष्ट्रांत अतोनात झाला, आणि कोंकणपटीच्या भागांत समुद्र, खाड्या, मोठ मोठ्या नद्या इत्यादिकांच्या पुरामुळें अनेक भाग जलमय होण्याची वेळ येऊन बेतली होती. कोठें कोठें ताशी दोन दोन तीन तीन इंच देखील पाऊस पडला आणि गांवोगांव अनेथ उसळले आहेत अशा बातम्या मुंबई, गुजराथ, पुणें, वाई, नेरळ, मालेगांव, भडगांव इत्यादि ठिकाणाहून आल्या आहेत. हा पाऊस आमच्या प्रांतांतही मार्गो मार्गानें उतरला होता आणि पर्जन्याचें उग्ररूप या भागांतही दृष्टीस पडलें पण आनंदाची गोष्ट इतकीच कीं आमच्या प्रांतीं पर्जन्यामुळें अनर्थपात विशेषसे घडले नाहींत. पाऊस अगदीं वेळेवर येऊन पुष्कळ झाला आणि वेतावेतानेंच त्याचें टाणें नुकतेंच हालत चाललें आहे. मुंबई पुण्याकडे तसेंच मुंबई बडोद्याकडे रेलवेला देखील पुष्कळ अडथळे आले, ठिकठिकाणच्या लोखंडी सडका वाहून गेल्या पूल दगावले इत्यादि अनेक उत्पाद झाले आहेत पण हल्लीं सर्व गोष्टी पुन्हा सुयंत्र चालू झाल्या आहेत.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST
3 1896

The present outlook is not a hopeful sign of the turn Indian matters are likely to take in future. Circumstances which are stern realities in the history of India, give a saddening and deepening colour to the prospect of our assimilation with the ruling race. Questions of vital importance to Indian interests are decided on the line of party politics and indicate a gradual decline in our affection, confidence and respect towards our rulers. Clouds are fast gathering over the political horizon and they threaten a *defacto* policy of reducing us to a pure state of serfdom. What under—mines the stronghold of Indian loyalty and devotion to the British throne is the utter want of sympathy, good heartedness and generosity of the first days of the British advent in India. In the Indian history there was no doubt a period of transition when this nation was full of elements of war amongst the several nationalities that looked for an empire in India. In those years the English people paved their way to the establishment of a British empire by principles of liberal education, recognition of native intellect for administrative capacities and a generous avowal of the rights of British fellow subjects. The policy was then a temporizing rule of guidance and naturally made common cause of the English and Indian interests in the government of the country; but no such policy rules the destinies of the Indian millions at present. The period of the union of English and Indian interests has fast dwindled away and the age of conflict is gradually taking its place so as to accentuate the wanton selfish and suicidal sacrifice of Indian interests for the good of the ruling people. This disturbing element in our relations is a fair and signal index to two facts in the national character. The first is the awakeing of the Indian people to their rights and privileges. This knowledge is the proud and triumphant outcome of western education, but proves a forbidden fruit when England foresees therein a high road back to Europe for her own people. No doubt the forecast is based on a wrong basis. What the Indian people claim is not a free government or a colonial policy for India. The cry is "Govern Indian for India's Sake," But good things never succeed where self interest is at stake. Indian optimists tell us that the national Congress will dominеer over the Anglo—Indian petty jealousies and will win over the righteous English people to adopt a policy that will strengthen and perpetuate the ties that have founded the Indian Empire. The British 'raj' of tomorrow depends upon making England and India just the same home for the subjects of the Queen Empress. This is no doubt a golden prospect but what belies our hopes is the present English policy. India is at present a rich house where the rulers invite their own people to make fortune without the least care of what becomes of the house itself. To a plain mind the question presents a sorry spectacle and we confess we do not know whether we should be joying with the benign British rule in unconscious forgetfulness or should move heaven and earth to restore the good old policy.

Amraoti 27-7-96

Some reformers here conceived and developed the idea of obtaining the sanction of our revered Guru Shri Shankaracharya, to the practice and institution of widow remarriage, as the result of the present restriction has been disastrous and terror—striking, and as the life-long and miserable condition of the widows of the Brahmin community and the unavoidable sins that are being committed, and sad and pitiable spectacles daily presented to our sight are intolerable. In view of this matured idea these gentlemen thought it advisable to hold a public meeting of the Brahmin citizens of Amraoti to vote an appeal to Shri Shankaracharya to obtain his consent. Accordingly a public meeting was held here, yesterday morning in Shri Balajis temple, for the purpose. Mr. P. N. Jog B. A. LL. B. one of the distiuguished High Court Pleaders here, was in the chair.

Mr. Shridharpant Pimpalkhare put forth the text of the memorial for the approval of the public in a pathetic and touching lecture. Some old Shastri opposed it in the old mode of thought.

The President replied to the criticism of the Shastri and practically seconded Mr. Pimpelkhare's proposition. But it affords me great pleasure to observe that Mr. Jog, the President of the meeting, in his usual style of reasoning, ably advocated and established the necessity and desirabilty of widow-remarriage by citing illustrations, and giving quotations, and making allusion to the standard authors like Spencer and others and also to the Shrutis and Smritis.

Mr. V. H. Karandikar moved an amendment to shelve the memorial for some time to come.

The reasons he adduced in support of his amendment were (1) the general concensus of public opinion indicative of the deeprooted prejudices and scrupulous and superstitions convictions (2) the direct or indirect effect of the indignation at the disobedience of the orders nd circular letters sent from time toa time by the Swami to the people in the matter of the tea squable at Poona (3) the disrespect with which the resolution of the Swami about the intermarriages between the sub-sections of the Brahmin community viz. Konkanastha Deshastha and Karhade was treated by the people (4) the popular interpretations and versions of the Hindu Law regarding different usages and customs prevalent among the Brahmin community (5) the implicit confidence of the people in the dictates of the Shruti and Smriti believing that they do not enjoin the practice of widow remarriage, all these considerations would, Mr. Karandikar thought, weigh with Shri Shankaracharya in delivering his judgment.

The meeting was however intended to get signatures of the *willing* reformers and so the amendment was practically vetoed.

A Looker on

## वऱ्हाड

हवामान—पर्जन्य या आठवड्यांत पुष्कळ झाला आणि आणि आकाश ढगांनीं अद्याप व्याप्त आहे त्यावरून आणखी पर्जन्य होईल असा रंग दिसतो. २२ इंच पाऊस होत आला. हवेचा उपद्रव मध्यंतरी वाढला होता पण हल्लीं कमी आहे.

उमरावतीस रा० रा० प्रल्हाद नारायण जोग यांच्या अध्यक्षते खालीं जाहिर सभा भरून रा० रा० श्रीधरपंत पिंपळखरे यांच्या सूचने प्रमाणें श्रीमच्छंकराचार्य संस्थान संकेश्वर यांची विधवा विवाहास परवानगी मागण्याचा विचार ठरला आणि अर्जदारांच्या सह्या घेतल्या नंतर अर्ज रवाना करणार आहेत. ब्रह्मवृंदामध्यें विधवा विवाह शास्त्रोक्त ठरला ह्मणजे भ्रूणहत्या, बालहत्या, आत्महत्या इत्यादि महापातकें टळतील अशा धरंवशानें विज्ञप्ती करण्यांत आली आहे.

### विनंती पत्र

श्रीमंत सकल गूण संपन्न ऐश्वर्याभी महाराज सदा रा. रा. रामजी वीरमान पाटील व नागोजी रामजी पाटील दुकान कसूर यांसी मारोतीसा भवानसा रंगारी दुकान बाळापूर अनेक रामराम वि. वि. आपण वैदर्भ अंक ९ ता. १६-७ ९६ इसवी ची नोटीस दिली ती पावली आपण कपटानें मला कसूऱ्यास बोलाविलें आणि जुलमानें दस्ताऐवजावर सही करून घेतली आपण माझेवर मोगलाई प्रमाणें मोठा जुलम केला सबब माझी राजी खुषी नाहीं. आपणास दरसाल वसूल दिला त्याची पावती द्यावी, व्याजा बद्दल माफी देण्याचे कबूल केले त्या प्रमाणें व्याज माफ करून राहिलेली बाकी देण्यास तयार आहो. फिर्याद करूं नका. कोर्ट खर्च देणार नाहीं. आज पर्यंत गरीबाचे रक्षण केलें तसें आणखी रक्षण करावें नोटीस खर्च जमा करावा. हे विनंती ता. ३१ माहे जुलै सन १८९६ इसवी.

[ सही ]
मारुतीसा भवासा रंगारी दुकान
पेठ बाळापूर दस्तुर खुद.

नमुना नंबर १४१

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.
दि. ह्मा. १९ मिसल नंबर ६

१८९६

विद्यमान सिवील ज्यडज साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— हरप्यारी मर्द बलदेवदास तर्फे मुक्त्यार नंदराम उदेराम

राहणार—वोडगांव तालुके अकोट
जिल्हा—अकोला यांस मयत

हरनंदराय बापाचे नांव नानकराम राहणार वोडगांव तालुके अकोट जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख १९ माहे अगष्ट सन १८९६ इसवी रोजीं सहरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ३१ माहे जुलै सन १८९६.

Sk. Ismail
सिव्हिल जड्ज्य.

पांडवप्रताप
टाईप बारिक पण ठळक. किंमत
१४ आणे
पुणें, आर्यभूषण छापखान्यांत मिळेल.

## वर्तमानसार.

इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिसचे पेशील बनावट केल्याबद्दल शिक्षा झालेले दोन कैदी व अशाच कामाबद्दल शिक्षा झालेले दुसरे तीन कैदी यांस एकदम बंधमुक्त करण्याबद्दल गेले बुधवारीं भायखळा तुरुंगावरचे सुपरिंटेंडेंट यांजकडे टपालांतून सरकारचा ठराव आल्यावरून त्यांनीं त्या कैद्यांस तावडतोब सोडून दिलें. पण पुढें थोड्याच वेळांत कळून आलें कीं, तो सरकारचा ठराव खरा नसून त्यावरील अंडर सेक्रेटरीची स्वदस्तुरची सही देखील बनावटच होती ! सदहू पैकीं दोन कैदी रात्रौ नाटक पहावयास गेले असतां तेथें सांपडले व दुसरे दिवशीं २ सांपडले. एका गोवानीज कैद्याचा मात्र अजून पत्ता नाहीं.

मुंबई इलाख्यांतील प्रत्येक प्रांतांत दरवर्षी विद्यापरिषद भरविण्या विषयीं सरकारचा ठराव झाला. त्या अन्वयें दक्षिण भागांतील डे. ए. इन्स्पेक्टर वगैरे लोकांची परिषद् उदईक धारवाडास भरणार आहे.

पोष्टांत पत्र पडलें केव्हां हें समजण्या करितां तारखेच्या छापांत तासाचा आंकडा घालण्याची नवी पद्धत मोठमोठ्या ठिकाणच्या पोष्टांतून सुरू करण्याचा ठराव झाला आहे. युरोपियन लोकांचीं पत्रें त्यांचे शिपाईप्यादे टपालांत नेऊन टाकण्यास उशीर लावतात; त्याला दहशती करितां हा तोडगा केला आहे.

अंबाला येथें राय केदारनाथ एम. ए. नांवाच्या एका हुशार व विद्वान गृहस्थानें कांचेचीं भांडीं वगैरे करण्याचा कारखाना सुरू केला आहे. यामध्यें विनरंगाची कांच देशी द्रव्यापासूनच करण्यांत येत असून दवती वगैरे लहान लहान चिजा फारच सुबक निघूं लागल्या आहेत.

केरळकोकिळेचे बातमीदार कळवितात कीं, रत्नागिरी जिल्ह्यांतील वेंगुर्ले तालुक्या पैकीं वेरूळस गांवानजीक बागलाईची वाडी ह्मणून असून तेथें एक दगडी मठ आहे. हा मठ बराच प्राचीन काळचा असून फोंडी चिदानंद नांवचे एका महान साधूनें बांधला असावा असें वृद्ध लोकांचे सांगण्यावरून समजतें. या मठांत पादुका आहेत आणि दोही बाजूंच्या भिंतिवर एक तुळई असून त्या तुळईचे मध्यभागांतून पांचपांच सेकंदाचे अवकाशानें पाण्याचे थेंब पडून पादुकांस अभिषेक होत असतो. प्रतिवर्षी शिवरात्रीचे दिवसापासून पर्जन्यास सुरवात होईपर्यंत तुळईतून पाणी पडतें. व पावसाळा सुरू झाला ह्मणजे बंद होतें. सदहू तुळई फार जुनी झाल्या कारणानें गांवकरी लोकांनीं ती काढून दुसरी घातली. तथापि वर सांगितलेलें दिवसापासून पूर्ववत पाणी पडण्याचें तसें घडत आहेच. हा लोकोत्तर चमत्कार त्या भागांतील बहुतेक लोकांचे अवलोकनांत आला असल्याविषयीं ते बातमीदार सांगतात.

पेकीनग्याझेट ह्मणून जे चिनी भाषेंत त्रिवार दैनिक पत्र निघतें त्यांचे कर्ते खुद्द चीनचे बादशाहा, मातुःश्री आणि त्यांचे प्रधान हीं सर्व ( संपादक—एडिटर ) आहेत. क.

महापुरानें नाश— बंगाल्यांत वैतरणी नदीस एवढा मोठा महापूर आला होता कीं नेहमींच्या पुरापेक्षां त्याची उंची ६० फूट जास्त होती. ती नदी ज्या प्रदेशांतून जाते त्या प्रदेशभर १० फूट उंचीचें पाणी झालें होतें. झाडावर चढचढून माणसांनीं आपले जीव वांचविले. मालमत्तेचा नाश फार झाला. पण फक्त चारच मनुष्यें मेलीं असें तिकडून आलेल्या तारेवरून समजतें.

लांब तारेचा कापूस—गेल्या सालीं हिंदुस्थानांतल्या गिरणीवाल्यांनीं मिसर देशांतून ६००० गंठ लांब तारेचा कापूस तलम सूत काढण्यासाठीं आणिला होता असें सरकारी रिपोर्टावरून समजतें.

चंदनाचें उत्पन्न—ह्मैसूरच्या राज्यांत जसा उत्तम चंदन होतो तसा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं होत नाहीं. ह्या चंदनाची आख्या सगळ्या हिंदुस्थानांत आहे. गेल्या सालीं ह्मैसूर सरकारास ७९७०८९ रुपये चंदन विक्रीपासून उत्पन्न झालें. ह्याच्या मागेल्या सालापेक्षां हें उत्पन्न कमी झालें ह्याचें कारण त्या भागाचे असि. कान्सरव्हेटर असें सांगतात कीं भिकार चंदना पासून काढलेलीं तेलें परदेशांतून इकडे आलीं त्यामुळ हें उत्पन्न कमी झालें. पण खऱ्या चंदनी अत्तरांपेक्षां तीं तेलें भिकार आहेत असें गिऱ्हाइकांस आढळल्यावरून ह्या सालीं ह्मैसूरच्या चंदनाचें उत्पन्न चांगलें होईल असें त्यांचें अनुमान आहे.

हल्लीं मुद्रणकेंलत मनास थक्क करून टाकणाऱ्या कांहीं विलक्षण सुधारणा झाल्या आहेत. मेसर्स आर. कंपनीच्या यंत्रानें वर्तमानपत्रें छापलीं जाऊन त्यांची आपोआप घडी पडते नंतर तीं कापलीं जातात व त्यांवर पत्ताही चिकटविला जातो. न्यूयार्कमध्यें "वर्ल्ड" नांवाचें वर्तमानपत्र या यंत्रानें छापलें जातें. हें वर्तमानपत्र आठ पानांचें आहे. याच्या तासांत वर सांगितल्या प्रकारच्या ९६००० किंवा दर मिनिटास १६०० प्रती निघतात. शु. सू.

गेल्या वर्षी ११६७ बिगारी कलकत्याहून जमिका बेटांत मजुरी करण्याकरितां गेले व ३४८ परत आले. तिकडचा साखरेचा धंदा जरी मंदावत चालला आहे तरी मजुरांचा मजुरीचा दर कमी झाला नसून अनेक तऱ्हेच्या फळफळावळीच्या झाडांच्या लागवडीकडे त्या मजुरांचा चांगला खप होऊं लागला आहे असें सांगतात. हिंदुस्थानांतले जे मजूर त्या बेटांत जातात ते खाऊन पिऊन जी शिल्लक पाडतात त्या शिलकीची रकम १८९४ सालीं १,३९,५८० रुपये होती ती १८९५ सालीं २,२६,८०० रुपये झाली आणि सेविंग करणारांची संख्या ७९३ होती ती १०२९ झाली असें सांगतात. जो देश सुवर्णभूमी आहे असें समजून दूरदूरच्या पुष्कळ लोकांनीं गिधाडांसारख्या त्याच्यावर धाडी घातल्या आणि अति क्रूर व निर्दय होऊन अधाशासारख्या असंख्य लुटी केल्या त्या देशाच्या पोरांबाळांस आज पोट भरण्या करतां परदेशांत जाणें भाग झालें हें मनांत आलें ह्मणजे पोटांत जसें काय ढवळून जातें. पण करावयाचें काय ? कालगती विचित्र आहे असें ह्मणूनच स्वस्थ बसलें पाहिजे.

दक्षिण फोर्मोसा प्रांतांत जपानीलोक फार जुलुम जबरदस्ती करीत आहेत व त्यांनीं ६० खेडीं जाळलीं व हजारों लोकांस ठार केलें असें एक मिशनरी माणूस सांगतो.

क्रीट येथील बंडखोरांनीं टर्कीच्या फौजेस हाकून लावलें. हेराक्लेल व कांडियापोर्ट येथें ख्रिस्तीलोकांची कत्तल पुन्हा सुरू झाली व त्याकरतां तेथील परकीय वकिलांनीं लढाऊ गलबतांची अवश्यकता आहे असें आपापल्या राजास सांगितलें असें बौसची तार सांगते. कानिया व कांडिया येथें लढाया पुन्हा सुरू झाल्या आणि फ्रेंच व इंग्रज यांचीं लढाऊ गलबतें हेराकेन येथें हजर झालीं. ता २१ रोजीं पुन्हा दंगा झाला व त्यामुळें इंग्रज, आस्ट्रियन व इटालियन खलाशांस हातांत सोडगी घेऊन बंदरावर उतरणें भाग झालें. एकंदरींत हें प्रकरण अधिक बळावत चाललें असून बंगाली लोक ख्रि तीप्रजेच्या पुढाऱ्यांस मारहाण करीत आहेत.

जपानानें चीनाजवळून घेतलेल्या फॉर्मोस बेटांतल्या लोकांनीं बंडावा चालू केल्यामुळें त्याची शांतता करणें जपानलोकांस कठीण होत चाललें आहे.

रशियन लोकांची एक लहानशी टोळी खुश्क येथून निघून हिरात येथें दाखल झाली.


## जाहिरात

### ( उपयुक्त कंपनी )

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं, वाशिमाहून आकोल्यास व इंगोलीहून आकोल्यास जाणें असल्यास लोकांस फार गैरसोय आहे व वक्तशीर जाणें येणें होत नाहीं. याजकरितां ही अडचण दूर व्हावी ह्मणून आह्मी कंपनी मार्फत चांगली व खात्री लायक व्यवस्था करणार आहो. कंपनीचें भांडवल एकंदर १०००० रुपये करून एकंदर २०० शेर काढले आहेत व ही कंपनी पुढें रजिष्टरही केली जाईल. याजकरितां या कंपनीचे शेर घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्याणीं तारीख ८ सप्तेंबर १८९६ चे आंत लागतील तितके शेर घ्यावेत. निमे शेर भरले गेले आहेत तेव्हां त्वरा करावी. प्रत्येक शेर ५० रुपयांचा काढला असून एकंदर घेतलेले शेरचे रुपये तारीख ८ अक्टोम्बर सन १८९६ चे आंत कंपनीचे डायरेक्टर यांचे कडेस पाठवावेत.

शेर घेणारास या शिवाय ज्यास्त कांहीं माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं डायरेक्टर यांस विचारल्यास दिली जाईल. जबाबा करितां अर्धा आण्याचें तिकीट न पाठविल्यास जबाब नाटपेड पत्रानें दिला जाईल कळावें.

सह्या.

यशवंतराव वामन दिवे वकील राहणार वाशीम. } डायरेक्टर

शेषराव रघुनाथ वकील.

मेंबरस.

राजे काशीराव शंकरराव देशमुख

त्रिंबकराव विठ्ठलराव देशमुख प्रगणे वाशीम.

बालकिसन जियालाल ज्यागीरदार.

बाळकृष्ण रामजी सेक्रेटरी.

हबिबुल्ला गुलामहुसेन

## घड्याळ

किंमत ६ रुपये हमी ३

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटो प्रमाणें वॉच घ्या. ८०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे फिरविण्यास ठेच असून सेकंदकाटा आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस जुवेल [ ह्मणजे चक्राचे खालीं वर हिरे ] बसविले आहेत. ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरी घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।१' वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल.

व्ही. पी. ने० घड्याळ पाठवूं.

टीपः– "गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल."

गोविंद महादेव पोळ.

५२–२४ वाचमेकर आणि रिपेरर नासिक.

## नाग, नरसे, व जिवत्या

आह्मी विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या, व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या चित्रा पेक्षां त्यांत फरक करून व किंमतही कमी करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदहू चित्रांचे कागद पाठवून देऊं, किंवा व्हॅल्यूपेबलनें पाठवूं चित्राचा दर शेकडा १। रुपया प्रमाणें पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझिटर

वऱ्हाडसमाचार छापखाना अकोला.


☞ हे पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८

साल अखेर „ ७ „ १ ८

किरकोळ अंकास........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ......... ८। ८६
दुसरे खेपेस ......... ८।

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as 5
Six monthly ......... 3 ........ ...,, 8 as
Single copy ............... ........ 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXX AKOLA MONDAY AUGUST 10 1896 NO 31

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १० माहे आगस्ट सन १८९६ इ० अंक ३१


### जाहिरात

#### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
अकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent


---

### नमुना नंबर ( जी )

नादारी मुकदमा नंबर २ सन १८९६
विद्यमान पी. गोविंदराज मुदलीयार नादारी कोर्टाचे जज्ज जि० वाशीम

अर्जदार ( नादार ) रिधकर्ण मनालाल मारवाडी रहाणार भरजाहगीर ता० वाशीम जि० वाशीम हा नादारी आहे असा आज ता. १८ माहे ७ सन १८९६ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २९ माहे आगष्ट सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याचीं इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदावीणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टापावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टात पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. १८।७।९६ इ०

P. Govindraj.
नादारी कोर्टाचे जज्ज
वाशीम

---

### नमुना नंबर ( जी )

नादारी मुकदमा नंबर ३ सन १८९६
विद्यमान पी. गोविंदराज मुदलीयार नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हा वाशीम.

अर्जदार ( नादार ) शंकरप्पा नऱ्हाप्प कानडी रहाणार वाशीम ता० व जिल्हे वाशीम— हा नादारी आहे असा आज तारीख २९ माहे जुलै सन १८९६ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि ता० २९ माहे आगष्ट सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांच्या स्टांपकागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टात पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. तारीख २९ माहे जुलै सन १८९६ इसवी.

P. Govindraj.
नादारी कोर्टाचे जज्ज
वाशीम

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती श्रावण शुद्ध १ शके १८१८

---

इजिप्तच्या मोहिमेचा खर्च हिंदुस्थानावर ज्या तत्वावर बसविला आहे तें तत्व असें कीं हिंदुस्थान सरकार जो फौजफाटा रवाना करील व जो बाह्य देशीं असल्या कारणामुळें नवीन फौज फांटा ठेवण्याचें कारण पडलें नाहीं तर तो फौज फांटा विलायत सरकारास उसना दिल्या बद्दल त्याच्या दरमहाचा पगार वगैरे नियमाचा खर्च हिंदुस्थानास कांहीं नवीन पडत नाहीं आणि ह्मणून फौजफांटा उसना दिल्या कारणानें तेवढ्या खर्ची इतकी रक्कम हिंदुस्थान सरकारानें बचेत राखून पैदा करण्याची इच्छा करणें रास्त होणार नाहीं. हें तत्व प्रथम दर्शनीं चांगलें दिसतें पण विलायत सरकारानें जो फौज फांटा इंडियास पूर्वी मदती खातर दिला होता त्याचा खर्च तें लष्कर तयार करण्याच्या दिवसा पासून परत विलायतच्या बंदरीं पाय ठेवी पर्यंत हिंदुस्थानावर विलायत सरकारानें लादला होता ही गोष्ट विसरतां कामा नये. इंडियाच्या खजिन्याची कितीही लुटालूट झाली तरी हरकत नाहीं पण विलायत सरकारांस मोहिमचा सर्व फायदा मिळून खर्च मात्र फार्दिंग देखील पडता कामा नये. इंग्रजी राज्यपद्धतींत हें तत्व फार बलवत्तर आहे आहे आणि त्याच्या अनुसंधानानें सर्व घडामोडी घडत असतात.

---

आरोग्यविषयक खात्याचा गुदस्त सालाचा जो वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे तो चांगला विस्तारपूर्वक लिहिला असून त्यामध्यें पुष्कळ उपयुक्त माहिती गोंविलेली आहे. डाक्टर लिटल हे पुष्कळ वर्षांपासून वऱ्हाडांत सानिटरी कमिशनर आहेत. ते आपल्या कामांत मोठे दक्ष व मेहनती असल्यामुळें त्यांच्या जुन्या अनुभवाचा या प्रांतास मोठाच लाभ झाला आहे. या रिपोर्टांतील अनेक गोष्टी ध्यानांत धरण्या सारख्या आहेत. या रिपोर्टांतली माहिती शास्त्रीय स्वरूपाची विशेष असल्यामुळें मनोरंजक नसते आणि यांतील आंकड्यावरून जीं साधारण अनुमानें लोक काढतात त्या पैकीं कांहीं पुष्कळ अंशीं चुकतात व कांहीं भविष्यकालीन गोष्टींची नीटशी दर्शकें नसतात.

या रिपोर्टांतील एका भागांत कांहीं मुख्य मुख्य रोगांचा इतिहास दिला आहे. मृत्यूच्या दरबारांत जी प्रधान मंडळी आहे. त्यामध्यें पटकीचा रोग हा मुख्य प्रधान आहे. अर्थातच या रोगाचा इतिहासही आगोदर दिला आहे. पटकीच्या विकृती विषयीं लोकांस जी माहिती अवश्य ठाऊक असली पाहिजे तिच्या संबंधानें अजाणपणा बहुत लोकांमध्यें आढळतो. हा रोग फार भयंकर असून तो मृत्युलोकच्या वसतीचा क्षणभंगूरपणा पटकन मनुष्याच्या ध्यानांत आणून देतो. पटकीचा उपद्रव हल्लीं सर्व वऱ्हाडांत आढळतो. वाऱ्याची बाधा फार चमत्कारीक आहे. थोड्या घटकामध्यें सर्व शरीर हागओकींमुळें निचेष्टित होऊं लागतें, हातापायाला पेटके येतात, आणि देहाचें यंत्र इतकें विस्खळित होतें कीं स्वल्प कालांतच प्राणवायु पंचतत्वाला मिळून जातो. या रोगा विषयीं वैद्यशास्त्रामध्यें चिकित्सा असली तरी ती जितकी बारीक व चौकसपणाची पाहिजे तशी असल्याबद्दल वैद्यलोकही खात्री देत नाहींत. या रोगा वरील उपचारा संबंधानें लोकांचें अज्ञान फार आहे आणि त्यामुळें पुष्कळ माणसांस उपचार यथायोग्य न होऊन ते मृत्युमुखीं पडतात.

डाक्टर लिटल ह्मणतात कीं १८९४ च्या दिसेंबर महिन्यांत वणी जिल्ह्यांत १५८ माणसें हवेच्या उपद्रवानें मेलीं आणि हाच उपद्रव १८९५ सालांत फैलावून प्रत्येक जिल्ह्यांत उद्भवला व बारा महिने त्याची वस्ती प्रांतभर होती असें ह्मटलें असतां हरकत नाहीं. गेल्या पांच वर्षांच्या सरासरीनें पाहतां एक हजार लोक संख्ये मागें एक मनुष्य या हवेच्या रोगानें दगावला असें प्रमाण निघतें पण १८९५ सालीं ११९१९ माणसें पटकीनें मेलीं ह्मणजे १००० लोकसंख्येला ४.२ असें प्रमाण पडतें. गेल्या २८ वर्षांचा तक्ता तयार केला आहे त्यावरून असें दिसतें कीं १८७५ सालीं या रोगामुळें २२४६५ माणसें मेलीं ह्मणजे १००० लोकवस्ती मागें १९.६ माणसें दगावलीं. १८७८ व १८८३ या सालीं हें प्रमाण १०.२ व १० असें होतें. १८६९ साला सारखाच गुदस्ता कहर उसळला पण तो १८७५ सालच्या तिसऱ्या अंशानें होता.

१८९५ सालीं जानेवारींत फैलावत चाललेली पटकी फेब्रवारींत तिपटीनें वाढली ह्मणजे अनुक्रमें १०६ व ३०८ मनुष्यें या दा

न महिन्यांत मेलीं. मार्च, एप्रिल मे, जून व जुलै या महिन्यांत क्रमाक्रमानें ही मरणाची संख्या ६००, ७००, १३०८, १८३३, व ३४१९ अशी होती. पुढील पांच महिन्यांत ही संख्या २९०१, ९२२, १७४, १८, व ३४ अशी उतरत उतरत गेली. सारांश, सर्व वर्षभर पटकीचा उपद्रव चालूच होता. साधारणपणें आगष्ट व सप्तंबर या दोन महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत पटकीचा उपद्रव विशेष असतो पण १८९५ सालांत जुलै महिन्यांतच या रोगाची अखेर झाली आणि एकंदरीनें सर्व वर्षभर पटकीचें वास्तव्य झालें होतें.

गेल्या २८ वर्षांचा अनुभव असें सांगतो कीं हवेच्या उपद्रवाचा तडाखा वाशीम जिल्ह्यांत इतर पांचही जिल्ह्यापेक्षां अधिक असतो आणि ही गोष्ट अशी कां असावी याचें योग्य कारणच दाखविता येत नाहीं. वाशीम जिल्ह्यांतील गांवांची स्थिती स्वच्छतेच्या मानानें प्रांतामध्यें उत्तम आहे आणि असें असून हा रोग चांगल्या आरोग्याच्या ठिकाणीं इतका बलवत्तर असावा हें नवल होय. डाक्टर लिटल साहेबांस या बाबदींत मोठें गूढच पडलें आहे. वाशिम जिल्ह्याच्या खालोखाल पण इतर चार जिल्ह्यां पेक्षां अधिक असा पटकीचा जोर बुलढाणें जिल्ह्यांत आढळतो. वणी जिल्ह्याची त्या रोगा संबंधानें तिसरी प्रत लागते. अकोला व उमरावती हे दोन जिल्हे पटकीच्या उपद्रवाला सारखेच शरण जातात. सर्व प्रांतांत इलिचपूर जिल्हा पटकी पासून पुष्कळ अलिप्त आहे आणि तिकडील लोकांचें हें भाग्य होय. पटकीचा उपद्रव खेडेगांवा पेक्षां शहर गांवीं विशेष फैलावतो असें ही दुसरें अनुमान निघतें. १८९४ साली शेंदूरजन, वरूड, व पुसला या गांवीं पटकी विशेष होती पण १८९५ साली तेथें कांहींच उपद्रव नव्हत ही गोष्ट अगदीं चमत्कारिक होय. डाक्टर लिटल साहेबांस अशा स्थितीचें समर्थक स्पष्टीकरण देतां आलें नाहीं. वऱ्हाडांत लोकवस्तीची खेडेगांवें ५६६१ आहेत त्यापैकीं ६११ ठिकाणीं पटकी उद्भवली होती.

पटकी ज्या ज्या गांवीं प्रथम उद्भवली तेथें पूर्ण चौकशी करून साही जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जनांनीं जे रिपोर्ट सानिटरी कमिशनरकडे धाडलें त्यांचीं टिप्पणें सविस्तर डाक्टर लिटल यांनीं वार्षिक रिपोर्टांत उतरून घेतलीं आहेत. उमरावती जिल्ह्यांतील पिंपळ, उंबरडा, बोगी, व फ्रेजरपूर या गांवच्या हकीकतीमध्यें डाक्टर रो० ह्मणतात कीं पटकीचा रोग आसपासच्या बाहेर गांवाहून कांहीं आला नाहीं किंवा पिण्याच्या पाण्या संबंधानें वगैरे पूर्ववर्ती विशिष्ट कारणें दाखवितां येत नाहींत. वाशिम जिल्ह्यांत पोहर, काली व डिग्रस या गांवीं पटकी सुरू झाली तेव्हां पासून चौकशी करून तेथील सिव्हील सर्जन ह्मणतात कीं गांवाची स्वच्छता बरी असून पिण्याचें पाणी विहिरीचें साधारणपणें चांगलें होतें. आणि हा रोग हवेच्या फेरफारामुळें उत्पन्न होऊन इतर कारणामुळें वाढत असावा. आकोला जिल्ह्याचे सिव्हील सर्जन डाक्टर रेली लिहीतात कीं बोंडगांव, भोनगांव, भेटें व रहित यां गांवची हकीकत पाहतां हा रोग अस्वच्छतेमुळें व वाईट पाणी पिण्यामुळें झाला असावा आणि घरें दारें नीट नसून कुटुम्बांतील माणसांची गर्दी असल्यामुळें देखील या रोगाचें ठाणें जबर बसत असावें. आकोट गांवची अस्वच्छता व अमंगळपणा अती आहे. पेंवाच्या शेतखान्यामुळें विहिरीचें पाणी तेथें विशेष बिघडतें.

वरील प्रकारच्या हकीकती वरून डाक्टर लिटल साहेब ह्मणतात कीं वऱ्हाड प्रांतांत पटकीचा उपद्रव स्थलविशिष्ट किंवा लोकविशिष्ट रोगा प्रमाणें प्रांतिक आहे आणि सहजी कळून येण्या सारखीं पूर्ववर्ती कारणें असल्या शिवाय निसर्गतःच पटकीचा उद्भव पुष्कळ होतो. एका वर्षीं फक्त थोड्याच माणसांस पटकीचा वाखा होतो खरा पण पटकीचा रोग त्या स्थळीं सौम्य रूपानें कायमचा होऊन राहतो आणि पिण्याच्या पाण्यांतील दोषामुळें किंवा इतर दळणवळमुळें तो फैलावत नाहीं; तथापि पूर्वीं पटकीच्या सौम्य उपद्रवाच्या वेळीं जी आरोग्यकारक व्यवस्था होती किंवा जी स्थळविशिष्ट स्थिती होती तिच्यामध्यें कांहीं फरक पडला नाहीं तरी दुसऱ्या वर्षीं पटकी उग्ररूप धारण करिते व तिचा प्रसार ही वाढत जातो. पटकीच्या रोग्याच्या शरीरांतून बहेर पडलेल्या वस्तूंच्या संसर्गानें दूषित झालेले पदार्थ मनुष्याच्या पोटांत खाण्या पिण्याच्या वेळीं जातात तेव्हां कांहीं सूक्ष्म कृमिही जातात व ते पटकीचें मूळ बीजकारण आहेत अशी कल्पना जरी केली तरी हा मोठा गूढ प्रश्न आहे कीं पटकीचे सूक्ष्म कृमि एका वर्षीं अगदीं सौम्य उपद्रव कां देतात आणि दुसऱ्या वर्षीं तेच फार भयंकर प्राण हानि कां करितात. डाक्टर लिटल सारख्या अनुभवी मनुष्याच्या मनानें पटकी विषयीं कांहींच कल्पना कायम केलेली नाहीं तथापि अलिशान रेसिडेंट साहेबांच्या ह्मणण्या प्रमाणें ही गोष्ट खरी कीं पिण्याचें पाणी निर्मळ व अदूषित नसलें आणि इतर स्वच्छता ही नसलीं किंवा कमी असलीं तर पटकीच्या रोगास जोर पोहचतो.

---

अर्थशास्त्रज्ञ आपल्या शास्त्रांत निमग्न व तल्लीन होतात तेव्हां सर्व सृष्टी त्यांच्या दृष्टीनें कांहीं विचित्रच बनते. ते मनुष्यपणाची व्याख्या देखील निराळी बनवितात आणि त्यांच्या मतानें मनुष्य हा धनसंपादक प्राणी होतो. धन ह्मणजे सर्व जगांतील कर्तुमकर्तु शक्ती होय आणि धन प्राप्तीसाठीं सर्व आयुष्य वेंचावें हीच जन्माची सार्थकता आहे. असें ते समजतात. धन प्राप्त झालें ह्मणजे मनोरथ परिपूर्ण झाले आणि तेंच जन्माचें खरें साफल्य होय. मनुष्यपणाचें हें अंतरंग अर्थशास्त्रज्ञांनीं शोधून काढलें व वस्तुतः त्यांच्या तात्विक दृष्टीनें तें खरें आहे. सर्व जग ही धनप्राप्तीची कार्यभूमि आहे आणि जगाचा उपयोग याच तत्वानें अर्थशास्त्रांत धरला आहे.

पण अर्थप्राप्तीला नियामक व संक्षेपक असेही दुसरे विचार कांहीं आहेत ते विसरतां कामा नये. मनुष्यस्वभावाच्या वरील लाक्षणिक खुबे प्रमाणें मनुष्य सांप्रत अर्थ संपादण्या मध्यें सर्वस्वी गुंतला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, अप्रतिबंध व्यापार, किंवा आधुनिक जीवनस्पर्धा याच मनुष्यवृत्तीमुळें प्रचलित झाली आहे. अर्थसंपादनाची नैसर्गिक प्रवृत्ती आणि व्यक्तिस्वातंत्र्य, अप्रतिबंध व्यापार व जीवनस्पर्धा या उभयतांच्या संगमामुळें परस्परावर अनेक परिणाम घडले आहेत आणि ही क्रियाप्रतिक्रिया परिणामीं समाजाला अहितावह होत चालली आहे.

अर्थ हा मनुष्याचा चाकर राहिला नाहीं तर तो हल्लीं धनी बनला आहे. मनुष्याला कर्तव्य बजाण्याचें साधन ह्मणजे अर्थ असावा पण अर्थसंपादन हेंच मनुष्याचें कर्तव्य हल्लीं बनलें आहे. अर्थसंपादन हीच आयुष्याची इतिश्री आहे अशी दुष्ट कल्पना प्ररूढ व प्रिय होत गेल्यामुळें कित्येक राष्ट्रें देखील आधिभौतिक प्रवृत्तींचीं बनलीं आहेत आणि सांपत्तिक निजध्यासामुळें मनुष्याच्या व राष्ट्राच्या इतर चांगल्या प्रवृत्तींचा लोप होत चालला आहे.

अशा स्थितीचें दर्शन इंग्लंडांत उत्तम होतें आणि सहवासानें इंडिया देश देखील त्या अधःपतनानें आपला पूर्वार्जित भूतदयेचा नांव लौकिक गमावीत आहे. ग्लाडस्टन साहेबांच्या तोडीचा इंग्लंडांत दुसरा विचारी मुत्सद्दी नाहीं. त्यांनीं स्पष्ट लिहिलें आहे कीं इंग्लंडची धनदौलत इंग्लिश समाजाला विघातक होत आहे. धनदौलतीचा इंग्लंडदेश दासानुदास झाला आहे आणि दास्यवृत्ती मुळें स्वामीत्व लयास गेलें आणि स्वामित्वाबरोबरच इतर पारमार्थिक सद्गुण लोप पावले. आमच्या देशाची स्थिती देखील इंग्लंड देशाला अनुरूपच आहे. धनतृष्णेचा संसर्गजन्य रोग आमच्या राष्ट्रासही जडला आहे. व्यक्तिविषयक सुखाभिलाष, चैनी व ऐषआराम वाढले आहेत. स्वसुखा शिवाय दुसरें कांहीं नाहीं आणि स्वसुखप्राप्तीला अन्य सर्व गोष्टी साधनद्वारें समजतात . आर्यभूमीचे पारमार्थिक विचार सर्व बुडाले. परोपकार व परदुःखहरण हीं तत्वतः बदललीं आहेत. हल्लीं परोपकार व परदुःखहरण जर कोणी करील तर तीं या गोष्टी स्वसुखाच्या आशेनें करीत असतो पारमार्थिक दृष्टीनें स्वार्थत्याग हाच आनंदनिधी किंवा खरा स्वार्थलाभ आहे असा पूर्वीं सार्वत्रिक राष्ट्रीय समज होता पण हल्लीं त्या उदार व सत्वस्थ वृत्तीनें पाश्चिमात्य विद्येच्या प्रभावानें अस्तंगत होत चालल्या आहेत. आणि पाश्चिमात्य विद्येनें विभूषित लोक धनासाठीं किती जीवप्राण करितात व प्राप्त धनाचा व्यय स्वसुखासाठींच कसा सर्वथैव करितात ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवास आली ह्मणजे आमच्या वचनाची सत्यता दिसून येईल. हिंदुधर्माची श्रेष्ठता त्या धर्मांतील पारमार्थिक विचारामध्यें आहे आणि या विचाराचें पुनरुज्जीवन आमच्या समाजाच्या कल्याणाला अत्यंत आवश्यक आहे. हल्लीं समाजांत परस्पराविषयीं अनास्था, त्रयस्थपणा किंवा बेपरवाई उत्पन्न झाली आहे आणि मीच सिंह व मीच व्याघ्र असा अहंपणा व स्वार्थनिष्ठा हीं सैरावैरा चमकूं लागलीं आहेत. हे प्रकार व्यक्तिस्वातंत्र्याचे दुष्परिणाम आहेत आणि अशाच प्रकारामुळें कुटुम्बांतील संयुक्तपणा व समदुःखी स्वभाव लोपून गेला आहे. अशी स्थिती सार्वत्रिक होत गेली ह्मणजे समाज नष्टप्राय झाल्या प्रमाणेंच आहे. सांप्रत वाईट होत चाललेल्या समाजाच्या स्थितीला कांहीं तारक उपाय करण्यांत येईल तर बरें.

---

व्याजाच्या दरा विषयीं कांहीं प्रतिबंधक कायदा करावा असा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. हल्लीं त्या कायद्याचा मसुदा व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिला पुढें आला आहे आणि त्याचा यथायोग्य विचार जितका लवकर होईल तितकें फार बरें. सरकारचा कायदा झाला ह्मणजे गैरवाजवी व्याज घेण्याचा सावकारी प्रघात निःसंशय मोडेल असाही भरंवसा नाहीं. जसजशा कायद्याच्या नवीन अडचणी येतात तसतसे सावकारही कायदा निर्फळ करण्याचे उपाय योजतात. ऋणको गरजवंत असतो आणि आपल्या गरजेसाठीं तो सावकाराच्या वाटेल त्या अटी कबूल करितो. तथापि व्याजबऱ्याच्या व्यापाराचा सरकारी कायद्यानें पुष्कळ प्रतिकार व प्रतिषेध होईल व जो घातुक धंदा आज मित्तीला फैलावला आहे तो थोडा बहूत कमो कमी होत जाईल आणि देशांतील संपत्तीचा विनियोग खरोखर लाभकारक होऊन साम्पत्तिक उद्योगवृद्धि होईल.

व्याजाच्या पायीं सावकार कसे श्रीमान व लक्ष्मीपुत्र बनतात आणि गरजूं कुळें कशीं सर्व जिन्नगीला आंचवितात व भिकारी होतात याचें दिग्दर्शन आह्मी दोन आठवड्या पूर्वीं केलेलेंच आहे. इंडियांत जर कोणत्या प्रांतासाठीं व्याजाचा कायदा पाहिजे असेल तर तो प्रथम आमच्या प्रांतासाठीं केला पाहिजे. कांहीं विरळ व वंचक लोक श्रीमंत होत चाललें आहत. त्यांची श्रीमंती उत्तरोत्तर श्रेढीच्या प्रमाणानें वाढत जाऊन त्यांच्या पासून वेगळा असा गरीब लोकांचा अनाथ व निरुपद्रवी वर्ग बनत चालला आहे. या दोन वर्गामध्यें काडीमात्र स्नेहभाव किंवा दयाशीलपणा नाहीं व त्यांचा भेदाभेद असाच वाढता राहिला तर तो समाजाच्या सुस्थितीला देखील बाधक होईल. अशा वेळा ह्मणजे समाजक्रांतीच्या व राज्यक्रांतीच्या असतात. आणि या वेळा टाळण्याचा खरा मार्ग ह्मणजे देशाची साम्पत्तिक स्थिति सुधारली पाहिजे. देशामध्यें कलाकौशल्याचे कारखाने निघून सर्व लोकांचा चरितार्थ त्या त्या उद्योगधंद्यांत चलला पाहिजे. आणि ही गोष्ट घडण्यास देशांतील भांडवल एकत्र होऊन देशी धंद्याच्या उभारणीकडे लागलें पाहिजे. भांडवलाचा असा उपयोग होण्यासाठीं खोटें किंवा विघातक व्याजबऱ्यासारखे व्यापार ठार बुडविण्याच्या वाटा खुल्या केल्या पाहिजेत आणि याच दृष्टीनें आह्मास व्याजाचा नियामक कायदा पाहिजे.

---

The Berar Samachar

MONDAY AUGUST

10 1896

The House of Lords is bad as that of the Commons. India is after all saddled with the charges

of the Indian contingent of the Suakin expedition. Lord Hamilton has won the day. Both the houses resounded with the thrilling eloquence of Sir John Morley, Sir H. Fowler, Lord Reay, Lord Rosebury, Lord Kimberley &c. The The ministerial supporters turned deaf ears to whatever sentiments the national heart echoed in the speeches of those who opposed the Secretary of State's proposal. The principle of charging India with the daily pay of troops lent to the paramount power makes light of all notions of justice, fairness and right conscience. The rule of ap portioning charges of an expedition between England and India illu-strates the disadvantages which a dwarf works under in an open fight with the giant. The political influences of the British nation are in a full swing when India subserves the selfish, mean and narrow ends of a despotic policy. We hope Lord Hamilton's mo-mentary victory will be the dome of ill fame and unrighteous deeds towards India. A strong current of political opinion is against this victory and the English people are not blind to the sui-cidal effects of such a decision of the Parliament. India is hunted down to a state of desperation and helplessness. Indian loyalty which is the main stay of the British empire is on the wane. This is high time for England to vindicate her good name and sublime dig-nity in the Indian mind. Indian questions ought not to be shelved or decided to serve the English interests alone. This signal piece of injustice done to India in re-gard to the Suakin charges is one of a series of the past. The *living* selfishness of the British nation is the thread that holds together the works of injustice. Our only hope is in revolutionizing the present politics. A protest after protest must mark the arrant pro-gress of the State—Secretary's vagaries. Lord Ripon has laid the foundations of such a protest as far back as 1882. His lordship is enshrined in Indian hearts and we would ask people to read in his eloquent thoughts the tone which the English politics should assume in the near future:—

"The economic condition of the people of India, upon whose prosperity the continued soundness of the finan-cial position must ultimately rest, is not altogether satisfactory, although it may be said to be improving. The proverty of the people of India is a fact which is notorious, and, indeed, has been so frequently discussed that it is unnecessary that we should, on the present occasion, dwell on it at any length. That poverty is abundantly attested by the prevailing low rate of wages, by the statistics which show the pressure of the population on the soil, by the absence of accumulated capital, and by the rough calculation which has recently been made, that average income per head of population is only Rs. 27 a year. It is clear, at a glance, that to a population so situated the maintenance of peace is a matter of vital interest. To such a people low taxation, a careful economy in the re-sources of the country, and prudent reforms in its fiscal system are essential It may especially be said that the pro-sperity of the people of India depends largely upon the conditions under which agricultural pursuits are carried on. We may give India free trade; we may reduce taxation; we may make roads, railways, and canals; we may give every legitimate encouragemet to the establishment of local industries and of local self-government; but un-less the relations between landlord and tenant on the one hand, and between the State and owners of land on the other, are placed on sound footing, we can never hope to ensure the pro-sperity of the country. We have re-cently had under our consideration this importnat subject, and we have been led to the conclusion that, at all events in some provinces of India, the consideratiens under which our land revenue is assessed and collected, and also the relations between land and tanant, are not on a satisfactory foot-ing.

"Looking at the question from an-other point of view, we submit that the proposal now under discussion is likely to exercise a baneful effect upon the political connection between England and India. If the lesson be once learnt that, a war having been commenced in which large English and relatively small Indian interests are involved, a considerable portion of the cost of that war may, neverteeless, be readily thrown upon the Indian tax-payers, we cannot but think that a strong temptation will arise to revert to this procedure, and that thus the political connection between India and England will be subject to a severe strain. That any such tendency as that to which we allude should gain ground in England would, we venture to think, be inconsistent which those high principles by which, we feel as-sured, Her Majest's Government would wish the political action of England to be guided. From the Indian point of view, the baneful effect of any such tendency is so obvious as scarcely to require indication. The Natives of India are daily becoming more interest-ed in the current political events of the day. The action both of Her Majesty's Government and of the Go-vernment of India is freely criticized by a free Press. English party feeling often in a most bitter form, is shown in the writings of a considerable section of the Anglo-Indian Press, whose teaching is received, it must be remem-bered, by a population not sufficiently advanced in political education to be able to appreciate at its true value the exaggerated style of condemnation which party feeling often engenders. Under these circumstances we can con-ceive nothing which is more likely to alienate from us the feelings of the motives of this country than that it should be thought that the action of Her Majesty's Government, even though it be approved by Parliament, does not partake of a beneficent nature but rather is directed towards imposing burdens on the Indian tax-payers with a view to relieving those which might more properly be borne by the tax-payers of the United Kingdom. We believe that at no period of Indian his tory have the Natives of India been more contented or more loyolly dispos ed towards the rule of Her Majesty the Queen Empress than at present, and that at no time have satisfactory signs of moral and material progress been more prominent. We most earnestly deprecate a measure, such as that which is now proposed, as being calcu'lated to check the current of that-contentment, loyalty, and progress. The taxpaying community of England is amongst the wealthiest, whilst that of India is amongst the poorest, in the world. It cannot, surely, be in con sonance with justice or sound imperial policy that the wealthy and dominant race should relieve itself of charges at the expense of the poor and subject race, if the smallest doubt can be thrown on the equity of such a proceeding."

---

On the occasion of opening the In-dian Institute at Oxford Lord Hamil ton highly valued the usefulness o such a center of teaching and know-ledge on all Indian subjects to the fu-ture administrators of India and paid a tribute of honor to the old English Civilians who established the Indian Empire. Let us learn the self-compla-cent view of the Secretary of State to impart to us a moral. "How to value one-self."

"Great Britain was pround of the per-formances of her sons in different parts of the globe, but he thought none of their feats were comparable to that which they had accomplished in India. In other parts of the world they had done equal deeds of heroism, and per-haps equal administrative ability might have been shown, but the remarkable result of their performances of India was that the exploits of the few had beneflited the existence of many, and that the Government, a progressive and enlightened Government as it was, had had its foundation securely laid upon the shoulders and labours of a few individuals. He was no hero wor-shipper, and he did not say it out of any wish to flatter them, but if there was any body of men to whom he would willingly take off his hat as bene-factors of humanity, it was the Indian Civil Service. (Cheers.) It was very difficult for any of them who had never been in India to conceive, or even to realise, what the nature and magnitude of their work was. Just let them try and conceive it by reversing the pic-ture. Let them assume for a moment that Europe was India, and that a small portion of that India was England. There were diversities of race, of reli-gion, of customs and institutions on the Continent of Europe, but these va-rieties were not one whit greater than those which abounded in the continent of India. Let them conceive the whole Government and administration of Europe, with all these diversities, to be carried on by a few natives from India who were annually recruited by a draft of young men from that country. The task, they would say, was an impos-sible task, and beyond the capacity of human administration; and yet the In-dian Civil Service had undertaken that task, and they had performed it so equitably, so thoroughly and so incor-ruptibly that within a few generations the Indian Government had developed into one of the most perfect executive machines the world had ever seen (Cheers.)"

---

## वऱ्हाड

हवामान—पाऊस मध्यंतरीं पडतच असतो आणि कांहीं वेळ उघाडीही असते. एकंदर पाऊस २४ इंच झाला. हवा रोगट आहे. हवेचा उपद्रव चालूच आहे आणि ही देवाज्ञा फार तावडतोबीची व जलदीची आहे.

परतवाडा मुनसिपाल कमिटीनें धर्मशाळा मच्छी बजार, भाजी बाजार व स्मशान भू-मी यांच्या संबंधानें जे नवीन नियम केले होते ते अलिशान रेसिडेंटाच्या मंजुरातीनें अंमलांत आले आहेत.

मि. सी. एच. प्राइस एक्स्ट्रा असि० क-मिशनर, वर्ग २ यवतमाळ यांस गेल्या १४ वे तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

मि. बी. क्ले असि. कमिशनर, उमरावती यांस १ महिन्याची हक्काची रजा येत्या १२ वे तारखे पासून मिळाली.

यंदा वऱ्हाडच्या वकिलीच्या परीक्षेला येत्या सप्टेंबरच्या ३ ऱ्या तारखेस उमरावती-स सुरुवात होईल. वऱ्हाड साठीं ३५ व रेसिडेन्सी साठीं १ मिळून ३६ उमेदवार आहेत. यंदा उमेदवारांची संख्या फार कमी आहे.

रा. रा. यशवंत रायभान पाटील, नायब तहशीलदार वर्ग २, चांदूर यांस येत्या १५ वे तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली आणि त्या रजेंत रा. रा. गोविंद महादेव शहानवीस यांस नायब तह-शिलदार नेमलें.

रा. रा. सी. देशिकाचारी, हेड आकौं-टंट, पब्लीक वर्कस खातें, आकोला यांची बदली धारवाडास झाली आहे.

क्याप्टन आयव्हर्स, माजिस्ट्रेट वर्ग आ-कोला यांच्या समोर एक जीवें मारण्याच्या धमकीची फिर्याद होती. फिर्यादी तर्फेचा साक्षीदार गंगाराम पाटील, सोनाळें यानें खोटी जबानी दिली असें दिसल्या वरून तावडतोब त्याच्यावर मोकद्दमा होऊन तीन महिने सक्त मजूरी व ५० रुपये दंड अशी शिक्षा देण्यांत आली.

गेल्या मे महिन्यांत वऱ्हाडांत ८००२ माणसें जन्मलीं व १३३७५ मरण पावलीं.

गतवर्षी सरकीच्या कापसाचें रेलभाडें कमी झालें होतें पण त्यामुळें कापसाच्या गठडींत लबाडी होत असे व कंपनीचा तोटा होई असें कळल्यावरून रेलवे कंपनीनें सरकीच्या कापसाचा दर पूर्वी प्रमाणें कायम केला.

रा० रा० यशवंत गोविंद केसकर, प्रमोदसिंधुचे प्रकाशक, यांस बिनसरकारी एजंटपणाचा अधिकार मि. आबर्ड जुडिशिअल कमिशनर साहेबांनीं दिला आहे. एजंटपणा नक्कला मिळविण्या संबंधानें दिला आहे. दिवाणी व फौजदारी कागदाच्या नक्कला ज्या पक्षकारास लागतील त्यांनीं नक्कला घेण्या विषयीं सदर्हू गृहस्थास पत्र लिहावें ह्मणजे ते नक्कलेचा अर्ज देऊन त्या नक्कला लोकांस धाडतील. सध्यां हा एजंटपणा हायकोर्ट व सिव्हील-सेशन कोर्ट या कोर्टी-पुरतांच दिला आहे. एजंटाच्या मेहनतान्या बद्दल त्यांस खालील दरा प्रमाणें कमिशन आकारण्याची परवानगी दिली आहे:—

| नक्कलेच्या फिया रक्कमेची इयता रुपये | कमिशन रु० | कमिशन आ० |
|---|---|---|
| ५ | | ४ |
| १० | | ८ |
| १५ | | १२ |
| २० | १ | |
| अमर्याद | २ | |

---

## वर्तमानसार.

क्रीट येथील टर्कींची फौज फार क्रूरपणानें वागत असल्याबद्दल रशियन बादशहास वाईट वाटत आहे. पुष्कळ टर्कलोक हेराक्लेनशहरांत शिरण्यास तयार झाले असतां गव्हरनरानें त्यांस मनाई केली. या क्रीट लोकांचें मागणें जर कबूल झालें नाहीं तर ते लढाई करण्यास तयार होतील असें आतां दिसूं लागलें आहे.

क्रीट बेटांतला दंगा वाढत असून त्याच्या पूर्व भागांत तो जास्त होत आहे व तिकडून ग्रीक लोक त्या बंडखोरांस हत्यारें व दारूगोळा यांचा पुरवठा करीत असल्यामुळें टर्की व ग्रीस या दोन्ही सरकारांच्या दरम्यानचें वितुष्ट वाढत आहे; आणि तुमचें हें करणें गैर आहे अशी टर्कीनें ग्रीस सरकारास नोटिसही दिली आहे. ग्रीसचें हें करणें इतर राजांसही नापसंत आहे.

जर्मनीची एक लढाऊ बोट बुडाली फक्त १० खलाशी मात्र जिवंत निघाले.

मासेडोनिया प्रकरण जास्त बळावत चाललें आहे. रहिवाशी लोक ग्रीक टोळ्यांच्या बाजूचे असून ते त्यांस मदतही करीत आहे.

मासेडोनिया व एपिरस या ठिकाणीं टर्की आपली फौज जमा करीत आहे.

फोर्मोसा बेटांतल्या जपानी फौजेस निघून जाण्याची रशियानें ताकीद केली आहे आणि त्या ताकिदीस जोर आणण्याकरतां लाडीवोस्टक येथें रशिया आपली एक लाख फौज जमा करीत आहे. कांहीं आरमारही तयार केलें आहे.

येत्या डीसेंबरांत झांशी येथें २०.००० फौजेची एक लटकी लढाई होणार आहे. स्वता कमांडर इनचीफ हे तेथें हजर रहाणार असून मुंबईहूनही कांहीं पलटणी जावयाच्या आहेत.

अतिवृष्टीचे देखावे.

वाई शहराभोंवती पाणीच पाणी होऊन वाई एक बेट दिसत होतें. पुष्कळ घरांत पाणी शिरलें, तेली, भुसारी, परीट यांचीं धान्यें, बीजें व कपडे यांचा फडशा उडाला.

नाशीकच्या गंगेचा महापूर १८७२ तल्या सिंहस्थासारखा झाला. पेशव्यांच्या वाड्यास पाणी लागलें. तयार होत असलेल्या पुलास थोडें नुकसान झालें, एक गोसावी वाहून गेला.

धुळ्याच्या पांजरा नदीस महापूर येऊन गांवांत पाणी शिरलें. १८७२ च्या प्रळयाचा देखावा दिसत होता.

पुण्याच्या नदीस महापूर येऊन ओंकारेश्वरास स्नान झालें. खडकी व लश्कर यांतील सखल भागांतील घरें व बंगले पाण्यानें भरून गेले होते.

सुरतेस एका दिवसांत १२ इंच पाऊस पडला. तापी नदीचें पाणी ४० फूट वाढलें होतें.

भडोच जवळ नर्मदेस इतका महापूर आला कीं, पूल कायम राहतो कीं नाहीं याचीहि शंका वाटूं लागली होती एका रात्रींत १० इंच पाऊस पडला.

बलसाड येथें पाणीच पाणी होऊन रस्ते नद्यासारखे दिसत होते.

नवसरीस पूर्णा नदीस महापूर होऊन पाणीच पाणी झालें व आजू बाजूच्या प्रांतांत फार नुकसान झालें.

बडोदा रेलवेच्या रस्त्यास पुष्कळ ठिकाणीं फार नुकसान झालें व विरार आणि सोफाला यांच्या दरम्यान आगगाडी चालणें बंद झालें होतें.

कल्याण गांव व कल्याण स्टेशन यांच्या दरम्यान इतकें पाणी झालें होतें कीं, लोकांस होड्यांत बसून जावें यावें लागे. कल्याण स्टेशनाच्या दोन्ही बाजूस जसा काय समुद्र बनला होता.

नेरळ व बदलापूर यांच्या दरम्यान रेलवेचा रस्ता वाहून गेला व चहूंकडे पाण्याचा समुद्र बनल्यामुळें पुणें व मुंबई यांच्या दरम्यानच्या आगगाड्या या रस्त्यानें न चालतां नगरावरून जाऊं येऊं लागल्या होत्या.

जंबुका नदीस महापूर येऊन गायकवाडांची डभई रेलवे बंद झाली होती.

सुरतेस मकाई पुलाजवळ ९७ फूट पाणी वाढलें होतें. आसपासचीं कित्येक गांवें पाण्यांत पोहोत आहेत असें दिसत होतें.

भडोचेस दोन दिवसांत २० इंच पाऊस पडला. सगळ्या पावसाळ्यांत तेथें ४० इंच पडत असतो. अर्थात नर्मदेचा पूर फार भयंकर झाला व आसपासचीं पुष्कळ खेडीं जलमय होऊन गेलीं.

बडोदा रेलवेच्या विरार जवळच्या रस्त्यावर अठरा फूट पाणी वाढलें होतें.

भडगावाचें फारच नुकसान झालें. सुमारें हजार आठशें घरें वाहून गेलीं, माणसें व गुरें यांत किती सांपडलीं असतील यांचा अंदाजही नाहीं.

कृष्णा व वारणा या नद्यास मोठाले पूर येऊन टपाल बंद झालें होतें, कृष्णेच्या महापूरानें तर खेड गांवचा महारवाडा वाहून गेला असून आणखी कांहीं ठिकाणींही असाच प्रकार झाल्याचें समजतें.

धुळ्यास पाऊस अतिशय पडत आहे. गिरणा नदीस महापूर येऊन भडगांव, मेहुणबारें वगैरे तेथचे गांव एका मागें एक या प्रमाणें वाहून गेले; कांहीं लहान सहान गांव तर संबंधचे संबंध वाहून गेले.

मालेगांव व संगमेश्वर मिळून ४०० घरें वाहून गेलीं.

अति वृष्टीमुळें बडोदा रेलवेच्या गाड्या पालघर येथें बंद झाल्या होत्या. अ. द.

पैसा नसला तर चालेल, ह्मणजे पैशाशिवाय सुखानें आयुष्य घालवितां येईल; पण विवेक नसला ह्मणजे मात्र कठीण अवस्था !

शहाणा मनुष्य तीन गोष्टींनीं ओळखावा:—

१ अमूक रीतीनें वागा, असें लोकांस सांगून आपणही त्याच प्रमाणें वागतो; २, न्यायाला सोडून कधींही व कोणत्याही प्रसंगीं वागत नाहीं; ३, आपल्या भोंवतालच्यांचा दुबळेपणा किंवा त्यांचे दोष असतांही यांना संभाळून घेतो या प्रमाणें जो वागतो तोच खरा शहाणा व दूरदर्शी.

हाता खालच्यांस वागवितांना तुह्मांस ताबेदारी करण्याचा प्रसंग आला असतां तुमची स्थिति कशी होईल, तें लक्ष्यांत आणीत जा, आणि त्या प्रमाणें इतरांस वागवा. दी. बं.

पैशाचा पूर—सरकारानें ४ कोट रुपये कर्ज मागण्यासाठीं टेंडरें मागितलीं होतीं. त्या प्रमाणें १२ कोट रुपये सरकारच्या अटी प्रमाणें देण्या साठीं लोकांनीं टेंडरें पाठविलीं होतीं. हीं बहुतक टेंडरें निरनिराळ्या इलाख्यांत सरकारच्या आश्रयाखालीं असलेल्या ब्यांकानींच दिलीं आहेत असें समजतें.

आंब्यांची इंग्लंडास रवानगी—आतां व्यापारी लोक न कुजतां आंबे विलायतेस पाठवूं लागले आहेत. तेथें दर आंब्याची किंमत १२ पासून १९ पेन्स पर्यंत ह्मणजे सुमारें ८।० येते असें समजतें. युरोपियन तऱ्हेनें बंदोबस्तानें इकडील फळफळावळ इंग्लंडास जाऊं लागली असतां बराच फायदा होईल.

डा० हाफकिन—पुण्याच्या सोजीर लोकांत महामारीचा आजार सुरू झाल्यामुळें १३० सोजीर लोकांनीं आपण डाक्टर हाफकिनचा महामारीचा तोडगा आपल्यावर करून घेण्यास आपण तयार आहों असें सरकारास कळविलें आहे. त्यावरून डाक्टर हाफकिन हे ते तोडगे करण्यासाठीं पुण्यास आले आहेत.

कोल्हापूरच्या महाराजांचा देशाभिमान--कलाकौशल्य शिकण्यासाठीं कोल्हापुराहून एक गृहस्थ जपान देशास जात आहे त्यास सालीना ४००० रुपयांची स्कालरशिप देण्याचा उदार निश्चय महाराजांनीं केला आहे ही गोष्ट ऐकून पुष्कळांस आनंद होईल.

ग्वाल्हेर संस्थानच्या गुणा प्रांतांत दुष्काळ पडला आहे. त्यांतील लोकांस मोफत अन्न देण्याकरितां महाराजानीं मुद्दाम एक कामगार तिकडे पाठविला आहे.

भगवद्गीतेचें इंग्रजींत भाषांतर होऊन शिवाय ग्रीक फ्रेंच जर्मन आणि इटालियन याही भाषांत तें झालें आहे अगदीं अलीकडे श्री क्षेत्र काशी येथलि; बाबू प्रमददास मित्र यांनीं तिचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. हे गृहस्थ प्रो० ग्रिफिथ व डा० बलटाईन यांचे शिष्य आहेत. यांनीं इंग्रजी भाषेचें अध्ययन फारच उत्तम प्रकारें केलें असून हे कट्टे हिंदु धर्माभिमानी आहेत. गु० सू०

"ज्युलीव्हर्नी" या नांवाच्या गृहस्थास सगळ्या पृथ्वीची प्रदक्षिणा करण्यास अवघे ८० दिवस लागले. तेव्हां हल्लीच्या काळीं "ॲन्टवर्प ज्याग्रफिकल सोसायटी" मध्यें निघाला असून त्याचें उत्तर एका भूशास्त्रवेत्त्यानें असें दिलें आहे कीं, "जर मनुष्य पूर्वभागानें प्रवास करण्यास निघाला तर सगळ्या पृथ्वीची प्रदक्षिणा निदान ६९ दिवसांत करूं शकेल" परंतु याहून पुढें कांहीं कालानें पृथ्वीप्रदक्षिणा ४९ दिवसांत होऊं शकेल. विद्यमान स्थितीवरून आणखी दहा पंधरा वर्षांनीं लोक आगगाडीच्या योगानें पृथ्वी भोंवती प्रदक्षिणा करूं लागतील. सारांश, या सुधारणेच्या काळांत व ज्या देशांत यांत्रिक कलाकौशल्याची अगदीं परमावधि झालेली आहे त्या देशांतील लोक खरोखर कांहीं दिवसांनीं या अफाट पृथ्वीला प्रदक्षिणा घालून पुन्हा आपल्या ठिकाणीं परत २४ दिवसांत येऊं शकतील असें मानण्यास हरकत नाहीं.

सॅंडवुईच बेटांत मुलें रांगूं चालूं लागलीं नाहींत तोंच त्यांना त्यांच्या आया पोहायला शिकवितात. त्या असें ह्मणतात कीं, "मुलें तान्ही आहेत तोंच त्यांना जर पाण्यांत पोहावयास लाविलें, तर तीं पुढें चांगलीं सशक्त होऊन तीं चांगलीं वाढीस लागतात. त्यांचे हातपायादि अवयव व त्यांत विशेषकरून त्यांची छाती चांगली भरून येते व विशालही होते. ह्मणून त्या बेटांतील बायकांना मुलें झालीं ह्मणजे त्या आपलीं मुलें समुद्रतीरीं पाण्यांत नेऊन त्यांचे हातपाय धरून पाण्यांत खेळवितात. प्रथमतः त्यांच्या कंबरेला धरून त्याना पाण्यावर पालथे टाकितात. त्याला हातपाय हालविण्यास शिकवितात. याप्रमाणें कांहीं दिवस केलें ह्मणजे मुलांना पोहण्याची चांगली संवय होते. एकदां ही पोहण्याची विद्या त्यांना साधली ह्मणजे तीं मुलें बराच वेळपर्यंत आपलीं पाण्यांतच खेळत बसतात. करमणूक.

ग्वाल्हेरच्या महाराजांनीं रयते पासून नजर नजराणा घेण्याचे मना केलें. फार चांगलें.

विलायतेंत अशी एक मुलगी नुक्तीच पाहण्यांत आली आहे कीं, ती एका कालीं दोन्ही हातांनीं एकदम लिहूं शकते असें एकजण कळवितो.

झांकलेल्या वस्तूचा फोटो काढून घेऊन तिची स्थिति समजून घेतां येते. पण प्रसिद्ध विद्युच्छास्त्री एडिसन यांनीं असा एक चष्मा तयार केला आहे कीं, तो डोळ्यापुढें धरला कीं, त्यांतून झांकलेल्या जागीं काय व कशी स्थिति आहे ती समजते. गरोदर स्त्रीचें उदर हा चष्मा लावून बघितलें कीं, आंत मुलगा आहे किंवा मुलगी आहे हें समजतें.

मद्रास इलाख्यांत कापशीचे उत्पन्न चांगलें येतें ह्मणून इंग्लंडांतून दोनशें युरोपियन लोक मद्रासेस येऊन दाखल झाले आहेत. आमच्या देशांतील भूमीचा कस घेऊन जाण्यास पाश्चात्य लोक यावेत व आमच्यांतील जाड्या विद्वानांनीं व धनाढ्यांनीं तोंडावरच्या माशा मारीत बसावें हें केवढें आश्चर्य ? न्या. सु०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ..........०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as 5
Six monthly ......... 3 ...... ... ...., 8 as
Single copy ............... ...... .. 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX AKOLA MONDAY AUGUST 17 1896 NO 32

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १७ माहे आगस्ट सन १८९६ इ० अंक ३२

## जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. क्रा. १९ मिसल नंबर ७

१८९६

विद्यमान सिवील ज्यडज साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— जानजी

बापाचें नांव दुलाजी कुणबी

राहणार— कळंबेश्वर तालुके अकोला

जिल्हा—अकोला यांस मयत

भिवाजी बापाचे नांव देवाजी राहणार कळंबेश्वर तालुके अकोला जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २९ माहे आगष्ट सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशीं होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ८ माहे आगष्ट सन १८९६.

Sk. Ismail
सिव्हिल जड्ज्य.

---

NOTICE

The following rules for the regulation and inspection of serais, meat and vegetable markets, and burning and burial grounds within the limits of the Ellichpur Civil Station Municipality having been made by the Municipal Committee undersub-sections (1)(e),(1)(g), and 2 of section 116 of the Berar Municipal Law, 1886, have been confirmed by the Resident under section 116 (3) of the said Law:-

PART. 1.—Serais.

1 Public serais under the management of the Municipal Committee may be used by bona fide travellers only.

2 No traveller shall be allowed to reside in a serai for more than 72 hours continuously, except by express permission from a responsible officer of the Municipality.

3. The Committee may temporarily close a serai to the public, and may divert it to a temporary special use.

4. Any person who suffers from an infectious disease or who misconducts himself may be removed from a public serai by any responsible officer of the Municipality.

5. Every serai under municipal management will be supervised by the Secretary, who will primarily be responsible for its proper sanitation and up-keep and for the due observance of these rules.

6. The Committee may, at its discretion, reserve for the use of respectable travellers a room or rooms in any public serai under municipal management, and may charge fees for such reserved accommodation at the rate of four annas per room per diem.

PART11— Meat markets.

I. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time, appoint a place or places to be used as a meat market or meat markets.

2. A meat market may be used for exposing for sale the following articles only:—

(a) Animal flesh intended as human food.

(b) Fish, fresh or dried.

Nothing not inteded for sale shall be admitted to the market.

3. Sites within a market will be allotted to vendors within which they must keep their shops, and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4. A meat market may be open daily from 4 o,clock A. M. to 9 o,clock P. M., and shall be closed at the latter hour.

5. Lepers, beggars, and any persons who misconduct themselves may be ejected from a meat market by any municipal officer or servant.

6. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon of the district or by the Medical Officer in charge of the local Charitable Dispensary to be unfit for human consumption shall be seized, and may, under the direction of a municipal officer, be destroyed or otherwise disposed of.

7. Every meat market shall be under the management and supervision of the municipal officer appointed by the Municipal Committee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such markets and for the due observance within them of these rules.

Part III.—Vegetable markets.

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, appoint a place or places to be used as a vegetable, fruit, and flower market or markets.

2. The vegetable market shall be used only for exposing for sale the following articles.—

(a) Vegetables, fresh or dried.

(b) fruits and roots, fresh or dried

(c) Plaintain and other leaves.

(d) Flowers.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3 Sites within the market will be allotted to vendors within which they must keep their shops, and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4. A vegetable market may be open daily from 4 o' clock A M. to 9 o' clock P. M. and shall be closed at the latter hour.

5. Lepers, beggars, & persons who misconduct themselves may be ejected from a vegetable market by any municipal officer or servant.

6. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon of the district or by the Medical Officer in charge of the local Charitable Dispensary to be unfit for human consumption shall be seized, and may, under the direction of a municipal officer, be destroyed or otherwise disposed of.

7. Every vegetable market shall be under the management and supervision of the municipal officer appointed by the Municipal Comittee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such markets and for the due observance within them of these rules.

PART IV.—Burial and burning grounds.

The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commmissioner, from time to time. fix a site or sites for public burial and burning grounds.

2. Except by special permission of the Municipal Committee, no person shall bury or burn a human body elsewhere than in ground set apart for such purposes.

3. Every body buried must be completely covered with earth to a depth of not less than six feet from the surface of the ground, or if burnt, completely reduced to ashes.

4. The erection of a tomb or monument within the area of a public burning or burying ground is forbidden, except with the previous permission of the Municipal Committee.

5 Every burial and burning ground shall be under the management and supervision of the municipal officer appointed by the Municipal Committee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such burial and burning grounds and for the due observance within them of these rules.

PART V.—Penalties.

Any person who infringes any of the rules specified in parts I, II, III, or IV of this notification shall, on conviction before a Magistrate, be punishable with fine which may extend to fifty rupees.

( By order. )

A. WILLIAMS,
Secretary for Berar

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ८ शके १८१८

गेल्या उन्हाळ्याचा अनुभव आरोग्यविषयक गोष्टींच्या सुधारणेच्या कामीं खर्चण्यांत आला तरच गेल्या उन्हाळ्याच्या आपत्तींतील अनुभवाचा खरा उपयोग झाला असें आह्मी समजूं यंदा ईश्वरकृपेनें पाऊस चांगला होत आहे तेहां

कदाचित हा अनुभव शून्यकामाचा ठरेल अशी मात्र भिती वाटते. प्रांतांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कसा काय आहे आणि त्या विषयीं कोणती खबरदारी व काळजी घेतली पाहिजे याचा विचार मुनसिपालिट्यांनीं व जिल्हा बोर्डांनीं आतांच केला पाहिजे. नद्यानाल्यांचें व तसेंच विहिरींचें पाणी स्वच्छ व निर्मळ राहील अशा विषयीं योजना गांवोगांव होऊन त्याप्रमाणें बंदोबस्त ठेवण्यांत आला पाहिजे. कित्येक गांवा संबंधानें पाण्याचा पुरवठा मोठ्या खर्चाच्या अडचणींमुळें नवीन करितां आला नाहीं तरी जो उपलब्ध आहे तोच उत्तम स्थितींत राखण्या विषयीं पावसाळ्यांत व्यवस्था झाली ह्मणजे ती हिंवाळ्यांत व उन्हाळ्यांत चांगली अमलांत येईल. आरोग्यकारक गोष्टी संबंधानें प्रांतिक उत्पन्नांतून जेवढा खर्च व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं इतकेंच नाहीं तर तो खर्च न करितां निराळे स्थानिक कर बसवून आरोग्यवर्धनाच्या निरनिराळ्या सोयीं करून घ्याव्या असा बंगाल सरकारचा अभिप्राय आहे तो मात्र अगदीं अयथार्थ आहे असें आह्मास वाटते. वऱ्हाडांत मुनसिपालिटी व जिल्हा बोर्ड या संस्था प्रतिष्ठित झाल्या आहेत पण त्यांच्यापाशीं जी फंडाची सामुग्री पाहिजे ती नाहीं आणि फंडाची उभारणी प्रांतिक उत्पन्नांतून झाली नाहीं तर दुसरा कोणता मार्ग साध्य आहे हें आह्मास समजत नाहीं. पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्या संबंधानें आह्मी लिहिलें आहे पण पाण्यासारख्या नडीच्या आरोग्यकारक दुसऱ्याही अनेक गोष्टी आहेत आणि त्यांचा ही यथाक्रम विचार झाला पाहिजे.

---

हल्लीं सारा कांहीं तालुक्यांत वाढला आहे व कांहीं तालुक्यांतून वाढविण्या विषयीं सूचना झाल्या आहेत. लोकांनीं कितीही ओरड केली तरी सरकारनें बधिरपणा पतकरल्यामुळें लोकांचीं निराशा झाली आहे. साऱ्याच्या वाढीचा प्रश्न थेट पार्लमेंट पर्यंत नेण्याचा धीर व जोर आमच्या प्रांतस्थ मंडळींत आहे असा आह्मास भरंवसा नाहीं. सध्यां दुसरी एक विचाराची गोष्ट सरकारच्या नजरे समोर आणिली पाहिजे ती ही कीं साऱ्याच्या रकमेबरोबर जागल पट्टी स्कूल पट्टी वगैरे बद्दलचा करहि वाढला जात आहे तो गैर कायदा व त्रासमूलक आहे. राज्यकारभाराचा खर्च मनस्वी वाढविला आहे ह्मणून लोकहिताचीं कार्यें करण्याकडे साऱ्याच्या वाढीचें प्रचंड उत्पन्न खर्चण्यांत येईल असें तरी सरकारापासून आश्वासन मिळविलें पाहिजे. इतर पट्या वाढविल्या आहेत ह्मणून ऐन काळीच्या उत्पन्नावर नवा खर्चाचा बोजा सरकार बसवील असें आह्मास वाटत नाहीं हल्लीची व्यवस्था अशींच कायम राहिली म्हणजे प्रजेची दुहेरी नागवणूक होणार आहे. या नवीन उत्पन्नानें देखील सरकारची तुंबडी भरेल असा रंग दिसत नाहीं कारण दिवसानुदिवस नेव नंव स्थानिक कर बसविले जात आहेत. मोंगलाईच्या कालांत सारा दिला म्हणजे सर्व लोकहिताच्या गोष्टी राज्याच्या उत्पन्नातून होत असत पण हल्लीं मोंगलाईतल्या पेक्षा अधीक कर देऊन देखील कराच्या वृद्धींचें प्रमाण नेमस्त नाहीं. इंग्लिश राज्य कारभारा मुळें आमचा पैसा परकोय देशांत साता समुद्रा पलिकडे जातो आणि देशांतील संपत्तीचा ऱ्हास होत आहे. वऱ्हाड प्रांताला दोन सापत्न सरकारें आहेत. इंग्रज सरकारच्या राज्यकारभाराचा खर्च व निजाम सरकारच्या स्वामित्वाचा हक्क या उभय कारणामुळें वऱ्हाड प्रांताचें उत्पन्न लोकांच्या उपयोगी नीटसें पडत नाहीं. तशांत वऱ्हाड प्रांत सर्वथैव शेतीवर अवलंबून आहे आणि त्या शेतीच्या धंद्याचा फायदा साऱ्याच्या वाढीच्या मार्गानें लोकांच्या हातून हिसकाऊन घेतला ह्मणून लोक असंतुष्ट, व निराश आहेत. सारा वाढविण्याचीं तत्वें देखील मोठी चमत्कारिक आहेत आणि तीं तशींच अमलांत आणिलीं ह्मणजे शेतीचा धंदा बुडविल्याच प्रमाणें होणार आहे.

---

यंदा राष्ट्रीय सभेची बैठक कलत्यास होणार आहे ह्मणून त्या सभेच्या तयारीला एव्हांपासूनच बंगालचे लोक लागले आहेत. गेल्या सालीं पुण्यास राष्ट्रीय सभा भरल्या नंतर पुष्कळ राजकीय गोष्टींत लोकमताची पायमल्ली झाली आहे. विलायतच्या मालावरील जकांत कमी करण्यांत आली, देशी गिरण्यांतील मालावर जकांत बसविली, स्वाकिनवर जी फौज पाठविली तिचा खर्च इंडियाच्या खजिन्यावर बसविला इत्यादि अनेक प्रकरणीं पार्लमेंट मध्यें देखील योग्य विचार झाला नाहीं. राष्ट्रीय सभेला हिंदुस्थान सरकार व पार्लमेंट सरकार या उभयतांशी सामना द्यावयाचा आहे. राष्ट्रीय सभेचे अभिप्राय नगजाहिर करून त्यांच्या खरेपणा विषयीं व शाश्वती विषयीं विरुद्ध पक्षाकडील लोकांची खात्री करण्याची वेळ आतांच आली आहे. लोकमताचा अपमान असा होऊं नये, लोकमताचें वर्चस्व सरकारापाशीं स्थापित करावें, आणि लोकमताच्या सल्यावर सरकारी राजधोरणें बदलावीं असा इष्ट प्रकार घडविण्यासाठीं राष्ट्रीय सभेला यंदा मोठीच कामगिरी बजाविली पाहिजे. यंदा कामाचा बोजा मोठा आहे. बाबू डब्ल्यू सी. बानरजी यांच्या अध्यक्षते खालीं जाहिर सभा भरून स्वागत-मंडळी नेमण्यांत आली आणि त्या वेळीं येत्या सभेच्या प्रेसिडेंटीचा बहुमान कोणास द्यावा अशा विषयीं पुष्कळ खल झाला. कलकत्यास सभा भरणार असल्यामुळें साहजिकच मुंबई इलाख्याला किंवा मद्रास इलाख्याला अध्यक्षपणाचा मान मिळेल असें वाटलें होतें. पंजाब वगैरे भागामध्यें अध्यक्षाची निवड करण्या संबंधानें गोष्टच निघाली नाहीं. मुंबईचे प्रसिद्ध आडव्होकेट मि. आर. एम. सयानी या गृहस्थांस अध्यक्षस्थान स्वीकारण्या विषयीं विचारणा करावी असा संकेत ठरला आहे. गृहस्थ मुंबई प्रांतीं सार्वजनिक कार्यांत चांगले तत्पर असतात आणि तिकडील प्रांतिक सभा गुजरार्थेत भरली होती तेव्हां हे त्या सभेचे अध्यक्ष होते. ही निवड कांहीं वाईट नाहीं आणि बहुत करून सर्वत्र या निवडीला मान्यता दर्शविली जाईल असा रंग दिसतो. विलायतच्या एका प्रमुख लोककल्याणकारी मुत्सद्याला अध्यक्ष होण्याविषयीं विनंती करण्यांत येणार आहे अशी आमच्या प्रांतीं बातमी पसरली होती पण तो विचार अखेरीस बाजूस ठेवण्यांत येऊन मि० सयानी यांस लोकमान्यतेची माळ घालण्यांत येणार आहे.

---

लहान लहान गोष्टींत देखील राष्ट्रीय हीनपणाच्या खुणा दिसून पडतात. इंग्लीश लोक आपले राजे आहेत ह्मणून सर्वत्र त्यांस प्रभुपणाचा सन्मान मिळतच असतो. त्यांचा हुद्दा, अधिकार, व मोठा पगार हीं नेहमीं मनापुढें वागतात आणि त्यांच्याशी संबंध पडला ह्मणजे आमचे लोक त्यांस देवपणाला देखील नेऊन पोचवितात. दास्य हाडामासांत खिळलें आहे, स्वतंत्रता म्हणून कांहीं ठाऊक नाहीं, आणि अर्थातच साहेब बहादूर गुणनिधी ठरतात व जो त्यांस शिरसावंद्य मानणार नाहीं तो व्यवहारामध्यें मूर्ख ठरतो. साहेबांचें देव्हारें किती माजलेलें असतें आणि ते किती अेरेरावी चालवितात यांचे गाजलेले कोडतांतून नेहमीं लोकांच्या दृष्टीस पडतात. इंग्लिश राज्यापासून एक तोटा होत आहे तो हाच कीं आमच्या राष्ट्राची अवस्था फार क्षुद्रतेला किंवा नीचतेला पोचली आहे.

आमच्या लोकांचा हीनपणा थोड्या दिवसापूर्वीं गयेस दिसून आला. सर अलेकझांडर मेकंझी लेफटेनंट गव्हरनर यांच्या मनांत गयेस असतांना विष्णुपद पाहण्याची जिज्ञासा झाली ह्मणून तेथील परम पवित्र देवालयांत त्यांस आणण्या विषयीं गयावळांनीं योजना केली. साहेब मजकूर बूट वगैरे उतरून देवळांत जाण्याच्या विचारांत होते पण कांहीं गयावळांनीं आग्रहपूर्वक व आदरपूर्वक त्यांस बुटासह विष्णुपदाजवळ नेलें. ही आमची धर्मश्रद्धा व देवालयाविषयीं उत्कृष्ठ व परम पवित्रता! मद्रासेस लार्ड डफरिन साहेबांस बुटासह देवळांत नेल्याबद्दल मागें मोठा गवगवा झाला होता तरी देखील गयेस असा प्रकार दुबार घडला. शीख लोकांनीं लार्ड डफरिन यांस रेशमी बूट देऊन देवळांत नेलें होतें. खरोखर, आमच्या हिंदु व मुसलमान राष्ट्राची चाल आहे कीं देवा पुढें उघड्या पायांनींच गेलें पाहिजे आणि ही चाल वरच्या साररूया प्रसंगीं मोडली ही गोष्ट आमच्या लोकांची अधोगती व्यक्त करिते. ज्या लोकांत आपलेपणा ह्मणून कांहीं नाहीं ते लोक राष्ट्रांच्या दृष्टीनें मृत्युंगत होतील तर कांहीं नुकसान नाहीं. महाराणी साहेबांच्या स्तोत्रपाठाच्यीं वेळीं सभेंतली मंडळी उठून उभी राहली नाहीं तर नेटिव लोकांवर राजद्रोहाचें महापातक कसें लादतात याचें प्रत्यंतर थोड्या वर्षापूर्वी पुण्याच्या फीमेल हायस्कुलाच्या बक्षीस समारंभाच्या वेळीं आह्मांस आलें आहे. पण नवल हें कीं आपल्या परमपूज्य देवालयांत बुटासह साहेबांच्या स्वाऱ्या आपले लोक बेधडक नेतात आणि आंत जाणाऱ्या परधर्मी लोकांस देखील असें राष्ट्र चाली विरुद्ध वागण्यास कांहीं खंती वाटत नाहीं. सारांश आपल्या लोकांमध्यें कांहींच पाणी नाहीं आणि कालगतीनें आपण दास्यत्वांत नामशेष झालों तर कांहींच आश्चर्य नाहीं.

---

रेलवे कडील नोकरांस पेनशन मिळत नाहीं तरी देखील पंचावन्न वर्षें भरल्या नंतर सरकारी नोकराप्रमाणें त्यांस घरीं बसण्यास सांगावें असा मध्यंतरीं विचार निघाला होता पण तो अखेरीस रद्द करण्यांत आला हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. पंचावन वर्षांचा नियम लागू केला असतां तर नेटीवा पेक्षां रेलवे कडील मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे मोठें नुकसान होत होतें ह्मणून त्यांच्या कल्याणाच्या दृष्टीनें हा नियम रहित झाला. गाड्या बरोबर नळ्याला यात्रा या न्यायानें जुन्या नेटिव लोकांचाहि फायदा झाला आहे.

ग्रेट इंडियन पेनिनशुला रेलवे कंपनीचा रेलवे चालविण्याचा करार येत्या १९०० वे सालांत पुरा होतो. सरकारच्या मनांत या रेलवेचे हक्क विकत घ्यावयाचे असले तर १८९९ त आगष्ट १७ तारखे पासून ६ महिन्याच्या आंत सरकार रेलवे कंपनीस तशी सूचना करितील. ही सूचना १९०० सालच्या जानेवारीच्या पूर्वीं केली तर त्याच सालच्या जूनच्या ३० वे तारखेस सरकार ही रेलवे आपल्या ताब्यांत घेईल आणि ही सूचना जानेवारी नंतर केली तर ३१ दिसेंबरच्या दिवशीं ही रेलवे सरकाराकडे जाईल ही रेलवे सरकारनें स्वतां चालविली किंवा या कंपनीच्या मार्फतीनें चालविली तरी प्रस्तुत स्थितींत कांहीं ह्मणण्यासारखा फरक होणार नाहीं. अशा प्रकारानें रेलवेवरील मालकी बदलली जाणार असल्यामुळें रेलवे कंपनीनें ५५ वर्षांचा नियम लागू केला नसवा असाही कित्येकांचा अदाज आहे.

---

पैशाचा सद्व्यय किती प्रकारांनीं करिता येईल याची कांहीं गणना नाहीं. पण योजकाची कल्पकता ज्या दिशेनें वळेल त्या दिशेनें पैशाचा व्यय होत असतो. नेटिवामध्यें पार्शी लोक खरोखर मोठे धोरणी व धूर्त आहेत. त्यांनीं एक फंड जमविला आहे. त्या फंडाचा उपयोग इंडियन सिव्हील सरव्हंट तयार करण्याकडे करावयाचा आहे. बुद्धिमान व विद्वान तरुण मंडळीस द्रव्याची मदत देऊन त्यास विलायतेंत धाडावयाचें आणि तेथून सिव्हीलियन होऊन आल्यानंतर पूर्वीं केलेल्या मदतीची फेड संपूर्ण घ्यावयाची असा उद्देश हा फंड उभारण्याचा आहे. सध्यां दोनच विद्यार्थी उत्तम ह्मणून शोधून काढून व त्यांची परीक्षा घेऊन नंतर त्यांची विलायतेस रवानगी करावयाची आहे. उद्योग फार स्तुत्य आहे. श्रीमंताचा पैसा सत्कार्यीं लागेल, बुद्धिमान रत्नें उदयास येतील, आणि पैसाही शेवटीं संपर्ण परत मिळेल. असेच फंड प्रांतोप्रांतीं श्रीमान लोकांनीं गोळा केले तर एक नवीन टूम निघून मोठा फायदा होईल.

---

गेल्या अमावस्येस सूर्यग्रहण होतें आणि तें युरोपांत दृश्यमान असल्यामुळें ज्योतिषी लोकांचा समुदाय ग्रहणाच्यां वेळीं सूर्यबिंबाचें निरिक्षण करण्यासाठीं युरोपांत पुष्कळ प्रसिद्ध ठिकाणीं जमला होता पण कित्येक स्थळांहून आलेल्या तारेवरून कळलें कीं आकाश आभ्र असल्यामुळें ग्रहण दृष्टीस

पडलें नाहीं आणि पुष्कळ खगोलवेत्यांच्या मनाचा विरस झाला.

आणखी सव्वा वर्षानें ह्मणजे सन १८९८ त जानेवारीच्या २१ वे तारखेस मोठें सूर्य-ग्रहण येणार आहे आणि या ग्रहणांत सूर्यबिम्बाचा पूर्ण खग्रास होणार असून तो उत्कृष्ट रितीनें इंडियांत दृष्टीस पडणार आहे. या ग्रहणानिमित्त इंडियांतील ग्रहांचे वेध घेण्या सारख्या प्रसिद्ध ठिकाणीं युरोपियन खगोलशास्त्रज्ञ लोकांची मोठी गर्दी उडणार आहे. स्वीडन, जपान, अमेरिका, डेनमार्क, इंग्लंड, फ्रान्स, इटली, रशिया, स्पेन, स्वीटझरलंड, पोर्तुगाल, ग्रीस, इत्यादि देशांतील चांगले चांगले विद्वान लोक ज्योतिषशास्त्राच्या अभिवृद्धी साठीं बंगाल्यांत व मध्यप्रांताकडील भागांत जमणार असल्या कारणानें आतां पासून तजविजी चालू आहेत.

या भावी सूर्यग्रहणाचें वर्णन पायोनियर पत्रांत चांगलें दिलें आहे. सूर्य व पृथ्वी या मध्यें चंद्र येऊन चंद्रबिम्बानें सूर्यबिम्ब आच्छादलें ह्मणजे सुर्याला ग्रहण लागलें असें आपण ह्मणतो. सूर्यबिंब आपणांस दिसेनासें होऊं लागतें आणि जेव्हां पूर्ण खग्रास होतो तेव्हां चंद्रबिम्ब मध्यवर्ती झाल्यामुळें बहुतेक सूर्यबिम्ब आपल्या डोळयाला अदृश्य होतें. रत्नागिरी, सातारा, दरूर, यवतमाळ, वर्धा, नागपूर, शिवनी मंडला, बालिया, सरण, मोठीहारी, गौरीशंकर इत्यादि ठिकाणीं पूर्ण खग्रास दृष्टीस पडेल आणि त्याच्या खालोखाल, पुणें जबलपूर, आकोला, अहमदनगर, इलिचपूर, चिंधवाडा, रेवा बनारस, खाटमांडू इत्यादि स्थळीं किंचित कमी खग्रास दिसेल.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST
17 1896

We all know that it is not even four years since the right of interpellation was conferred upon the members of the Indian Legislative Councils. The Indian people do really appreciate the importance of the privilege and show much practical sagacity, and moderation in exercising it. Springing as it did from a desire to gain access to the administrative workings of the Government the privilege has been received by the people at large with great satisfaction and there is naturally an earnest avowal made by our educated leaders to avail themselves of suitable opportunities to get light upon many grave and subtle questions affecting the interests of the people. People wish and, we think, they do so rightly, that a larger scope should gradually be allowed to this right. It behoves therefore the Government to be always most willing to afford all possible facilities to the honorable members who represent the people in the legislative councils to get correct and authentic information on whatever it concerns them to inquire into. Further, it seems proper that the Government should create and foster the curiosity of the members rather than check or narrow it by placing unnecessary or obstinate difficulties.

We however find that the Government are rather discouraging the spirit of inquiry asserted with continued tenacity by men like the honorable Mr. P. M. Mehta. We have a clear instance of this adverse aptitude of the Government in the reply given by the Bombay Government to the elaborate correspondence carried on by the honorable gentleman. From the inconvenience experienced by the public in the disposal of appeals from the Agency Courts in Kathewad there was a feeling of dissatisfaction for the system in vogue under which the Bombay government decided them. Though of a long standing the inconvenience was not remedied. It is now that the Hon'ble Mr. P. M. Mehta has evoked a discussion of the matter in point. He proposed for the consideration of the Bombay government a question in the following terms:—

"Whether Government are aware that the system, under which Appeals from the decisions of Agency Courts in Kathiawar and elsewhere are disposed of by the Bombay Government, is causing deep and general dissatisfaction among all parties concerned in them; and whether they would be pleased to consider the extreme advisability of devising, without undue delay, some measures by which the Appeals could be judicially heard and determined?"

The Bombay government declined to entertain the question as they thought that it referred to matters falling under their political control. This naturally raised a collateral but immensely important question as to whether political matters could not form an appropriate subject for interpellation. Being afraid lest the exercise of the right of interpellation would affect the independant position of the Executive Government in political matters the Bombay Government seems to shelter under a *forced* interpretation of the Indian Councils Act. The Hon'ble gentleman has however, we firmly believe, submitted a very lucid and able reply. It is distinct so far as we can see that "

"The rules for the Bombay, as for the other Local Legislative Councils, made with the sanction of the Govern' or General in Council, are framed on the same lines and in the same works as the Rules for the Governor-General's Council with only such changes as were necessitated by the limited authority of the Local Governments."

But the whole question turns upon the view we take of the local rules. In plain language the rules at issue may be stated in the two following propositions one positive and the other negative:—

"I Any question may be asked by any member as to matters or branches of the Administration under the control of the Governor in Council."

11. No question shall be asked or answered as to any matters or branches of the Administration *not* under the control of the Governor in Council.'

Read together these propositions do not protect political matters from the right of interpellation. Moreover

"It is difficult to conceive that it is intended to argue that matters or branches of the Administration under the political control of the Government are not matters or branches of the Administration in some special sense of the word "Administration" There is nothing in the Rules to show that the word "Administration" is not used in its ordinary general sense and as it is used by Government themselves in their official declarations, *e. g.*, in their 'Administation' Reports which include the head of political matters as one of its main baraunches or matters. Nor is there anp warrant anywhere for putting such a restricted interpretation upon the word "Administration" as to exclude matters under the political control of Government."

Now that the question has gone up to the Imperial Council for consideration we hope that the view propounded by the Hon'ble gentleman will receive a hearty support of the Supreme Government.

The revenue from opium in 1895—96 showed a great deficit of Rs. 23 759. The revenue in 1894—95 amounted to Rs. 249075. The Resident has made the following remark in this connection:—

"The diminution in the revenue from opium is due, the Resident thinks, to the reduction in the number of shops the separation of the sale of opium, and its preparations from the sale of other drugs, and in the current year (1896-97) further depreciation has been caused by the prohibition against the sale of madak, chandu, and other preparations from which a considerable profit is derived. The marked fall in n the quantity of opium sold in the Akola district should be investigated, and the explanation reported. The resident has long thought that a first step towards obtaining control over the opium trade of Berar is the prevention of direct dealings by wholesale vendors with Indore to be followed by the substitution of Bengal opium for Malwa opium. With this object Mr. Chichele-Plowden is anxious to adopt the Bengal plan and supply vendors with excise opium from a central depot, but difficulties have arisen which as yet he has not been able to overcome. In respect to ganja, measures are under consideration for giving effect to the nstructions of the Government of India, and a much closer supervision will be exercised over dealings in this drug in future than has hitherto been possible."

The whole excise—revenue has similarly fallen from Rs. 1439269 of 1894—95 to Rs. 13,07,652. We expected a fall. No doubt there are departmental explanations but we think that the poverty of the people and the wise tendencies of the time to check high bids are the main causes.

## वऱ्हाड

हवामान—एकंदर पाऊस सुमारें २९ इंच झाला. आतां पावसाचा कंटाळा आला आहे. आकाश साभ्र असून हवा रोगटशी आहे. पावसाची बुरबूर व रीपरीप चालूच आहे. उघाडी न झाली तर खरिपाचीं पिकें बिघडतील असा रंग दिसतो.

येथील लायब्ररीच्या वर्षोत्सवव्याख्यानमालेस येत्या २३ वे तारखेला सुरुवात होऊन पहिले व्याख्यान रा० रा० विष्णु नारायण बापट एँम. ए. असिस्टंट मास्तर, हायस्कूल, आकोला यांचें होणार आहे. 'धर्मविवेचन' हा व्याख्यानाचा विषय आहे.

मि. बुलक रेव्हिन्यू कमिशनर यांची स्वारी गेल्या गुरुवारीं येथें आली. कचेऱ्यांची तपासणी गेल्या शनिवारीं झाली. काल दिवसाच्या गाडीनें कमिशनर साहेब उमरावतीस गेले.

मि. सिंक्लेर जेलर आकोला हे सहा महिन्यांच्या रजेवर गेले असून त्या रजेंत रा० रा० गोपाळ विश्वनाथ टोंकेकर यांस जेलर नेमण्यांत आलें हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. जेलरचे जाग्याचा मान प्रथमच नेटिवास देवविण्याचें श्रेय डाक्टर रेली साहेबांस आहे.

रा० रा० धोंडजी कोंडजी पोलीस इनस्पेक्टर यांची बदली बुलढाण्याहून औरंगाबाद छ.वणीस झाली. यांचे कार्यदक्षेत बद्दल आह्मी वारंवार कळविलें आहेच. व रेसिडेंट साहेब बहादूर यांणीं पोलिस खात्यास योग्य अशी ह्यांची हुशारी, कार्यपटुत्व व दूरदर्शीपणा हे गूण पसंत करून त्यांस औरंगाबाद सारख्या ठिकाणीं फार जोखमीच्या व कांहीं विविक्षित गुन्ह्यांचा तपास लावण्याच्या विशेष कामगिरी साठीं मुद्दाम बढती देऊन नेमिलें हें पाहून आह्मांस व अकोले जिल्ह्यांतील सर्व लोकांस आनंद व कौतुक वाटत आहे. मि० धोंडजी हे आपल्या आंगचे गुणानें आज पर्यंत जसे प्रसिद्धीस आले त्याप्रमाणेंच नवीन स्पेशल दिलेल्या कामांत आपली कर्तबगारी दाखवितील अशी आह्मांस बळकट आशा आहे.

येथील रेलवे स्टेशन जुनें मोडून नवीन बांधण्याचें काम बहुतेक संपून नवीन झालेल्या इमारतींत कामाची सुरुवात येत्या सप्टेंबर महिन्यांत होईल, असा अंदाजा आहे. नवीन इमारतीस खर्च ३९ हजार रुपये लागला.

मि. माणिकशा रतनजी दस्तुर सिव्हील जज्ज, बुलढाणा हे एक महिन्याच्या रजेवर गेल्यामुळें त्यांच्या कोर्टाचें काम सध्यां बंदच आहे. फक्त नवीन फिर्यादी रा० रा० बळवंत बाळकृष्ण सुळे बी. ए. हे दाखल करून घेतात.

दर्यापूर येथील लोकांत बातमी पसरली आहे कीं तेथील दिवाणी कोर्ट बंद होऊन तें एलिचपूर येथें जाणार. यामुळें बऱ्याच लोकांस काळजी उत्पन्न झाली आहे तरी हा समज निराधार असावा असें वाटतें.

शेगांवचे भाटे गृहस्थ रा० रा० खटाव फरसू यांजवर खोटी वजनें उपयोगांत आणिल्या बद्दलचा फौजदारी मोकद्दमा क्याप्टन आयव्हर्स माजिस्ट्रेट वर्ग १ याच्या समोर गेल्या १०।११ व १२ तारखांस चालून येत्या १९ वे तारखे पर्यंत तहकूब राहिला आहे. चौकशीच्या वेळीं प्रेक्षकांची गर्दी असते व काम बरेंच कसोशीनें चाललेलें आहे

## वर्तमानसार.

मुंबई युनिव्हरसिटींकडून चालु असलेल्या दोंन 'जगन्नाथ शंकरशेट' नांवच्या स्कालरशिपा अनुक्रमें २० व १६ रुपये दरमहाच्या असत त्या चालू साला पासून अनुक्रमें १८ व १२ रुपयांच्या करण्यांत आल्या.

मासे धरण्यांत विद्युद्दीपाचा उपयोग— माशांना माणसा सारख्या पापण्या नंसतात शिवाय प्रकाश पाहिला कीं ते लुब्ध होऊन त्याच्या भोंवती जमतात. पापण्या नसल्यांमुळें त्यांचे डोळे तेव्हांच दिपून जातात. ह्या गोष्टि समजल्यामुळें विद्युद्दीप समुद्राच्या तळीं नेऊन हवे तितके मासे धरण्याचा जपानी लोकांनीं मोठा झपाटा उडविला आहे. ह्या नव्या सुधारणांनीं सदसद्विचार शक्तीनें संपन्न असे मनुष्य प्राणी ही फसतात मग माशांसारखे निर्बुद्ध प्राणी फसतील ह्यांचें नवल काय!

पास्टर इन्स्टिट्यूट—कुत्र्याच्या विषावर औषधपाणी देण्याची जी एक संस्था हिंदुस्थानांत स्थापन करण्यासाठीं ७०००० रुपये वर्गणी जमली असून लवकरच ती संस्था स्थापन करण्यासाठीं सिमल्यास तारीख १० रोजीं एक मोठि सभा भरविण्यांत येणार आहे.

दळणवळणाची उत्कृष्ट सोय–वीस इंजिनें आणि १३७ रेलवेचे डबे यांत विजेच्या योगानें दळणवळण ठेवण्यासारखी सुधारणा करण्याकरितां ३६०० रुपये खर्च करण्याची मंजुरी सौथ इंडियन रेलवेच्या एजंटानें आपल्या बोर्ड आफ डिरेक्टरांपाशीं परवानगी मागितली आहे. आगगाडी चालू असतां मध्यें चोरटे गाड्यावर चढून जी लूटालूट करितात तिच्या संबंधानें ही व्यवस्था करण्याचा बेत आहे तो फारच स्तुत्य आहे.

अद्भुत भरतीनें नाश–शांघाई जवळील हायचन भागांत समुद्रास अद्भुत भरती येऊन किनाऱ्यावरील कित्येक गांवें वाहून जाऊन चार हजार मनुष्यें बुडून मेलीं. यंदाचें हें दुर्मुख नाम संवत्सर संपे पर्यंत किती अनर्थ, किती मालमत्तेचा नाश, आणि किती माणसांचे बळी पडतील हें एक परमेश्वर जाणें!

जगावर ७०००० प्रकारच्या वनस्पति आहेत व त्या संख्येमध्यें उत्तरोत्तर जास्त जास्त वनस्पतींचे शोध वाढत आहेत.

धातूवर भिन्याचें काम करण्याची कला चीन देशांत ख्रिस्ती शकाचे पूर्वीं २००० वर्षांपासून माहीत होती असें ह्मणतात.

गेल्या २० वर्षांत इंग्लंडांत ४८७२०० लग्नें झालीं व तितक्या मुदतींत एकंदर ६९८७ वटस्फोट होऊन लग्नें मोडण्यांत आलीं.

इंग्लंडांत दर वर्षीं ह्मणजे बारा महिन्यांत एकंदर ५०००० मुलें कुलीन परंतु अविवाहित स्त्रियांच्या पोटीं जन्मतात! मोठेपणीं लग्न करण्याची पद्धति व स्त्रियांस ही अविवाहित राहण्याची धर्मानें मोकळीक ही वरील भयंकर परिणामास कारणें असावींत.

शु० सू०

भविष्य— गेल्या ता० २५ जुलैच्या विक्षिप्त पत्रांत रा. यज्ञेश्वर विष्णु झिंप्रे, सामुद्रिक ज्योतिषी, यांनीं असें बेधडक विधान ठोकून दिलें आहे कीं, 'कोल्हापुरच्या महाराजांनीं दुराग्रह धरून तेथील कपिलतीर्थ बुजविण्याची सुरवात केल्यास बुजविण्याचें काम पुरें होण्यापूर्वींच श्रीमतांचा अंत होईल' व हें माझें ज्योतिष खोटें ठरल्यास महाराज छत्रपती अथवा त्यांचे दोस्त इंग्रज सरकार जी शिक्षा मला देतील, ती मी आनंदानें स्वीकारीन.

कोल्हापुरास एक सुताची गिरणी करण्याबद्दल तेथें विचार चालला आहे.

क० त०

खंडाळ्याच्या घाटांतही ठिकठिकाणीं बरीच दगड माती रेलवेच्या रस्त्यावर कोसळून पडली.

हिंदुस्थानचे व्हाईसराय लार्ड एल्जीन तारीख २८ नोवेंबरास बडोदें येथें येणार व त्यांचा मुक्काम तीन दिवस येथें होणार असल्याचें समजतें. त्यांच्या आदरसत्कारार्थ सुमारें तीन लक्षांवर खर्च होईल असा अजमास आहे. कित्येक खर्चाच्या मंजुऱ्या आतांच सुटल्या असून व्यवस्थेंचीं कामें सुरू झालीं आहेत.

औरंगाबादेस पाऊस चांगला पडून पेरणीस सुरवात झाली. तेथें तापाचा आजार असून एक प्रकारच्या रोगानें जनावरें पटापट मरत आहेत

महापूर— कावेरी नदीला मोठा पूर येऊन आसपासच्या प्रांतांतून फार नासाडी झाली. बंगलोर खेरीज करून म्हैसूर प्रांतांतही पुष्कळ पाऊस पडला.

स० वि०

तारायंत्राचा वेग

तारायंत्राच्या द्वारानें आज मित्तीला किती जलद व किती वेळांत किती अंतरावर बातमी पाठवितां येते, याबद्दलची मोठी मजेदार माहिती एके ठिकाणी वाचण्यांत आली, ती सर्वांनीं वाचण्याजोगी आहे. न्यूयार्क येथील विद्युत् परिषदेपुढें पी. बी. डेलेनी नांवाच्या एका विद्युत्शास्त्रज्ञानीं एक वेळ विजेच्या गतीवर व्याख्यान दिलें व स्वतः प्रयोगही करून दाखविले. त्यावेळीं साडेतीन सेकंदांत शंभर शब्द ह्मणजे एका मिनिटांत सतराशें शब्दांचा मजकूर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविला. त्याचप्रमाणें न्यूयार्क येथेंच विद्युत्प्रदर्शन झालें, त्यावेळीं एक वाक्य पन्नास मिनिटांत सर्व पृथ्वीला प्रदक्षिणा घालून पुनः जागच्या जागीं आलें. मि० चॉनसरी डेप्यू यांणीं तें वाक्य तयार केलें. प्रेसिडेंट शान्डलर–अमेरिकेंतील पोस्टाकडील तारखात्याचे मुख्य अधिकारी यांणीं तें पाठविलें. व त्यांच्याजवळच समोर बसलेल्या एडिसन साहेबांनीं ते वाक्य त्याची पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर घेतलें हें पृथ्वीप्रदक्षिणा करणारें वाक्य खाली दिलेल्या अर्थाचें होतें.:—

" परमेश्वरानें हें सर्व सृष्टिभांडार उत्पन्न केलें व ज्ञानवान् मनुष्य विजेच्या शक्तीचा उपयोग करून राष्ट्रांच्या वैभवास व लोकांच्या शांततेस भर घालीत असतो. "

शान्डलरसाहेब यांणीं आठ वाजून चौतीस मिनिटांनीं न्यूयार्कहून हें वाक्य पाठविलें. तें चिकागो, लोझांजिलिस, सानफ्रान्सीस्को इत्यादि ठिकाणाहून, वुनिपेटा, मान्ट्रील, कान्सो, लंदन येथें गेलें. लंदनास जाण्यास बरोबर आठ वाजून अडतीस मिनिटें झाली. तेथून तें वाक्य लिस्बन, जिब्राल्टर, माल्टा; अलेक्झांड्रिया, सुएज, मुंबई, मद्रास, सिंगापूर, शांघाय, नागसीका आणि टोकीया इतक्या ठिकाणीं अनुक्रमें गेलें. व त्या मार्गानें तें वाक्य पुनः पाठविलें तें पन्नास मिनिटांनीं एडिसनसाहेबांकडेच परत आलें. वर सांगितलेल्या सर्व ठिकाणीं तें वाक्य जातांच पुढें पुढें रवाना होत गेलें. तारेनें बातमी किती जलद जाते याचें हें उत्कृष्ट प्रमाण झालें. नेहमच्या दराप्रमाणें आकार घेतल्यास हें वाक्य पृथ्वीप्रदक्षिणा करून परत आणण्यास त्यास तीनशें रुपये खर्च आला. म्यांचेस्टर येथील एक व्यापारी कंपनीनें ब्रिटिश कोलंबिया येथील व्हिक्टोरिया शहरीं एक निरोप पाठविला व त्याचा उलट जबाब आणविला. इतक्या सगळ्या खटाटोपास अवघे दीड मिनिट लागलें. या दोन शहरांमधील अंतर ९००० मैल आहे. गेल्या सालीं लंदनपासून न्यूयॉर्ककडे एक तार पाठविण्यांत आली तिला पांच सेकंद लागलीं. लंदन व न्यूयार्क येथील बुद्धिबळें खेळण्यांत पटाईत अशा लोकांचा चुरशीचा डाव चालला असतां एका पक्षाचा डाव कळवून दुसरा पक्ष काय डाव करितो हें तारेनें आणण्यास सगळी तीन मिनिटें लागलीं.

करमणूक

सरकारचें काम करण्याकरतां जागोजाग जे वतनदार महार आहेत त्यांस सरकारचें काम फार करावें लागत असून सरकारच्या जमाबंदीच्या थैल्या तालुक्यास पोंचविण्याचें जोखमीचें काम ते फार प्रामाणीकपणानें करीत असतां त्याचे पगार जे कधीं मलिंकबरी सालिना १॥ रुपयापासून १२ पर्यंत ठरलेले आहेत ते वाढविण्याचा सरकार कांहींच विचार करीत नाहीं हें चांगलें नव्हे; सरकारनें आपल्या इतर खात्यांतल्या प्रमाणें या नोकरांचे पगार वाढविणेंही अवश्य आहे असें रत्नागिरीच्या देसाई वकिलाचें ह्मणणें आहे. एक सनदी देसायावर रागावले आहेत त्यांचा पगार वाढविण्यास पैसा कोठून आणावा असें ते विचारतात. हुंडणावळ देण्यास जेथून आला तेथूनच आणावा असें उत्तर आहे.

ह्या महिन्यांत सूर्याचें खग्रास ग्रहण नार्वे मध्यें चांगलें दिसावयाचें आहे, त्याचा वेध घेण्यास जी मंडळी निघाली आहे, तीस मिळण्यास पुण्याच्या एंजिनिअरिंग कालेजांतले प्रोफेसर नायगांववाला हे गेले आहेत. शिवाय १८९८ च्या जानेवारींत सूर्याचें खग्रास ग्रहण हिंदुस्थानांत दिसावयाचें आहे. त्याच्या वेधाकरितां दहा हजार रुपयांचीं यंत्रें विकत आणण्यास सरकारानें त्यांस सांगितलें आहे.

तंजोरचें डिस्त्रिक्ट लोकल बोर्ड सरकारच्या परवानगीनें कर्ज काढून एक रेलवे करण्याच्या विचारांत आहे- होणारी रेलवे व बोर्डाचें उत्पन्न ही गहाण देवून उघड रीतीनें १५ लाख रुपये कर्ज काढणार आहे. रेलवेची सर्वे करण्याकरतां २०,००० रुपये मंजूरही केले. आमच्या ठाणाच्या डिस्त्रिक्ट बोर्डानें अगदीं थोड्या खर्चांत कोळशेत खाडीस आपोआप पूल होण्याची आलेली सोन्यासारखी संधि लाथेनें झुगारून दिली!

जपानानें चीनापासून घेतलेल्या फोर्मोसा बेटांत हल्लीं बंडावा सुरू आहे आणि ते बंडखोर लोक सांपडेल त्या जपानी माणसास ठार करीत आहेत. मुंबईच्या दिनशा कंपनीचा एक पार्शी एजन्ट तेथें होता तो जपानीच आहे असें समजून त्या बंडखोरांनीं त्यास ठार केलें आणि मेथा कंपनीचा पार्शी एजेन्ट पाटील हा नशीबानें बचावला.

जानु बिन धोंडी व त्याची बायको कृष्णी हीं दोंघे आपल्या शेतांत, काम करून संध्याकाळीं घरीं येत असतां पुढें चाललेल्या कृष्णीस तिच्याशीं संबंध असणाऱ्या दाजी गुरवानें वाटेंत पकडलें व तिला धरून एका बाजूस नेऊं लागला. नवरा मागून येत असल्यामुळें ती त्याच्याबरोबर जाण्यास हरकत करूं लागली. दोघांची मस्ती झाली. व दोघेही खाली पडलीं. इतक्यांत नवरा आला व त्याणें तो प्रकार पाहून त्याणें एक दगड उचलून गुरवाच्या डोक्यांत घातला व त्यास ठार केलें. असा खून झाल्या नंतर कांहीं महिन्यांनीं त्या नवरा बायकोनीं लेखी नव्हे पण तोंडी जबाब दिला. खटला कमीट झाला व साताऱ्याच्या जज्जानें दुसरा कांहीं पुरावा नसतां त्यांच्या कबुलीवरून त्या दोघांस जन्मठेप दिली. त्यांनीं अपील केलें त्यांत हायकोर्टानें ठरविलें कीं, जानूनें जें कृत्य केलें तें कलम १०० प्रमाणें स्वसंरक्षणार्थ केलें असल्यामुळें गुन्हा होत नाहीं व तो गुन्हा होत नाहीं ह्मणून प्रेताची व्यवस्था करणेंही अपराध होत नाहीं, असें ठरवून दोघांसही दोषमुक्त केलें.

केप टाऊन येथें एका ब्यांकेंत कांहीं मुसलमानाची ठेव होती. कांहीं दिवसांनीं ते ती ठेव परत घेण्यास गेले. ब्यांकेच्या सराफानें त्यांच्या रकमा व्याजासह देण्यास काढल्या. मुसलमानांनीं व्याज घेण्याचें नाकारून मुदल रकमाच घेतल्या. व्याज घेणें हें पाप आहे असें मुसलमानी धर्माचें जें तत्व आहे त्याचें हें फळ आहे.

इराणच्या शहाच्या जामदारखान्यांत एक हिरा आहे. तो ख्रिस्तीशकाच्या आधीं ३००० वर्षांवर सांपडला ह्मणतात. तो दीड इंच लांब आणि एक इंच रुंद आहे. त्याचें नांव दर्यांडिनूर असें आहे. ह्याचा अर्थ तेजोनिधि असा आहे.

टा० अ०

जनावराचें शहाणपण— लातूर येथील पांजरपाळांत एक पांढरी गाय आहे तिचें नांव सेनी असें आहे. ती दररोज सायंकाळीं ६ वाजतां श्री मारुतीचे देवळांत जाऊन श्री मारुतीच्या पायांवर डोकें ठेवून क्षणभर राहून आपल्या जागीं जाते. या गाईस एक खोंड आहे. त्याचा नित्य नेम असा आहे कीं, प्रत्येक तेल्याचे घरापुढें जाऊन पेंडीचा खडा खाऊन यावयाचा. जो कोणी पेंडीचा खडा देणार नाहीं, त्याचे घरापुढें खडा मिळेपर्यंत तो खोंड उभा राहतो व पेंड मिळाल्या नंतर दुसऱ्या घरीं जातो!!

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास.......................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस ........०। ०६
दुसरे खेपेस ............ ०।

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 ae 5
Six monthly?......... 3 ...... ... ...,, 8 as
Single copy .............. ...... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

YOL XXX | AKOLA MONDAY AUGUST 24 1896 | NO 33

वर्ष ३० | आकोला सोमवार तारीख २४ माहे आगस्ट सन १८९६ इ० | अंक ३३

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य १ शके १८१८

रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं दोन वर्षांपूर्वी एक व्याख्यान दिलें होतें त्या वेळीं त्यांनीं प्रतिपादित केलें होतें कीं हिंदुस्थानची लोकसंख्या जरी उत्तरोत्तर वाढत आहे तथापि या वाढत्या लोकसंख्येपासून समाधानकारक अशी एक ही गोष्ट निष्पन्न होत नाहीं. लोकसंख्या वाढली तथापि जननाच्या वाढी बरोबर मरणाचीही वाढ जबर आहे आणि आमच्या देशांतील बहुत लोक अल्पवयांतच मरतात आणि त्या मुळें त्यांचा खरा उपयोग होण्याच्या संधीला ते आपल्या देशाला लाभत नाहींत. मुलें पुष्कळ निपजतात आणि पुष्कळ लहानपणींच मरतात या कारणामुळें प्रजा निःशक्त, रोगट व पंगु अशी फार होते. आणि लहानपणाच्या अनेक व्याधींतून जे बचावतात व शहाणे होऊन दुनियेदारीला लागतात ते वृद्धापकाळा पर्यंत न वाचल्या मुळें त्याच्या जगण्या पासून देशाला लाभ होण्याची वेळ समीप येते तोंच ते मरण पावतात. लोकसंख्या वाढली आहे एवढ्या वरूनच कोणी चुकींचें अव्यादानीदर्शक अनुमान काढून समाधान मानूं नये इतकेंच नाहीं तर आपल्या देशाचें मोठें नुकसान होत आहे हें कळविण्याचा हेतू राजश्री आण्णा साहेब यांचा होता. हिंदुस्थानांत प्रजा निपजते बहुत आणि त्या बरोबरच बहुत मरते; त्या शिवाय दीर्घायु असे थोडे असतात आणि ऐन ज्वानीच्या किंवा प्रौढपणाच्या स्थितींत राम पुष्कळजण ह्मणतात सारांश, एकंदरीनें लोकसंख्या अशा दोन प्रकारें आमच्या देशाचा तोटा करिते.

वरील गोष्टीच्या पुष्टीकरणार्थ आह्मी कांहीं माहिती गेल्या सालच्या सानिटरी रिपोर्टावरून देत आहों. एक वर्षा खालील मुलें २६८३१ मरण पावलीं ह्मणजे त्या वयाचीं जीवंत मुलें १००० घेतलीं तर त्या पैकीं ९८६९ मुलें मरण पावतात. या प्रमाणाचा अर्थ असा निघतो कीं जितकीं मुलें निपजतात त्या पैकीं निम्यापेक्षां कांहीं अधीक एक वर्षभराच्या मुदतींत मरण पावतात. या मरणसंख्येवरून दुसरी एक गोष्ट निदर्शनास येते कीं प्रजा जी निपजते ती सृष्टीच्या हवेमध्यें जगण्या इतकी टणक नसतात ह्मणजे रेताची दुर्बलता फार भयंकर आहे आणि बाळंतपणाच्या जिवापाड श्रमामुळें आयांच्या कुशी मात्र व्यर्थ शिणतात एक वर्षा नंतर पुढें पांच वर्षा पर्यंत मुलें सरासरी १/४ प्रमाणानें मरतात आणि हें प्रमाण हा कांहीं लहान नाहीं.

जनन क्रियेच्या आवृत्तीमुळें आमच्या देशांतील मातृपदास पोंचलेल्या स्त्रिया अशक्त, कार्यहीन, व मरणप्राय बहुत होतात आणि त्याचें प्रत्यंतर गेल्या सालच्या रिपोर्टांतील आंकड्यावरून स्पष्टपणें दिसून येतें. १५ वर्षापर्यंत मुलगे जितके मरण पावतात त्या माना पेक्षां मुली कमी मरतात ह्मणजेः–

| वर्षा खालील | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| १ | १४३३२ | १२६९९९ |
| १–५ | १७९२५ | १५३८१ |
| ५–१० | ५५०५ | ४९६० |
| १०–१५ | २२१९ | १८४८ |

पण १५ वर्षापासून पुढें ४० वर्षापर्यंत स्त्रिया अधीक मरतात आणि पुरुष कमी मरतात ह्मणजे १८९५ सालीं एकंदर पुरुष ११४७३ मरण पावले तर स्त्रिया १२०३५ मरण पावल्या. आणि आणि हेंच मरणाचें प्रमाण ४० वर्षापुढें बदलून बायका पेक्षां पुरुष अधीक मरूं लागतात.

सन १८९५ सालीं एकंदर १,४१,९३७ मनुष्यें मरण पावलीं त्या पैकीं पांच वर्षाच्या वयांखालील मेलेल्या मुलांचें एकंदर मरणसंख्येशीं प्रमाण २१ मागें ९ असें पडतें आणि ५ पांच वर्षा पुढील आणि ५० वर्षापर्यंत मेलेलीं माणसें २१ मागें ७ या प्रमाणांत येतात. बाकीची मरण संख्या ५० वर्षा पुढील आहे. या वरून आमच्या देशांतील मरण संख्येचा आढळ पन्नाशी न उलटलेल्या मनुष्यामध्यें विशेष होतो हें स्पष्ट दिसेल. हीं वरील प्रमाणें इतर देशांतील प्रमाणांशी ताडून पाहण्यास आमच्या जवळ सध्या साधन नाहीं पण आह्मी तें साधन मिळून या बाबदींत पुन्हां एक वेळ विशेष माहिती देण्याचा विचार केला आहे.

(आमच्या एका मित्राकडून)

पार्लमेंटनें नुकताच असा एक ठराव केला आहे कीं इजिप्तमध्यें जें सैन्य हिंदुस्थानांतून पाठविलें त्याचा खर्च व हिंदुस्थान सरकाराला इतर जहाजा संबंधी लागलेला खर्च हिंदुस्थानचें खजिन्यांतून घ्यावा. अशा प्रकारचा ठराव होईल हें प्रत्येकांचें अनुमान होतें त्या मुळें विशेष नवल वाटलें नाहीं. इंग्रजी राजकीयप्रकर्णीं जीं असतील तीं सर्व हिंदुस्थानांस लागूं आहेत जी १७९६ सालीं हिंदुस्थानची स्थिती होती तद्वत १८९६ सालीं आहे असें समजावें. हिंदुस्थान सरकार ह्मणजे इंग्लंडांत राज धुरंधर मंडळीचें हुकूम इकडे आणून सोडण्याचें यंत्र आहे. इंग्लंडांतील लोक जें सांगतील तसें इकडे केलें पाहिजे. ज्या अर्थीं इंग्लिश लोक हिंदुस्थानावर राज्य करितात त्या अर्थी हिंदुस्थानच्या खजिन्यावर मालकी त्यांची. ते वाटेल तसा त्याचा विनियोग करूं शकतात.

सौडन करितां जो खर्च लागला असेल तो सर्व खर्च मग ३५००० पौंड असो अगर ७०००० पौंड असो हिंदुस्थानच्या खजिन्यांतून पुरविला पाहिजे. हिंदुस्थानचा खजिना वाटेल त्या उपयोगा करितां सदैव उघडा.

एखाद्या अधिकारापन्न मनुष्यानें वाईट काम केलें व तें वाईट नाहीं असें सिद्ध करून दाखवावयाचे असलें ह्मणजे तो नाना तऱ्हेच्या युक्त्या व साधनें शोधून ठेवितो व आपला पक्ष खरा करून घेतो. तद्वत् हल्लींची सोडनच्या खर्चाची स्थिती होय. हिंदुस्थानांतील सर्व लोक व इंग्लंडांतील बहुतेक व लोक याच खर्चाबद्दल प्रतिकूल असतां हल्लीं अधिकारारूढ असलेल्या लहानशा मिनीस्ट्रीनें आपला पक्ष सिद्धीस नेला व हजारो लोकांचे तोंडास पानें पुसलीं! यांचें नांव अधिकार स्वहिता पुढें परहित तुच्छ यांत कांहीं संशय नाहीं. अशा प्रकारें नाना तऱ्हेनें खर्च करून शिवाय हिंदुस्थान सरकारास कर्ज पाहिजेच आहे. लांडग्याच्या न्याया प्रमाणें हा न्याय आहे. तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतीलः तूं जरी दिल्या नाहींत तरी असें ह्मणून आपलें काम करून घ्यावयाचें; याचें नांव खरा न्याय.

\+ + +

हिंदुस्थानांतले लोक आपली बरोबरी करूं लागले ह्मणून अंग्लो इंडियन लोक कसे जळफळतात व आमच्या उच्च प्रतीच्य शिक्षणावर कशी धाड चालतात हे त्यांच्या कृतीवरून दिसून येतें. हल्लीं मुंबई युनिव्हर सिटीची ग्यांट अजिबात बंद करण्यांत आली आहे. प्रथम २०००० हजार होती शेवटीं ५००० हजारावर आली होती. परंतु ती सुद्धा डोळ्यांत सलूं लागली. एकंदरींत हिंदुस्थानचे लोक अज्ञान स्थितींत असावे असा त्यांचा हेतु दिसतो. परंतु तो कितपत सिद्धीस जाईल, याची वानवाच आहे.

\+ + +

पूर्वींच्या जुन्या सरदार लोकांच्या वागणूकी वरून हल्लींची अशी स्थिती होईल असें वाटत नसे. ते सरदार नेटीव लोकांशी जास्त दळवळण ठेवण्यास इच्छित व तसें करण्यास प्रयत्न ही करीत परंतु हल्लींचे सरदार फार विलक्षण व पूर्वींच्या सरदारांच्या उलट. त्यांना सलाम जर कोणी केला नाहीं तर लागलींच हात घाईवर येतात. हें कितपत त्यांना स्तुत्य आहे हें सहज उघड होतें. तद्वत्च युरेशियन्सही होत. ते सुद्धां भेद पाहूं लागले. वास्तविक खरी स्थिती ओळखण्याची सोडून मोरा प्रमाणें लांडोर नाचूं लागली तर कोणी मोर नाचतो असें ह्मणणार नाहीं. वहे अर्धवट साहेब यांचा मान कितपत युरोपियन लोकांत असतो हें त्यांनाच माहित आहे. परंतु आज काळ सद्दीचा जोर आहे.

\+ + +

आमच्या नेटीवांत ही कांहीं तोंडपुजा करणारी मंडळी आहेत त्यांची गती वाघुळा प्रमाणें होते हें माहित असतां जाणून बुजून खापर माथीं घेतात. हें किती लाजीरवाणें आहे. आपसांत लाथाळी, दुसऱ्यास देखावा व स्वहितास बुड! अधिकार आला कीं सर्व पूर्व स्थितीचा अभाव! या करितां दुसऱ्यास दोष देण्यापेक्षां आपण आपल्यास दोष लावून घेणें बरें!

× + ×

तारीख २ माहे आगष्टचे "नॉलेज" पत्रांत सिंध हैदराबाद इकडील एका अंमलदारानें बनीयावर जुलुम केल्या बद्दल इंग्रजी मजकूर लिहून आल्यावरून त्याचा गोषवारा येणें प्रमाणें:–

सिंध हैदराबाद येथील प्रभात पत्रांत एका अंमलदारानें एका बनीयावर जुलूम केल्या बद्दल मजकूर प्रसिद्ध झाला होता. तो असा कीं—गेल्या मे महिन्यांत एका अंमलदारानें बनीयास बोलाविलें आणि एखादी स्त्री आणून दे ह्मणून सांगितलें. सदहू बनियानें पुढें फिर्याद ही केली. परंतु त्यानें त्यास मी स्त्रिया आणून देणारा इसम नव्हे असें उत्तर दिलें व अशा प्रकारानें माझा उपमर्द करूं नये असें ही सांगितलें पुढें एक दोन आठवडे गेल्यावर एके दिवशीं मध्यरात्रीं त्या अंमलदारानें बरोबर चपासी घेऊन त्या बानियाचे घराचे दारावर थाप मारिली त्या बरोबर तो जागा होऊन दार उघडून घरा बाहेर आला आणि पहातों तो

तोंच अमलदार चपास्यासह चवुतऱ्यावर उभा इतक्यांत तो अंमलदार घरांत शिरला व बनियानें पुष्कळ अडथळे घेतले परंतु सर्व व्यर्थ. शेवटीं काय पाहिजे ह्मणून त्यांस विचारतांच "तुझी बायको मला दे, जर तूं देणार नाहींस तर उद्यां तुला तुरुंग पाहावा लागेल" हें त्याचें ह्मणणें अगोदरच समजल्यामुळें त्यानें साफ नाहीं ह्मणून उत्तर दिलें. त्याची घाबरलेली बिचारी स्त्री स्वयंपाक घरांत दडून बसली नंतर तो अंमलदार त्याचें घर सोडून चालता झाला. दुसरे दिवशीं सकाळीं तो बनीया गांवचे पंचाकडे प्रथम गेला आणि त्यांच्या जवळ फिर्याद केली परंतु पंचांनीं आपले हातून कांहीं होणार नाहीं ह्मटल्यावर त्यानें सरकारांत फिर्याद केली. एक अर्ज मे. कमिशनर साहेबाकडेस, एक कलेक्टर साहेबाकडे आणि एक अ० कलेक्टराकडेस असे मिळून त्यानें तीन अर्ज पाठविले. पुढें लौकरच डि० पो० सु० मे० गोल्डस्मिड याना चौकशी करितां पाठविलें. त्यांनीं सदर्हू गांवीं येऊन बनीया व त्याची बायको या दोघास बोलावून त्यांचें काय ह्मणणें होतें तें सर्व लिहून घेतलें परंतु तो अंमलदार असल्यानें कोणी त्याचे विरुद्ध साक्ष देण्यास धजेना. शेवटीं फिर्यादीनें सांगितलें कीं सदरहू अंमलदारास येथून काढल्या वाचून पुरावा मिळणार नाहीं पुढें चौकशी चालू झाली. तीन साक्षिदारांनीं पुरावा दिल्यावर पुढें आज पर्यंत काय झालें हें कोणास माहित नाहीं. कामांध मनुष्य तर पशुच खरा!

गेल्या जुलई महिन्याचे १८ वे तारिखेस इंग्लंड आणि ऐरलंड येथील हिंदु रहिवाशांची सामाजिक परिषद् माँटेग्यु मानशन येथें भरली होती. चिकागो येथील धर्म संबंधाचे पार्लमेंट मधील हिंदु धर्माचे मुखत्यार स्वामी विवेकानन्द हे त्या दिवशीं प्रेसिडेन्ट होते. पुष्कळ युरोपियन सभ्य स्त्रिया व गृहस्थ यांची गर्दी होती व त्या मध्येंच हिंदु-पार्शी आणि मुसलमान ही होते. प्रथम चेरमन यानीं सभेच्या कामास सुरवात केली नंतर मि. राम मोहनराय ब्यारिस्टर यांनीं "हिंदु व त्यांची नड" या विषयावर चांगलें भाषण केलें. त्यांनीं प्रथम या परिषदेमध्यें सामाजिक प्रश्ना शिवाय राजकीय संबंध मुळींच काढूं नये ह्मणून कळविलें. हिंदुस्थानांत सर्व जातीच्या लोकांपेक्षां हिंदु लोकांची संख्या मोठि आहे ती सुमारे २०००००००० कोटी आहे, व हिंदुस्थानांत धर्म संबंधा खेरीज इतर सर्व जाती भेद आहे तो मोडून टाकावा. त्यामुळेंच मोठ मोठें भेद व पोट भेद झाले आहेत समाजांत अद्याप पुष्कळ प्रकारच्या सुधारणा करणें जरूर आहेत. त्या येणें प्रमाणें:—(१)प्रथम शिक्षणाचा प्रादुर्भाव जास्त करणें व त्या योगें नानातऱ्हेच्या लोकांच्या जुन्या समजुती नाहींशा करणें, (२) खाण्यापिण्या संबंधानें जातीभेद नाहींसा करणें,( ३ ) प्रीती विवाह करणें. [ ४ ] विधवांची पुन्हा लग्नें करणें, ( ५ ) लहानपणीं लग्नें न करणें, ( ६ ) आणि शेवटीं हिंदुस्थानांतील परदेशीं प्रवासबद्दल कडक नियमानुबंधन खुलें करणें. व या शिवाय आणखी कांहीं सुधारणा केल्यास खरोखर या जगांत मुसलमान वाल्यांस पुष्कळ उपयोग होईल.

ज्या अर्थी हिंदुस्थान इंग्लिशांचे अमलाखालीं आहे त्या अर्थी इंग्लिश लोकाप्रमाणें योग्यतेस येण्यास्तव नेटिव्हास ही सारखी स्वतंत्रता पाहिजे. त्यावर मिस मोन्यान्ट यांनीं हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या स्थिती संबंधानें थोडासा उल्लेख केला. वयोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध असे मि. दादाभाई नौरोजी यांनीं असें प्रतिपादन केलें कीं या संस्थेचा हेतु सफल होण्यास्तव चांगल्या शाळा असणें हें साधन होय. १८४९ सालीं तीन हिंदु व ३ पार्शी शाळा मी आणि इतर मंडळींनीं सुरु केल्या व पुढें त्या मरभराठीलाही आलग हात्या. नंतर डा. मानक्युर कानवे यानीं या संस्थेंतील लोकांस उपदेश केला कीं कोणतें ही काम घाईनें करण्यापेक्षां हिंदुस्थानांतील शाहाणे लोकांचा जमाव करण्याची खटपट करावी. आणि अशा काळजी पुरःसर रितीनें कालगतीनें हेतु सिद्धीस जाईल. चेअरमन, सेक्रेटरी वगैरे मंडळींचीं भाषणें झालीं व आभार प्रदर्शित करून सभेचें काम संपलें.

---

विवेकानंद स्वामी यांनीं अमेरिकेंतील बऱ्याच प्रदेशांत हिंडून व व्याख्यानें देऊन ते अलीकडेस इंग्लंदांत लंडन शहरीं आले आहेत. तेथें ही त्यांनीं व्याख्यांनांचीं झोड लावून दिली आहे. सदर्हू गृहस्थांचे मूल वसतिस्थान बंगाल प्रांतांत असून कलकत्ता युनिव्हरसिटींतील पदवीधरा पैकीं हे एक आहेत. प्रपंचपाश सोडून ह्यांनीं संन्यासदीक्षा धारण केलेली आहे. यांनीं आपल्या आर्यधर्माचें पुष्कळ परिशीलन केल्यामुळें त्यांना धर्मरहस्यें चांगलीं अवगत झालेलीं आहेत. आपल्या सनातन धर्माची त्यांना फार भक्ति असून त्यांचा अभिमान ही ते पुष्कळ बाळगतात. धर्म विषयाकडे फार कळकळीनें मन लावून व दीर्घ उद्योगानें त्याचा सतत अभ्यास करून अनुभवांन्तीं त्यांचें दृढ मत झालें आहे कीं, आपलीं धर्मतत्वें फार श्रेष्ठ आहेत व त्यांचें पालन यथोक्त करण्यांतच हित आहे.

लंडन येथें एक सभ्य गृहस्थ भेटीस गेला असतां भेटींत फारच मनोरंजक संवाद झाला त्याचा गोषवारा देण्याचें आह्मी योजिलें आहे.

भरत भूमि ही प्राचीन काळापासून विविध शास्त्रांचें आदिस्थान होय. सृष्टि वैचित्र्याचें अवलोकन करून तदंतर्गत नित्यानित्य धर्म व तत्संबंधी सिद्धांत स्थापन करणें हें काम कष्टाचें व विशाळ बुद्धीचें आहे. व जों जों या शास्त्रांस उत्कर्ष येतो तों तों बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रकट होते. अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांचें लक्ष्य प्रायशः सृष्टीपसाऱ्याचें स्वरूप ओळखून घेण्याकडे लागलें आहे. प्राचीन मुनिजनांचें लक्ष्य अध्यात्मिक व अतींद्रिय विषयांकडे विशेष असे. ऐहिक सुखांचा त्याग करून प्रपंचपाश मागें न लावून घेतां आपले पूज्य थोर मुनिजन अरण्यांत निवांत स्थलीं वास करीत असत. ते दुष्ट मनोविकारांचें नियमन करींत असत त्यामुळें त्यांचे मनाची प्रकृति सर्वदा प्रसन्न, शांत व सत्वमय असे. अशा स्थितींत विचारशक्तीस अधिकाअधिक तेज, बळ व चांचल्य येतें. बुद्धिविकासाचा आरंभ भर व, उत्कर्ष क्रमाक्रमानें होत जातो येणें प्रमाणें निवांत स्थलीं वास करण्याचा आमच्या पूर्वीच्या मुनिजनांनीं अमर्यादित विचार सृष्टि निर्माण करून तिची अनेक स्वरूपें शोधून काढलीं.

येणें प्रमाणें अतींद्रिय सृष्टिसौंदर्याचें अवलोकन करण्यांत आपले पूर्वीचे मुनि मग्न झाले होते. तेव्हां अर्थातच त्यांचे कालीं मानसिक शास्त्रांचा उत्कर्ष फार झाला. व या शास्त्रांच्या उत्कर्षाची परमावधि भरत भूमींत जशी झाली तशी इतर कोठें ही झाली नाहीं अर्थात या बाबतींत इंग्लंदापेक्षां हिंदुस्थानचें पाऊल पुढें आहे. व जों जों या शास्त्रांचा परिचय पाश्चिमात्य लोकांस होत चालला आहे तों तों त्यांना प्राचीन आर्य मुनिजनांच्या अपूर्व बुद्धिमत्तेची व गहन विचारांची श्रेष्ठता स्पष्टपणें दिसून येत आहे. व त्यांच्या सत्यते बद्दल खात्री वाटत आहे. या शास्त्रांत जें अपरिमित तत्वज्ञान भांडार भरलें आहे तें प्राप्त करून घेण्याची त्यांची दिवसें दिवस इच्छा होत चालली आहे. आर्य शास्त्रांची जेव्हां पाश्चिमात्यांस पूर्ण ओळख होईल तेव्हां त्यांचे विचार ही तदनुरूप बदलून त्यांचे व हिंदुस्थानवासी लोकांचे समीकरण होईल. आज मित्तीस बऱ्याच अशीं इंग्लिशांचे व हिंदु लोकांचे धर्म संबंधी विचार जवळ जवळ जमतात. धर्म तेथून सर्वांचा एकच मात्र कारण परत्वें भिन्न थलीं तो भिन्न स्वरूपानें आढळतो. सत्यस्वरूप धर्माभोंवती एक बाह्य पटल मनुष्याचे अज्ञानामुळें उत्पन्न झालें आहे. व ह्याच बाह्य पटलास वेडा लोक समूह अधिक पूज्य मानीत असतो. यामुळें अर्थात पुष्कळ वेळीं खऱ्या धर्माचा लोप होतो व भलभलत्याच गोष्टीस महत्व येतें तें इतकें कीं त्या बाह्य व मिथ्या गोष्टींच्या सिध्यर्थ आपण आपलें जीवितही मोठ्या कौतुकानें बळी देतो. या करितां आपलें मुख्य कर्तव्य हें आहे कीं अशा मिथ्या भासानें खऱ्या गोष्टींचा लोप न होऊं देतां, सत्य स्वरूप धर्माची एकता जाणून घ्यावी व तिचा सर्वत्र प्रसार करावा.

हिंदु धर्मांत बाह्य गोष्टींचें वर्चस्व नसल्या कारणानें मूळधर्म बीज प्रत्येकाचे हृदयांत उपजत पेरलें गेलें आहे. ह्मणून स्वभावतःच हिंदु लोकांचा स्वभाव सत्वस्थ आहे क्षमाशीलता त्यांचें ठिकाणीं राहण्याचें कारण तरी मूळ हेंच होय. हिंदुस्थानांत अनेक धर्मपंथ उद्भवले व अनेक बाहेरून आले. या आंगतुक पंथांनीं वर्चस्व मिळविण्याः साठीं प्रळय केले व कांहीं लयास ही गेले. तरी पण या सर्वाशीं नेटानें सामना धरून आज मित्तीपर्यंत आर्य धर्म जसाचा तसाच कायम राहिला. याचें कारण हेंच कीं खऱ्या धर्माचें स्वरूप जाणून झालेलीं संस्कृत मनें सदा क्षमाशील असतात. प्रत्यक्ष पहा कीं इंग्लंदांत धर्मपंथ जस जसे माजत चालले तसतसें परस्परांत वैमनस्य व द्वेषभाव उत्पन्न होऊन एकमेकांनीं एकमेकांचा क्रूर छळ केला व अति अस्वस्थता माजवून अनेक व भयंकर उलाढाल्या केल्या. हा सर्व प्रकार युरोपाचे इतिहासांत सुप्रसिद्ध आहेच. परंतु हिंदुस्थानांत असा प्रसंग कधीं तरी आला काय? जैन धर्म ह्मणजे नास्तिक धर्म याचा व आर्य धर्म याचा परस्पर कितीतरी विरोध आहे! तरी जैन धर्माची विटंबना आर्यधर्मानें कधीं तरी केली काय? हे परस्पर विरोधी धर्म एका स्थलीं व एका कालीं चालू होते. तसाच महमदी धर्म. या महमदी धर्माच्या रखरखीत अंगारानें नित्यशः देह पोळून भाजून खाक होत असतांही अति निमूट पणें व शांतता धारण करून या आर्य लोकांनीं आपल्या धर्माचा परिपाळ केला व हा क्रूर पंथाग्नि शामविण्यास क्षमे वाचून दुसरें कोणतें योग्य साधन होतें! असो आर्य धर्म साधूंचा आहे व क्षमा हेंच साधूंचें शील आहे. ह्मटलेंच आहे कीं "क्षमा शीलं साधूनाम्."

हें बाह्य व मिथ्या क्रूर स्वरूप सोडूनधर्माच्या खऱ्या स्वरूपाकडे जसजशी मनुष्याची प्रवृत्ति वळेल तसतसें धर्मैकतेची सत्यता पूर्णपणें अवगत होईल व आपण सर्व मनुष्यें एकाच घरचीं लेकरें असून सर्वांचा स्रष्टा नियंता व शास्ता एकच आहे. सर्वांचे व्यापार समनियमांनीं साधलेले असून हेतु समान आहेत. सारांश ईश्वराची भक्ति व मनुष्याचें खरेंप्रेम या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत हें सहजीं समजेल ओघानें गोष्ट आली ह्मणूनच या स्थलीं हें सांगणें जरूर दिसतें कीं हिंदुस्थानांत सांप्रत चालू असलेला जातिनिर्बंधाच्या हा वर सांगितलेल्या भ्रांतिमूलक पटला पासूनच उत्पन्न झालेला आहे. मूळ धर्मा प्रमाणें मान्य असलेला जातिनिर्बंध हल्लींच्या जाति निर्बंधाहून फार भिन्न आहे. त्यामुळें हल्लीच्या जाति निर्बंधापासून राष्ट्राचें फार अहित होत आहे. राष्ट्राचा उत्कर्ष ही पुष्कळ अंशानें याच गोष्टीमुळें रोधलेला आहे. तरी पण कालानें जेव्हां धर्माचें खरें अंग लोकांस पूर्णपणें कळून येईल तेव्हां या वरील उक्तीची सत्यासत्यता त्यांस सहज दिसून येईल व त्याप्रमाणें ते आचार विचार बनवितील. आतां जातिभेद अनिष्ट कारक आहे असें ह्मटल्या वरून साहजिक कल्पना होते कीं जातिभेद मोडला ह्मणजे मग बऱ्याच अंशीं हिंदुस्थानांतील लोक हे युरोपियन लोकांप्रमाणें बनतात. ह्मणजे युरोपियन लोकांचे आचरणा वरून हिंदुस्थानांतील लोकांचें आचरण सुधरेल. परंतु हें ह्मणणें बरोबर नाहीं. दुसऱ्यानें येऊन आमच्या देशाची सुधारणा करणें हें अशक्य आहे. खरी सुधारणा होण्यास मूळ कारणें आह्मा लोकांतच असलीं पाहिजेत व तीं आहेत देखील. परकीयांनीं येऊन आह्मांस सुधारण्या पेक्षां हें ह्मणणें ठीक आहे कीं जें काय होईल तें आपणच करूं. पूर्वीं पासून आतां पर्यंत आपण आपली देशस्थितिपरंपरा सुधारीत आलो व याचप्रमाणें पुढें ही सुधारूं. मात्र काल मानाप्रमाणें कमी अधिक परकीयांचा कल्पनांचें ग्रहण करून तदनुरूप व तत्सहाय्यानें आपल्या सांप्रत स्थितीचें स्वरूप हळूंहळू बदलूं. सारांश दुसऱ्याचे ओंजळीनें पाणी पिण्यापेक्षां आपल्या हिंमतीनें, अक्कलेनें, व हुशारीनें व मेहनतीनें जें आपण करूं तेंच सार्थ व हितावह होईल.

आपल्या हिंदुस्थानास सुदिन येण्यास त्यास पूर्वीचें क्षात्र शौर्य असलें पाहिजे व त्या शिवाय तो येणार नाहीं अशी कित्येकांची समजूत असेल तर चुकीची आहे. कांहीं शौर्याचीं कामें न करितां चीन देश बलाढ्य झाला. आतां चीन देश खालवलीं याचीं

कारणें निराळीं आहेत. परंतु देश बलाढ्य होण्यास ह्मणजे शौर्य अत्यावश्य आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय आणणारा चीन देश होय.

येणेंप्रमाणें विवेकानंद स्वामींचे विचार प्रकट झाले ते वर दिलेले आहेत. याविषयीं मतभेद पुष्कळ असेलच. परंतु इतकें मात्र येथें सांगणें जरूर आहे कीं आपल्या धर्माचा खरा अभिमान बाळगून त्याचा श्रेष्ठपणा लोकांस समजून देण्याची व त्या प्रमाणें त्यांचीचित्तवृत्ती बदलविण्याची उत्कंठा धरणें व त्यासाठीं दीर्घ श्रम घेणें हे काम फार कठीण आहे. व तें काम या स्वामींनीं उचललेलें आहे व ते फार नेटानें व मोठ्या बाणीदारपणानें सिद्धीस नेत आहेत हें पाहून आह्मांस फार आनंद वाटतो. कोणताही विषय कां होईना, त्या संबंधानें असेच स्तुत्य उद्योग आरंभणें हें फार चांगलें आहे. या प्रमाणें आमचे तरूण व विद्वान देशबंधु देशकार्यांत उत्सुकतेनें हातभार लावतील अशी आहे.

## The Berar Samachar

MONDAY AUGUST 24 1896

A serious and alarming report comes from Pinjar in this Taluka. It is said that some dregs of the Mahomedan community of that village have played a wanton mischief towards their Hindu brethren. On or about the 15th current they managed to kill a cow, and stored all blood in a pot. About mid-night they moved about in numbers with the blood vessel and annointed every Hindu idol with the blood. It is not yet known who the ring-leaders are nor have we learnt what antecedent facts of ill feeling and bitter hatred led those Mahomedans to act in such an untoward and desperate manner. It was our happy boast that the Hindus and Mahomedans in Berar live in most friendly terms of amity and mutual good respect. When a large portion of India was enveloped in *native* riots between the Hindus and Mahomedans our province was almost proof to such disturbances. There were some exceptions in certain small localities and the present instance is a similar one. We hope that the whole matter will soon end in perfect peace and good understanding amongst the people.

On Friday last an *express* Goods-train left Dapki for Akola. While it was running in full speed the axle of a waggon gave way and some of the waggons were de-railed. The breaksman used his utmost skill to stop the train but the weight became too heavy for the engine to drag waggons that were being smashed to pieces along side the rails. The big iron hooks could no longer support their connection with the waggons which were being de-railed and the engine was left alone to run its way to Akola. This lucky chance stopped the speed of other carriages. The most fortunate circumstance of the accident was that the waggons in the rear generally remained safe and secure with all their contents. One would naturally suppose that the contents must be horses or some ton loads of inanimate goods. But no such contents were there. Pilgrims from Nassik on their return journey towards the Nagpur side mustered strong in a motley crowd. The hair breadth escape of the lives of these men is the happy characteristic of the fatal accident. The Railway-authorities should hence forth be more careful to consult the urgent wants of third class passengers who are the main patrons of the company. Let us preserve our further remark till we get an official and authentic report of the accident.

The question whether India is progressing morally as well as materially is a very difficult one—not likely to be solved without looking into the way the wants of the people which multiply with advancing years are provided for by the Legislative Assemblies of India. The real purposes to meet which all modern legislation is taking place, show that the Government have not yet thought of directing their attention to make legislation aid and accelerate the moral elevation of the Indian subjects. We can with advantage quote here the observations made concerning this subject by the India.

"ON the face of the annual "Statement of the Moral and Material Progress and Condition of India" all is well. Indeed, there is hardly a single department of national activity where the Official eye fails to discern signs of improvement. Where the figures happen to go the wrong way, they still manage somehow to set off the superior rectitude of the figures that go the right way. The difficulty is to know the true significance of the masses of statistics, whether by the help of the official gloss or in spite of it. The record of legislation, viceregal or provincial, is extremely modest. The most important general Acts were, of course, those dealing with the cotton duties. In Bengal and in the North-West Provinces and Oudh some amendment and expansion of municipal Acts was accomplished; in Bombay a territorial extension was given to certain laws; but not a single Act from Madras received the assent of the Governor General. The energy of the legislators appears to have been directed elsewhere. The main point, no doubt, is quality; but the tale of legislative achievement would hardly seem to keep pace with the development of the needs of the country and with advancing opinion. Meantime, it is gratifying to find that, although there has been no enlargement of municipal authority, nor any increase in the number of municipalities, the general municipal results of the year still gain a very decent official approval. "The conduct of business by the municipal committees was, in the majority of cases, considered by the governments of the various provinces to be satisfactory." The approval is subject to a certain qualification, indeed—a qualification well worth signalising with emphasis, although it might easily be paralleled in places where municipal government has been in operation for centuries. "The interest taken in municipal matters by the electors," we are told "was far from keen." This lack of serious interest in home matters necessarily tells on the argument for a more general application of the principle of Home Rule, and we should be glad to see it reformed away. At the same time, "measures for the improvement of the water supply, which is still very deficient over India, were taken or sanctioned during the year in each province, and many important drainage works were proceeded with." There is life in the system, clearly; but the officia criticism ought to prompt the electors to strike its roots deeper, and to show to all men, beyond cavil, that they are real earnest about the principll involved."

## वऱ्हाड

हवामान—या आठवड्यांत उघाडी बरीच होती. एकंदर पाऊस २९ इंच झाला. हवा चांगली होत चालली असून रोगराई पुष्कळ हटली आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत.

मोठ्या दुःखाची गोष्ट कीं रा० रा० विष्णु हरी जोशी यांस कांहीं कारणामुळें सस्पिंड करण्यात आलें आहे.

गेल्या १५ वे तारखेच्या सुमारास पिंजर येथें गाय मारून तिच्या रक्तानें गांवांतील सर्व देवदेवतांस मुसलमानांनीं अभिषिचन केलें! गेल्या शुक्रवारीं सदहू गांवचे पन्नास साठ हिंदु लोकांनीं मेहेरबान डिपुटी कमिशनर यांजकडे अर्ज केला आणि त्यावरून मेसर्स वाल्श व ग्यालोवे हे उभयतां चौकशी तार्थी गेले आहेत.

गेल्या शुक्रवारीं डापकी व अकोला या दोन स्टेशनामध्यें तिसऱ्या मैलाच्या सुमारास एक मालगाडी येत असतांना एका डब्याचा कणा तुटला आणि डबे एका मागून एक जमिनीवर आदळून छिन्नभिन्न झाले. एंजिनास जमिनींत जात चाललेल्या डब्यांचें ओझें ओढवेना आणि अखेरीस एंजिनच्या सांध्यांचा साखळदंड तुटल्यामुळें एंजिन पुढें चालतें झालें आणि मागील डब्यांची गती कमी होत चालली. याच माल गाडीला नाशिकऱ्या यात्रेकरूंचे डबे जोडले होते पण ते डबे मागें असल्यामुळें व गती बंद झाल्यामुळें उतारूंचे प्राण सुरक्षित राहिले ही मोठी आनंदाची गोष्ट होय. अपघात तर खराच पण एंजिनचा साखळदंड तुटला हा मोठाच चमत्कार व ईश्वरी कृपा होय. आणि ईश्वरी कृपेनेंच सर्व मनुष्यें बचावलीं ही आनंदाची गोष्ट होय.

खान बहादूर सयद शमसुद्दीन अल्लीखान डेपुटी कमिशनर वर्ग ३ यांनीं आपली रजा आणखी सहा महिने वाढविली आहे.

मि. एफ डब्ल्यू. मीडो डिपुटी कमिशनर आकोला, यांस असिस्टंट सेशन जज्जाचे अधिकार देण्यांत आले.

तेल्हारे कोर्टाच्या हद्दींतील सुलज येथील रामलाल नरसिंग नांवाच्या मारवाड्यानें आपली फिर्याद मुदतींत आणण्यासाठीं हिशोबाच्या वहीमध्यें निराळें पान घातल्याचा आरोप त्याजवर आला आहे.

कोलोरी तालुका चिखली येथील नारायण नांवाच्या २० वर्षाच्या मुलानें आपल्या बापास टार मारले असा त्याच्यावर आरोप होता पण कम पुराव्यामुळे त्याच्या अंगीं गुन्हा लागू झाला नाहीं.

रोहिला आगा सय्यद वाहेद, अकोलेखेंड याजवर कलम ३३० पिनलकोड प्रमाणें आरोप होता पण आरोपी गेल्या सेशनांत निर्दोष ठरला.

चांडोल येथील यादव नागोराव याजवर खूनाचा आरोप होता पण खून शाबित न झाल्यामुळें ३ वर्षांची शिक्षा झाली.

पुसद ता० १७।८।९६

येऊन गेले—मे० रुस्तुमजी साहेब डेपुटी कमिशनर यांची स्वारी ता० १०।११ मिनहूस येथें तपासणी करितां आली होती सर्व सरकारी आफिसें व संस्था व त्याचप्रमाणें गांवची सफाई पाहून साहेब बहादूर फार खुष झाले. येथील सरकारी मराठी शाळेतील मुलांस वार्षिक बक्षिसें वांटण्याचा सभारंभही साहेब बहादुरांचे हातानेंच ता० ११ रोजीं झाला. समारंभास गांवांतील सर्व सभ्य मंडळी आली होती. साहेब बहादूरांनी कांहीं वर्गांची परीक्षा घेऊन बक्षिसें वांटलीं. समयास अनुसरून आमचे येथील रसिक व लोकप्रिय तहसीलदार मि० विठूजी नारायण व एक सभ्य गृहस्थ यांचीं भाषणें झालीं. नंतर शाळे करितां घड्याळाची उणीव असल्याचें साहेब बहादूरांस कळतांच त्यांनीं मोठ्या उल्हासानें स्वतां पांच रुपये वर्गणी दिली व मे. तहसीलदार साहेबांनीं २ रु० व इतर १२ गृहस्थानीं प्रत्येकीं एक रुपया प्रमाणें वर्गणी दिली व त्यांचें घड्याळ आणविण्याचें ठरलें.

उदय—येथें कांहीं वर्षांपूर्वीं नदीच्या काठीं पांच सुरेख मूर्ति सांपडल्या परतु ती जागा आमचें कबर स्थान आहे अशा संबंधानें मुसलमान मंडळीनें आग्रह धरिल्यावरून तें प्रकरण थेट हिंदुस्थान सरकार पर्यंत जाऊन अखेर ती जागा हिंदु लोकांस मिळाली. ह्या वादांत लोकांनीं आरंभीं जमविलेली वर्गणी बहुतेक खर्चून देवतांची योग्यस्थळीं स्थापना करण्याचें काम तसेंच मागें राहिलें होतें. त्याचें श्रेय हल्लींचे लोकप्रिय तहसीलदार साहेब यांस मिळावें असाच ईश्वरी संकेत असल्यामुळें काल रोजीं येथील राजे उदाजीराम उर्फ नाना साहेब यांच्या अध्यक्षतेखाली टोलेजंग जाहीर सभा भरली. त्या प्रसंगीं मि० विठूजी नारायण यांनीं आपल्या रसिक वाक् चातुर्यानें जमलेल्या जनसमूहाचीं मनें इतकीं तल्लीन करून सोडिलीं कीं लागलींच प्रत्येकानें उठून स्वच्छेनें आपल्या ऐपतीपेक्षां ही जास्त वर्गणीचे आंकडे घातले. खुद्द तहसीलदार साहेबांनीं या सत्कृत्याकरितां आपला एक महिन्याचा पूर्ण पगार रु० १७१ दिला. या प्रमाणें ता० मजकूरीं एकंदर दोन हजारांवर आंकडे पडले व आणखी बरेच पडावयाचे आहेत. या संबंधाची व्यवस्था करण्या करितां व जास्त वर्गणी जमविण्या करितां २० गृहस्थांची एक कमिटी नेमण्यांत आली. देवालय बांधण्याचे काम वर्गणी जमा होतांच सुरू होईल असें ठरलें. नंतर पानसुपारी हार तुरे वांटून सभा विसर्जित झाली.

## वर्तमानसार.

न्युयार्क येथें उन्हाळा फार कडक असून उन्हाच्या झळींनें गेल्या पांच दिवसांत १२० माणसें ठार झालीं असें १० ची तार सांगत्ये.

१८९५।९६ सालच्या माहितीवरून समजतें कीं, खोरासान येथील इंग्रजी व्यापार बराच कमी झाला असून रशियन व्यापार बराच वाढला आहे. हा पर्शीयांतला इंग्रजी व्यापार आणखी कांहीं वर्षांनीं याहूनही जास्त बसेल व रशियाचा वाढेल असें अनुभविक लोकांचें अनुमान आहे. अ० द०

हिंदुस्थान सरकारानें अलीकडे असा एक हुकूम सोडला आहे कीं, नेटिव संस्थानिकनीं ब्रिटिश हिंदुस्थानांत कोणत्याही प्रकाराची मिळकत संपादन करितां कामा नये.

एस्किमॉक्स [ उत्तर रशियांतील ] लोकांमध्यें वैद्यांच्या फीचे संबंधानें फारच चमत्कारीक नियम आहेत. आजारी माणसाकडे जेव्हां जेव्हां डा. जातो तेव्हां तेव्हां त्याला फी देण्यांत येते. तो आजारी त्या दुखण्यांतून बरा झाला तर त्या डाक्तराला मिळालेली त्याच्या हक्काची झाली असें होऊन ते सर्व पैसे तो ठेवितो. परंतु आजारी मनुष्य बरा न होतां मेला तर त्या डा. नें प्रत्येक भेटीची जी फी मिळविली असेल ती सर्व फी त्याला मृत मनुष्याचे संबंधी मनुष्यास परत द्यावी लागते! आ. वृ.

तुर्की सैन्याचा बलगेरियांतून जाण्याचा प्रयत्न बल्गेरीयन लोकांच्या सरहद्दीवरून तुर्की सैन्याचे एका टोळीनें जाण्याचा प्रयत्न केला असतां बल्गेरीयन लोकांची व त्यांची झटापट झाली. त्या झटापटींत एकमेकां बरोबर बरीच सरबत्ती होऊन शेवटीं तुर्की लोक पाठीमागें सरले.

सबजज्ज हायकोर्ट व डिस्ट्रीक्ट कोर्ट ह्या परीक्षेस येणाऱ्या उमेदवारांच्या नियमांत हायकोर्टाच्या जज्जांनीं नुकताच फेरफार केला आहे, त्यांत असें ठरविलें आहे कीं, महाराणी साहेबाच्या सार्वभौमत्वाखाली असणाऱ्या नेटिव्ह संस्थानांतील कोणाही इसमास परीक्षेस बसण्यास बिलकूल हरकत नाहीं.

इटलीमध्यें मीठ अतिशय महाग आहे इतकें कीं, साखरेपेक्षां त्याची किंमत जास्त द्यावी लागते! भूमध्यसमुद्रांतून हें मीठ उत्पन्न करण्यांत येतें व त्या समुद्राचे कांहीं भागांत रात्रंदिवस इटली सरकारचा इतका जागृत पाहरा असतो कीं, कोणी चोरून त्यापासून मीठ तयार करूं नये. ह्या पदार्थावर सरकारची फार कडक नजर असून सर्व वस्तूंपेक्षां मिठावर कर भारी ठेवण्यांत आला आहे. स. वि.

पुणें— गणपतीचे उत्सव तर येऊन ठेपले. मेळेवाले आपल्या तयारीसही लागले आहेत. गणपती करणारांची सभा करून देशी कपडे वापरणारे मेळेवाल्यांस गणपती पुढील गमतीस परवानगी द्यावयाची नाहीं असा ठराव करण्याचा कित्येकांचा प्रयत्न असून पुष्कळांची या कामास मान्यता आहे. चांगलें आहे. कांहीं मंडळी देशी कपडा वापरण्याबद्दल उपदेशपर पदें ह्मणणाऱ्या मेळेवाल्यांस बक्षिसें देणार आहेत.

पंजाबांत पावसाची फार जरूर आहे गुरें उपासानें फार मरत आहेत.

गेल्या जुलै महिन्यांत चांपियन रीफ खाणींत ९६१७ औंस आणि नंदीदुर्ग खाणींत ३८०३ औंस सोनें निघालें. गेल्या मे आणि जूनच्या उत्पन्नापेक्षां हें सोनें जास्त आहे.

तापी व्हॅली रेलवेच्या कामाच्या सुरवातीचें पहिलें ढिकूळ तारीख ३० नोवेंबर रोजीं गव्हर्नर जनरल साहेब आपल्या हातानें सुरत येथे फोडणार आहेत असें कळते.

पंजाबांतील ऱ्होटक आणि गर्जूनवाला जिल्ह्यांत महागाई अतानात झाल्यामुळें लोकांचे फार हाल होत आहेत.

जगावरील बोगदे—जगावरील एकंदर ११६८ आहे असा शोध लागतो व त्या सर्वांची लांबी ५१४ मैल आहे असें कळतें. वरील बोगद्यांपैकीं सुमारें १००० बोगदे रेलवे संबंधानें पाडलेले आहेत, १२ पाण्या खालून गेलेले, ९० कालव्यांच्या संबंधानें पाडलेले आणि ४० नळांचे केलेले आहेत. रेलवे कडील १००० बोगद्यांची लांबी ३५० मैल. पाण्या खालून गेलेल्या १२ बोगद्यांची लांबी ९ मैल, कालव्यांच्या संबंधानें पाडिलेल्या ९० बोगद्यांची लांबी ७० मैल आणि नळांनीं केलेल्या ४० बोगद्यांची लांबी ८९ मैल आहे.

दूध कसें घ्यावें—अर्धा शेर गाईच्या दुधांत पावशेर तापविलेले पाणी घालून दूध प्यालें असतां तें लवकर पचतें. दूध पचत नाहीं अशी ज्या कांहीं लोकांची तक्रार असते व त्यामुळें शक्तिवर्धक उत्तम पेय ज्यांनां वर्ज्य होतें त्यांनीं याचा अनुभव पहावा. शु० सू०

निजाम सरकारानें इंग्रज सरकारास गोदावरी नदीच्या दक्षिणेकडील भाग १८६० सालीं दिला नदी जवळ एक बेट आहे. त्याबद्दल आतां लढा पडला आहे.

चंदनः– म्हैसूरच्या राज्यांस चंदनाची रानें फार असून, गतवर्षीं ५८,००० टन् चंदन विकला गेला; व त्याची किंमत त्या संस्थानास ८ लाख रुपये मिळाली. म्हैसूरच्या राज्यास अशा अनेक उत्पन्नाच्या बाबी आहेत व त्यामुळें तें राज्य मोठें श्रीमान् बनलें आहे.

कलकत्यास एका दुकानदारानें एक मण तुपांत १२ शेर चर्बी, तेल, वगैरे मिसळून विकल्याची शाबिती झाल्यावरून त्यास ७५ रुपये दंड केला. याचप्रमाणें एका हलवायानें वाईट मिठाई विकल्याबद्दल त्यास ५ रुपये माजि० नीं दंड केला. न्या० सिं.

क्रीट बेटातला दंगा वळावतच चालला आहे. ग्रीसशीं सख्य करण्याबद्दल सूचना पुढारी बंडखोरांस नापसंत आहे. बंडखोराची समजूत घालून शांतता घालण्याकरतां टर्की सरकारानें आपल्या बड्या कामगारांस तिकडे पाठविलें आहे क्रीट प्रकरणावर चालून जाण्याचें इंग्लंडानें नाकारल्यमुळे जर्मन पत्रें इंग्रजांस दोष देत असून रशियन पत्रें इंग्रजांची स्तुती करीत आहेत आपल्या हद्दींतिली माणसें व हत्यारें क्रीट बेटांत न जावीं ह्मणून आमची सक्त खटपट आहे, पण त्या बेटांत झालेल्या तांड्या कत्तलीनें लोक अगदीं चवताळून गेले आहेत असा ग्रीस सरकारानें बड्या राजांस जबाब दिला. क्रीट प्रकरण हा दारूखाना झाला आहे. त्यांत हत्यार व दारूगोळा जाऊं देण्याची बंदी करणें रास्त आहे. त्या बेटाची राज्यव्यवस्था चांगली करण्याची हमी दिल्यावांचून सुलतानास मदत करणें अशक्य आहे असें इंग्रज प्रधानाचें ह्मणणें आहे.

गेल्या डिसेंबरांत कलकत्याहून एक आगबोट फाल मौथ येथें जाण्याकरितां गेली ती १३ मार्च रोजीं सेन्ट हेलिना येथें होती. पण त्यानंतर त्या आगबोटीची कांहींच माहिती मिळत नसल्यामुळें कलकत्याचे व्यापारी विचारांत पडले आहेत.

ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर असलेल्या ब्रह्मी लश्करी पोलिसाच्या एका पलटणीनें बंडखोरपणा चालविला असल्यामुळें तिला शासन करून शांत करण्यासाठीं लश्करी फौज धाडली आहे.

अफगाण सरहद्दीवर मिट्टई नांवाचा एक प्रांत असून तो हल्लीं अफगाणअमिराच्या कबजांत आहे आणि त्या या रक्षणार्थ हल्लीं अफगाण अमिराच्या कबजांत अमिराचे ४०० स्वार त्या प्रांतांत असून ते १,००० करण्याचा अफगाण अमिराच्या कमांडर इनचीफाचा इरादा आहे असें सांगून इंग्रज लोक ह्मणतात कीं, हा मिट्टई प्रांत डुरंड तहावरून इंग्रजी हद्दींत आलेला असतां त्याचा कबजा अमिरानें विश्वासघातानें घेतला असें ह्मणणें असेल तर फिर्याद कोणत्या कोर्टांत मांडणार?

मुंबईच्या एका बड्या खोजा व्यापाऱ्याचे दिवाळें निघालें व तो मक्केच्या यात्रेस ह्मणून गेला असून आतां त्याचा कांहीं पत्ता नाहीं असें सांगतात. त्याची सर्व मालमिळकत विकलेली असून त्यास १०।२० लाख रुपये कर्ज आहे व पुष्कळ धर्म खात्याच्या रकमा त्याच्याकडे असून कित्येक मुसलमानांच्या मोठाल्या ठेवीही आहेत असें सांगतात.

डच लोकांची दौली नांवाची एक आगबोट रायफल बंदुका व दारूगोळा भरून कराचीस जात असतां तिला एका इटालिअन आगबोटीनें कैद केलें आहे अशी लंडनची तार आली आहे! हा काय प्रकार आहे समजत नाहीं.

क्रीक बेटांतले हजारों ख्रिस्ती लोक त्या बेटांतून निघून ग्रीसच्या राज्यांत जात आहेत.

क्रीट बेटांतल्या ख्रिस्त्यांचा छळ करण्याचें काम मुसलमानलोक करीतच आहेत नुकतेच २५ ख्रिस्ती ठार केले, असें अथेन्सची बातमी सांगते.

ग्रीसचे ९ आफीसर व ४० इतर लोक हे छपून क्रीट बेटांत गेले आहेत.

गोंडळ संस्थानानें आपल्या शेजारच्या जामनगर संस्थानास नुकतेच २० लक्ष रुपये कर्जाऊ दिले. आमची संस्थानें आपापसांत अशी एकमेकांस मदत करूं लागतील तर फार चांगलें होईल.

काशी येथें एक पिठाची गिरणी निघाली आहे. हिची सर्व व्यवस्था हिंदु लोकांकड राहील.

अलीगड कॉलेजमधून ५० विद्यार्थी एंट्रन्स परीक्षेस गेले होते, त्यांपेकीं फक्त ५ तिसऱ्या वर्गांत पास झाले.

लाहोर येथें लालाबक्षीराम शास्त्री नांवाच्या इसमानें आपोआप हालणारा पंखा तयार केला आहे.

वायव्य प्रांताच्या कायदेकौंसलानें एक नवा कायदा पास करून जागोजाग आनररी मुनसिफ नेमिले आहेत. ह्याचें कारण असें आहे कीं, सध्या जीं सरकारी मुनसिफ कोर्टें आहेत, त्यांच्यानें सगळें काम फार शिल्लक राहिलें आहे. आणि सरकारी नवे मुनसिफ नेमावे तर खजिन्यांत पैशाची पंचाईत आहे. तेव्हां ही युक्ती ठीक आहे. पण ह्या न्यायाचा बोजा लोकांवर कां लादावा? आनररी माजिस्त्रेटांचीं कामें चालली आहेत, तशीं आनररी मुनसिफांचीं कामें चालतील. परंतु सरकारी कोर्टांच्या कामांत नेहमीं अंतर राहील. पाहिजे असल्यास सरकारानें इतर खर्च कमी करावयाचा होता पण अशा न्यायाच्या कामाची हेळसांड करावयाची नव्हती. न्या० सु०

जिल्हा रत्नागिरी ता० वेंगुर्लें यांतील फेळूस नांवाच्या खेड्यांत बांगलांची राई ह्मणून एक वाडी आहे तेथें दगडी बांधलेला एक मठ आहे. हा मठ चिदानंद स्वामींनीं बांधला असावा असें तेथील सांगासांगीच्या माहितीवरून समजतें. त्या मठांत दोन्ही बाजूंच्या भिंतीवर एक लांकडी तुळई आहे, तींतून प्रतिवार्षिक महाशिवरात्रीच्या दिवसापासून मुख्य पादुकांवर अभिषेक होण्यास सुरवात होते. असा प्रकार पाऊस लागे पर्यंत असतो. तुळईची दोन्हीं शेवटें कोरडीं असून मध्य भागांतून पांच सेकंदांच्या अंतरानें पाण्याचा एकेक थेंब पडतो. कांहीं दिवसांपूर्वीं जुनी तुळई कुजून पडली. नंतर तेथील लोकांनीं दुसरी तुळई त्याच जागीं टेविला. पूर्ववत् त्यांतून पाणी गळूं लागलें सदरहू मठास डोंगराचा कडा किंवा दुसरा संशय येण्यासारखा कोणताही पदार्थ लागलेला नाहीं. हल्लीं कित्येक आमचे सुधारक बंधु अमानुष चमत्कार निवळ खोटा मानितात, तरी त्यांनीं सदरहू प्रकाराबद्दल 'चक्षुर्वैसत्यं' या वाक्याप्रमाणें पाहिजे असल्यास अनुभव घेऊन आपला मार्ग सुधारावा. अशी माझी त्यांस सविनय सूचना आहे. शुष्क लांकडांतून आपोआप पाणी गळणें या गोष्टीस सृष्टजन्य कार्यकारणसंबंध असेल असें निदान माझ्या तरी बुद्धीस वाटत नाहीं. तो खरोखर ईश्वरी चमत्कार आहे, असें येथील कांहीं विद्वान मंडळींनें माझ्या प्रता प्रमाणेंच प्रत्यक्ष अनुभव घेऊन ठरविलें आहे. आ० व०

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .........०।०६
दुसरे खेपेस .........०।

Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy ................. ..... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY AUGUST 31 1896 — NO 34

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख ३१ माहे आगस्ट सन १८९६ इ० — अंक ३४

## जाहिरात.

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातांत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

---

### नोटीस

रा. रा. शिवलाल वल्लद ओंकार पटवी राहणार खामग व यांस नोटीस देणार सुंदराबाई जवजे त्रिंबकराव हलवाई राहणार खावगांव नोटिसीनें असें कळवितें कीं तुह्मी आमचे खामगाव येथील मालकीचे घरांत भाड्यानें राहात आहा. तुह्मी आजपावेतों भाड्याचे रुपयाबद्दल दस्ताऐवज करून दिला आहे व त्या शिवाय कांहीं भांडे तुह्माकडे येणें आहे. आजपावेतो बहुत वेळा दस्तऐवजाचे व राहिलेल्या भाड्याचे रुपये मागितले परंतु तुह्मी दिले नाहींत वगैरे कारणामुळें तुह्मास आमचें घर खाली करून द्या ह्मणून सांगितलें परंतु आजपावेतों भाड्याचे रुपये ही नाहींत व घरही खाली करून दिले नाहीं तरं याजकरितां मुद्दाम ह्या नोटिसीनें कळविले आहे कीं नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत तुह्माकडील आज तारखे पर्यंतचें भाडे देऊन व घर खाली करून देऊन पावती घ्यावी असें जाहले नाहीं तर रिती प्रमाणें काम चालवून घर ताब्यांत घेणें बद्दल व भाड्याचें रुपये वसूल करण्याबद्दल जो खर्च होईल तो व ह्या नोटीसीचा खर्च वगैरे जो नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिल्ही नोटीस सही ता. २९।८।९६ इसवी.

सही.

सहीची निशानी बांगडी सुंदरबाई
जवजे त्रिंबकराव हालवाई
राहाणार खामगांव तर्फे
मुखत्यार मारोती
टिकाराम दस्तूर
खुद्द.

### नोटीस.

रा० रा० लक्ष्मणपुरी गुरू गुलाबपुरी गोसावी राहणार आंजनी बुजरूक तालुके मेहेकर जिल्हा बुलडाणें. यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्माकडे फकीरजी वल्लद इसाजी पायवन राहणार आंजनी बुजरुक यांचें सरवई नंबर १४१-१४२ हें तुह्माकडे रकम रुपये सातसें सिके सुरतीस गाहाण आहेत त्यात फकीरजी पायवन याणें गाहाण खतात वसुल दिला आसेल त्यासह गाहाणाचा हिशेब आह्मास आपण दुलीचंद किरतमल मारवाडी दुकान आंजनी बुा. यांचें मार्फत समजवावा. कारण त्या सर्व जमिनीचें [ सरवे नंबर १४१-१४२ ] चें सर्व हक्क खेरेदी खतावरून आह्माकडेस आले आहेत. करितां मुद्दाम नोटीस देण्यांत आली आहे कीं आपण सर्व हिशोब दाखवून आमचे पासून रुपये दुलीचंद किरतमल यांचे मार्फत घेऊन पावती द्यावी. ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांमें आंत हिशोब दाखवावा. आह्मी आपणास अनेक वेळा हिशोबाबद्दल विचारलें परंतु आपण कांहीं बोलला नाहीं. आतां आपण फिर्याद केल्यास त्याचा खर्च व व्याज मिळणार नाहीं ही नोटीस पावल्या पासून चार दिवसाचे आंत उत्तर व हिशेब देणें कळावे. तारीख ७ माहे आगष्ट सन १८९६ इ०

सही.

विठ्ठल बाजीराव कुळकर्णी मौजे
आंजनीबुजरुक तालुके मेहेकर
जिल्हे बुलडाणें दस्तुर
खुद्द.

---

## प्रवासांतील एक प्रसंग

( सुटला पितृदिशेचा वारा । या चालीवर )

गेली फोडुन आभाळाला । शिखरें थोर, अशी गिरिमाला । वेढा घाली आठ दिशांला, । आंत रथ अमुचा । कर्णिकेंत फिरतो । वृंद जसा भृगांचा. १

होता चैत्रमास उन्हाळा, । गात्रें तापविती त्या ज्वाळा, । वारा प्रचंड त्या मधिं सुटला, । कोप सूर्याचा । खवळला कराया ग्रास जणो भुवनांचा. २.

डोंगर दिसती भगवे सारे, । वरती तृण झाडांनच थारे । गुळगुळीत त्यांचीं शिखरें । पाहून, साचा । वाटला उभा हा । गण जणुं संन्याशांचा ! ३

तुटले कडे गिरीचे बहुत, । खालीं बघतां चक्कर येत, ! खोरे दऱ्या लागल्या अमित, । मुखें पसरूनि । धांवल्या राक्षसी । जणुं खाया चहुंकडुनी. ४.

जंगल वाटे घोर भयाण, । झाडें दिसतीं पर्णविहीन, । खालीं पानांचें घन रान, उघड्या देहा । झांकण्या मेदिनी । पर्णपटा आढी ह्या. ५.

गळलीं पानें आभाळांत । फिरती, लाखों एक पळांत, । कोंदुन गेली धूळ दिशांत, । वन मुग्धेचा । त्या स्थळांत चाले । धिंगाण ह्या परिचा. ६.

बिकट हा विकट घाट खंडाळा, । इंजन मागें पुढें गाडीला, । मार्गीं पहा वेगदा आला, । त्या मधिं शिरली । फोंफावत, नागण । बिळीं जशी रागेली. ७.

गाडी अमुची सोंसाट्यानें । भरभर टाकुन गिरिवर रानें । जातां, पळती तरु वेगानें, । भास वस्तूंचा । विपरीत होउनी, । घोळ उडे चित्ताचा ! ८.

लागली एक नदी वाटेनें, । प्रथमांचे माहेर सोडून जाणें । ह्मणुनी, खळखळ चाले रडणें, । शहाणी होतां । गंभीर तीच हो । पतिस मिळाया जाता. ९.

अगीनगाडी घाली शोळ, । आलें सुरम्य दूजें स्थळ, । गाडी झाली मग निश्चळ । माथ्यावरती, । कैलास दुजे तें । अवतरलें भूवरती. १०

२

होती एक उभी नव रमणी, । ही कां उमा शंभुची राणी । शोधी बालरूप हें धरूनी । हर रुसलेला, । वा वनदेवी ही । काय वाटलें मजला ! १.

साजुक नाजुक कवळी बाला । हिणवी केळीच्या गाभ्याला, । अंगी नवतीचा जिव्हाळा, । लोट देहाचा । कोरिला चातुरें । पुतळा जणुं पाचेचा ! २.

लावण्याची बहु नवलाई, । सोज्वळ कांति तनूच्या ठाई, । अभिनव शांति मनाला देई, । खिळली दृष्टी, । ही काय विधीनें । अपूर्व घडली सृष्टी! ३.

काळा भोर कंचांचा भार । रुळतो पाठीवरती स्वैर, । कांहीं उडती वारंवार । मुखाच्या वरती, । निर्लज्ज कितीहे । पहा विटासम गमती ! ४

गोंडस वदन घाट बहु सुबक, ! न पुरें नयनांचें कौतुक, । विशाळ भाळीं कुंकम तिलक. । जणुं गगनांत । चमचमाट चमके मंगळ तेजोवंत ! ५.

चोळी भिंगांची सोज्वळ, । पातळ कटीस ल्याली धवळ, । उडवी पदर वायु चंचळ, । ये दृष्टीला । तो अर्धोन्मीलित । वक्ष भाग रंगेला ! ६.

वेली प्रथमचि बारें फुलली, । अथवा फळें पिकाया आलीं, । मुलगी मजही दिसली तसली, । कळी कुमुदाची, । तो धन्य ह्मणावा । सत्ता इजवर ज्याची । ७

वर्षें असतील तेरा चवदा, । सारा पोरपणाचा सवदा! । यौवन वेलीच्या रे गेंदा! । किती तूं गोड । तुज बघतां लागे । तुझें जनाला वेड! ८.

विशाळ डोळे झाले लाल, । लालेलाल दोन्ही गाल, । झालें नासिकाग्रही लाल, । गात्रें गळलीं, । ही कनकवेलकां । कोमेजून हो गेली ? ९.

प्रथमचि पति सदनाला जाते । सोडुन ताताच्या गोतातें । जननी जनक तिच्या सांगातें, । पोचवायाला । या स्थळीं पातले । अपुल्या ते कन्येला. १०

मार्गीं नदी भेटली होती, । झालें स्मरण तिचें मज चित्तीं, । खळखळ रडते मृगनयना ती । सुंदर भारी । भासते निसर्गासम रमणी कृति सारी ! ११

माता वियोग कष्टद होई, । न उरे नूर तनूच्या ठाईं, । थर थर कंप वल्लिला येई,। तशी ही झाली । बा प्रेमा, तव गति अतर्क्य न कुणा कळली ! १२

गडणी बरोबरीच्या कथिती । पति सौख्याची कोण परी ती, । भावी सुख तें दृष्टी पुढती । येतां झालें । अति प्रसन्न मुख तें । पद्म जसें फुललेलें. १३

पळभर हर्ष, पळांत विशाद, । पळभर कौतुक, पळभर खेद, । जडता चंचलता हे भेद । होती शतदां । किती रम्य भासली विविधपणें ही प्रमदा १४

ये ये इकडे गं वेल्हाळे! । बस तूं डब्यांत अमुच्या बाळे, । देतों स्थळ तुजला मी अपुलें, । लौकर येगे, । अग, सुटेल अपुली गाडी आतां वेगें १५

तुजसम मनोभिरामा रामा । कोठुन मिळेल बघण्या आह्मा, । तुजला पाहून दाटे प्रेमा, । वसे चित्तांत । सहवास घडावा तुझा उभय लोकांत. १६,

असतीस जर माझी तूं भगिनी, । निशिदिनीं पडतीस माझ्या नयनीं, । सगळें कोड तुझें पुरवूनी, । मीं जन्माचें । साफल्य मानिलें असतें बाई साचें १७.

अपला भाऊ तूं मज मान, । चित्तीं धरूं नको अनुमान, । टकमक बघती तुज दुर्जन, । होईल दृष्ट, । ह्या जगांत असती पुरुष सर्वही नष्ट १८.

अनुभव नाहीं काहीं तुजला, । अंगीं हूडपणा वर भरला, । सीमा नाहीं लावण्याला, । अशी तूं रमणी । पाहून लागतिल । लोक वियोगें झुरणी; १९.

वदतिल गोड गोड बोलाला, । झेलुन घेतिल तव शद्बांला, । नाना उपाय करूनी, तुजला. । बुडवायाला हें पाहतील जन । खचित सांगतों तुजला. २०.

सावधपणें वाग या करितां । सलगी कोणाचीहि नें धरितां, । अनन्य पतिठाई तूं होतां सन्मार्गांत । रक्षील तुला तो । कनवाळू भगवंत २१.

BEE.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ८ शके १८१८

कायदे कौंसिलाचा कायदा सुधारल्यापासून लोकमताचे प्रतिनिधी व्हाइसराय साहेबांच्या व प्रांतिक सरकारच्या कायदेकौंसिलांतून कौंसिलदार ह्मणून चमकूं लागले आणि या बिन-सरकारी कौंसिलदारांनीं आपल्या कर्तबगारीनें, वाक्चातुर्यानें, व विचारसरणीनें सरकारी कौंसिलदारांचीं मनें चांगलीं वश करून घेतलीं इतकेंच नाहीं तर लोकमताची मातबरी वारंवार सरकारच्या नजरेस आणून दिली. प्रथमारंभीं हेवा, मत्सर सरकारी कौंसिलदारांचा तुसटपणा इत्यादि गोष्टींनीं लोकप्रतिनिधींचा मोठा छळ झाला, त्यांच्या प्रश्नास नीट व सरळ उत्तरें मिळत नव्हतीं व त्यांच्या सदुपदेशाचा देखील पुष्कळदा अव्हेर होत असे. पण अलिकडे हे क्षुद्र विचार लयास जात चालले आंहत आणि लोकप्रतिनिधींची अवहेलना करून कांहीं कार्यभाग साध्य होत नाहीं अशी सरकारी कौंसिलदारांची खात्री होत चालली आहे ही मोठ्या आनंदाची व भावी कल्याणाची गोष्ट होय.

‘न हि कस्तूरिकामोदः शपथेन विभाव्यते’ या लौकिकी उक्ती प्रमाणें गुणिजनांचे गुण आपोआप आपली श्रेष्ठता स्थापित करितात आणि तेच अभिनंदनीय प्रकार कायदे-कौंसिलांतील लोकप्रतिनिधी संबंधानें दृष्टीस पडत आहे. मुंबईच्या कायदे-कौंसिलांत वार्षिक बजेट विचारासाठीं पुढें मांडण्यांत आलें तेव्हां नामदार मेथा, याज्ञिक सेटलवाड, धर्मसी इत्यादि नामांकित कौंसिलदारांनीं बजेटावर मोठ्या मर्यादशीलतेनें चर्चा केली ती ऐकून प्रतिपक्षीय सरकारी कौंसिदारांनीं आपला आनंद प्रदर्शित केला. या भवति नें भवतींत अनेक लोकोपयोगी विषयांचा विचार फार खोल उदात्त रितीनें झाला आणि सरकारांस लोकांच्या गरजा मोठ्या मुत्सदीपणानें कळविण्यांत आल्या. शिक्षणखात्याचा खर्च, न्याय खात्यांत सुधारणा, शेतकरी लोकांची अनिष्ट स्थिती, इत्यादि अनेक गोष्टी संबधानें स्पष्टपणें उल्लेख झाला. खुद्द गव्हरनर साहेब लार्ड सांडहर्स्ट यांनीं बोलून दाखविलें कीं मला २७।२८ वर्षांचा कायदे कौंसिलांतला व लार्ड सभेंतला अनुभव आहे आणि सध्यांच्या बजेटावर जीं संभाषणें ऐकिलीं तीं फार विचारपूर्वक तयार केलीं असून त्यांत इत्थंभूत सारगोष्टींचें कथन सौजन्यानें, वादकौशल्यानें व कुशाग्र बुद्धीनें केलें आहे आणि जगांतील कोणत्याही सुधारलेल्या कायदे कौंसिलांतून या संभाषणापेक्षां विशेष सन्माननीय संभाषणें क्वचितच आढळतील. हा शेरा फार आल्हाद कारक होय आणि हा ज्या नरश्रेष्ठांच्या सग्दुणांनीं प्राप्त झाला त्यांचे आह्मी मोठ्या प्रेमानें धन्यवाद गातों.

---

डेहराडून येथें एक फारेस्ट-स्कूल आहे. या शाळेंत जंगल खात्यास आवश्यक असे विविध विषय शिकविले जातात आणि या शाळेंतील अभ्यासक्रम पुरा करून जे विद्यार्थी अखेरची परीक्षा देतील त्यांस हिंदुस्थानांतील फोरेस्ट खात्यांतल्या मोठमोठ्या जागा देण्यांत याव्या असा शाळेच्या स्थापनेच्या वेळींच संकेत ठरला आहे एकंदर १८९४–९५ सालीं ९८ विद्यार्थी या शाळेंत होते त्यापैकीं ६२ विद्यार्थ्यांस सरकारी पगार किंवा नोकरी होती, ४ नेटीव संस्थानिकांनीं धाडले होते, ३२ विद्यार्थी खानगी होते. ५० रुपये पगाराचे विद्यार्थी कांहीं आहेत त्यांत नेटिव असे फार विरळा आढळतात.

वऱ्हाडांत जंगल खातें मोठें आहे तथापि स्थानिक सरकारानें डेहराडून येथें कांहीं हुशार विद्यार्थी शिकण्यासाठीं धाडण्याचा विचार केला नाहीं हीं गोष्ट आमच्या प्रांताला अकल्याणकारक आहे. वऱ्हाडाला डेहराडूनच्या शाळेची मोठी जरूरी आहे तथापि स्थानिक सरकारनें उत्तेजन दिल्या शिवाय या बाबींकडे लोकांचें चित्त लागणार नाहीं. शाळाखात्याचे डायरेक्टर या संबंधानें वरिष्ठ, सरकारास जागृती आणून कांहीं व्यवस्था अमलांत आणतील अशी आह्मास आशा आहे. डेहराडूनचा प्रवास लांबचा असून पंजाबांतील चाली रिती निराळ्या आहेत तथापि योग्य सवलती व अभिवचनें मिळालीं तर धारिष्टवान विद्यार्थी फोरेस्ट शाखेचे विषय चांगले शिकतील हें उघड आहे. सध्यां या शाळेची स्थिती विशेष समाधानकारक नाहीं. तरी फोरेस्ट खात्याच्या विस्ताराच्या मानानें तेथील अभ्यासक्रमाला चांगलें महत्त्व लवकरच येईल. नुसता मार्गदर्शकपणा या प्रकरणीं रावसाहेब पटवर्धन यांनीं स्वीकारला तरी पुष्कळ हित होईल.

---

नेटिव वर्तमानपत्रकर्त्यांची एक सभा असावी अशा विषयीं मद्रासच्या स्टांडर्ड पत्रकर्त्यांनीं मोठ्या कळकळीनें सूचना केली आहे. अलिकडील सरकारी अधिकाऱ्यांचा रोंख नेटिव पत्रकर्त्यांचा हक्क व वजन कमी करण्याकडे विशेष आहे. स्टेट सेक्रेटरी लार्ड हामिलटन असें एकदा ह्मणाले कीं ब्रिटिश राज्यव्यवस्थेवर नेटिव पत्रें कडक टीका करितात हें मोटे धोक्याचें आहे. नेटिव वर्तमान पत्रांवर एखादी गदा आणावी असाच या बिधानाचा उद्देश आहे असें आमचें ह्मणणें नाहीं परंतु पत्रकर्त्यांचे अधिकार व विचारस्वातंत्र्य हीं उत्तरोत्तर विकास पावण्याच्या ठिकाणी अशा विरोधी लोकांनीं मर्यादित केलीं तर अत्यंत नुकसान होईल. या शिवाय कांहीं आंग्लो इंडियन पायोनिअर सारखीं पत्रें हवे तसे दोष काढतात; प्राकृत शिव्यांची देणगी देतात व नेटिवांचीं मतें खोटीनाटीं दर्शवितात. या गोष्टीचा प्रतिकार वेळच्यावेळीं केला पाहिजे आणि नेटिव वर्तमानपत्राचा उत्कर्ष झाला पाहिजे इतक्या करितां एक सभा स्थापणें जरूर आहे. आह्मास ही सूचना अगदीं पसंत आहे. जेव्हां दिल्लीला १८७५ सालीं दरबार भरला होता त्यावेळीं प्रथम नेटिव पत्रकर्त्यांची एक सभा स्थापण्यांत यावी अशा विषयीं कांहीं विचार चालला आणि मध्यंतरींही या प्रकरणीं चळवळ बरीच झाली होती पण अद्याप हा प्रश्न निकालास लागला नाहीं. मद्रास स्टांडर्ड कर्ते ह्मणतात कीं वर्तमान पत्रकर्त्यांच्या सभेनें नेटिव पत्रांस जोर व वीरश्री येईल व त्यांचा लौकिक वाढेल; परस्परांमध्यें सलोख्याचें व निकटपणाचें दळणवळण सुरूं होईल, वर्तमानपत्रांचें ऐक्य वाढेल आणि कोणी या धंद्याच्या नियमा विरुद्ध वर्तन करील तर त्याला या सभेची दहशत बसेल; आणि वर्तमानपत्रांची स्थिती क्रमाक्रमानें सुधारत जाईल. या सभेचें काप कागदोपत्रींच बहुतेक चालेल तथापि राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या वेळीं पुष्कळ पत्रकर्ते जमतात तेव्हां त्याच समयास सालिना एक निराळी बैठक भरावी व वर्तमानपत्रा संबंधानें मुख्य गोष्टींचा विचार करण्यांत यावा. सूचना चांगली आहे आणि कलकत्यास या सूचनेचा योग्य निकाल होईल अशी आह्मास आशा आहे.

---

महाराष्ट्रांत यंदा कापसाचा हंगाम चांगला येणार नाहीं असा रंग दिसतो. खानदेश, नाशिक वगैरे कडील भागांत आरंभीं पाऊस न पडल्यामुळें पिकें कमजोर झालीं मागाहून पाऊस अतिशय झाल्यामुळें कापसाचें पीक बुडाल्या प्रमाणें झालें आहे. मद्रासेकडे कपाशीची पेरणी निम्यानें कमी झाली आहे. मध्यप्रांतांत कापसाचें पीक मध्यम आहे. वऱ्हाडांत गुदस्ता कपाशीचें पीक फार उत्तम आलें होतें पण यंदा त्या मानानें फार कमी येईल हें उघड आहे. सध्यां वऱ्हाडांत पीकपाणी बरें आहे.

---

व्यापारांत दलालीचे धंदे फार चालतात. कंत्राटदारांचीं कामें ही दलाली दिल्या घेतल्यानें चांगलीं निभत असतात. एका मनुष्यासाठीं दुसऱ्याला कांहीं व्यवहार करण्याचा अधिकार पोचला ह्मणजे व्यवहारांत त्या दुसऱ्या मनुष्या जवळ दलालीच्या गोष्टी नाना तऱ्हेनें निघत असतात. उदाहणार्थ कांहीं सामान किंवा चिजवस्तु खरेदी करण्याचा एका अला अधिकार असला ह्मणजे त्या सामानाचे व्यापारी अ कडे जाऊन जो तो आपला माल विकूं इच्छितो. अला ब साठीं खरेदी करावयाची असते तेव्हां ब चें काम करून अ ला कांहीं किफायत दलालीच्या द्वारानें होण्याचा संभव असतो. प्रामाणिकपणा सारखें मनुष्यास भूषण नाहीं तथापि नक्कली प्रामाणिकपणाचें बंड फार माजलें आहे आणि तें इतकें कीं वर प्रकारची दलाली घेणें हें पाप आहे असें कित्येकांस वाटत देखील नाहीं. जो कोणी दुसऱ्यासाठीं काम करितो त्यानें आपला मेहताना त्याच्या कडून ठरवून घ्यावा पण एकदा दुसऱ्याचें काम पतकरलें ह्मणजे नंतर आपल्या धन्याचेंच हित सर्वत्र पाहिलें पाहिजे. हा बुद्धिवाद चांगला आहे पण हा नियम गुप्तपणें मोडण्यांतच याचा सन्मान होत असतो. जरा सूक्ष्म विचारानें पाहिलें तर आपणास आढळून येईल कीं एक वेळ दुसऱ्याची कामगिरी पतकरली ह्मणजे केवळ ईश्वराला साक्षीस ठेऊन व स्वताचा लाभालाभ विसरून कामगिरी बजावणारे लोक विरळा दृष्टीस पडतात. रिश्वतीच्या किंवा लांचलुचपतीच्या देवघवी सर्वत्र दुनियेंत चालतात, गुप्त गोष्टी उजेडांत आल्या तर दुसऱ्याचें हाल होतें पण ह्मणण्या सारखी तिऱ्हाइतवाल्यांची सुधारणा होत नाहीं. दलालीचा प्रकार तरी लांचलुचपतीचा खरा पण त्याला कोणी विशेष नांव ठेवीत नाहीं. दलालीला चिरीमिरी पानसुपारी, फूल नाहीं फुलाची पाकळी, किंवा तुळशीपत्र इत्यादि नामाभिधानें ठेवून दलाली लोक देत घेत असतात. ज्याचा फायदा होतो तो कृतज्ञतेनें प्रत्यक्ष व निकटच्या हितकर्त्यास आपली सेवा ह्मणून कांहीं दक्षिणा अर्पण करितो आणि जो अन्यथा फायदा करून देतो तो आपल्या अमंगळ कामगिरी बद्दल कांहीं बक्षीस दुहेरी उपटतो. त्याच्या मालका कडून त्याला मेहनताना मिळतो आणि उपकृत लोकांकडून कृतज्ञनेचा नजराणा मिळतो. हा नजराणा कोणी घेऊं नये कां कीं तो दोषार्ह आहे, आणि त्यांत धनिवंचन आहे. असली दलाली गुन्ह्याच्या स्वरूपाची आहे आणि तिनें सर्व व्यापारधद्याला कलंक लागला आहे असें इंग्लंडचे चिफ जस्टिस लार्ड रसेल यांनीं एका खटल्यांत बोलून दाखविलें. राष्ट्रीय नीती कुंठण्यास किंवा प्रामाणिकपणा नकली होण्यास कारण सर्वत्र प्ररूढ असलेली दलाली होय. परवंचन करूं नये अशी परमेश्वराची आज्ञा पण नित्यशः लोक असली अप्रामाणिकपणाची दलाली देत घेत असतात. कधीं कधीं खरोखर सढळपणा किंवा परोपकार गाची झांक खोट्या दलालीच्या धंद्यांत असते पण तिचा संबंध दोषाशी किंवा दुर्गुणाशी अगदी निकटचा असतो ह्मणून लोकांनीं प्रामाणिकपणा खरोखर ठेवावा असें आह्मी इच्छितों.

---

अपकारी खात्याचा सन १८९५–९६ सालाचा रिपोर्ट आह्माकडे आला त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करून विशेष उपयुक्त माहिती खालीं देत आहों. एकंदर वार्षिक उत्पन्न रुपये १४,७६,३९३-८-० पै झालें या पैकीं इंदुरास अफूचा पास देतेवेळीं वऱ्हाडासाठीं जो महसूल घेतला त्याची रक्कम १,६८,७०० रुपये आहे. एकंदर खर्च रुपये २२,३७३-१९-३ पै लागली आहे इंदूरच्या महसूलाची रक्कम वेगळली तर गुदस्ता पेक्षां यंदा शेंकडा ९ प्रमाणानें ह्मणजे रुपये १,३६,३२२-१-९ पें इतकें उत्पन्न कमी झालें णाहे.

---

## वऱ्हाड

हवामान–या आठवड्यांत थोडा पाऊस पडला. सध्यां उघाडी आहे पण हवा पुन्हां बिघडूं लागली आहे. एकंदर पाऊस २६ इंचा जवळ झाला. रोगराई साधारणच आहे. आश्लेषाचा पाऊस पडल्यामुळें पि-

कास लागणारे किडे व जंतू यांचा आपो आप नाश होईल. पिकें साधारणपणें बरीं आहेत.

---

रा० रा० सदाशिव विष्णु भागवत हे यवतमाळाहून आकोल्यास आले होते. त्यांचे व्याख्यान गेल्या मंगळवारीं येथील लायब्ररींत झालें विषय 'वक्तृत्व' हा होता. राजश्री सदाशिवराव चांगले वक्ते आहेत आणि त्यांच्या भाषणांत गोडी विशेष असते. त्यांच्या साधारण बोलण्यांत देखील मंडळी पोट धरधरून हांसतील अशी योजना असते.

---

मि० ऑर्देसर दिनसाजी सेक्रेटरी, लेडी डफरीन फंड, वऱ्हाड शाखा, यांनीं गेल्या ९ आगष्ट तारखेस भरलेल्या जनरल सभेची हकीकत आह्माकडे धाडली आहे त्यावरून कळतें कीं मध्यंतरी शाखेनें कांहीं सुईणींच्या शिक्षण खर्चाबद्दल फंड मागितला होता पण ती मागणी अमान्य केली; १२०० रुपयांचा वार्षिक देणगी स्त्रियांच्या दवाखान्या प्रीत्यर्थ मान्य केली, रा. रा. जगन्नाथ बापूजी यांस इमारतीच्या उभारणीच्या देखरेखी बद्दल २०० रुपये बक्षीस दिले इत्यादि.

---

प्रोफेसर उमराखान जादूगार यांनीं आपले अद्भुत चमत्काराचे खेळ करून दाखविले. एकंदरीनें खेळ फार चांगला झाला.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस नारायणदास दयाराम साहू मारवाडी रहाणार लालपाडी तालुके निफाड जिल्हा नाशीक हे असे जाहीर करितात कीं मौजे हाते तालुके बाळापूर जिल्हे अकोले येथें आमची सावकारी, कपाशीची, धान्याची वगैरे दुकान मौजे हाते येथें आहे. त्या दुकानावर आज पावेतों आह्मी नथमल बुधाराम मारवाडी यांस मुक्त्यार गुमास्ता नेमला होता परंतु कामा धामा मुळें आह्मी त्यास मुक्त्यार गुमास्ते पणाचे कामावरून दूर केलें आहे. तर आमच्या बद्दल अगर आमच्या मौजे हाते येथील दुकाना संबंधी कोणत्याही प्रकारचा व्यवहार आमच्या संमती शिवाय सदर्हू गुमास्ते नामे नथमल बुधाराम याज बरोबर कोणीही करूं नये. केल्यास त्याजबद्दलचे जबाबदार आह्मी व मौजे हाते येथील दुकान वगैरे कोणत्याही प्रकारानें नाहीं. ज्याचा तो आहे ह्मणून दिली जाहिरात सही तारीख २९ आगष्ट सन १८९६ इसवी.

सही

नारायणदास दयाराम साहू मारवाडी रहाणार लालपाडी ता. निफाड जि. नाशीक दस्तुर निशाणी जितमल नारायणदास मारवाडी दस्तुर खुद्द.

---

नोटीस

रा० रा० नथमल बुधाराम मारवाडी रहाणार मौजे निंबे तालुके बाळापूर- यांस नोटीस देणार नारायणदास दयाराम दुकान लालपाडी तालुके निफाड जि० नाशीक. नोटिशीनें असें कळवितात कीं तुह्मांस आह्मी आमचे मौजे हाते येथील सावकारी, कपाशी व गल्ला वगैरेच्या दुकानावर मुक्त्यार गुमास्ते नेमिलें होते. व आज तुह्मांस आह्मी कामावरून दूर केलें आहे. तुह्मास ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत आमचे सर्व सरकारी संबंधांनें व दुकान संबंधाचे इतर जे कांहीं असेल ते आज तारखेपर्यंत रीतवार सर्व कागदपत्र व हिशेब समजून घ्यावे. असे झाले नहीं तर मजला योग्य तजवीज करणें भाग पडेल व जे जे माझे नुकसान वगैरे तुमच्या गैर व्यवहारानें होईल ते सर्व प्रत्येक रीतशीर भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख २९ आगष्ट सन १८९६ इ०

सही

नारायणदास दयाराम मारवाडी रहाणार लालपाडी तां० निफाड जि० नाशीक दस्तुर जितमल नारायणदास.

---

नमुना (जी)

पं. नादारी मुकदमा नंबर १२ सन १८९६

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोला

सर्व धनको यांस:—

नोटीस देण्यांत येते कीं साहेबराव रोडबा देशमुख रहाणार खैसपूर हा नादारी आहे असा आज तारीख २१ माहे आगष्ट सन सन १८९६ इ० रोजीं ठराव झाला आहे आणि १२ माहे सप्टेंबर सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावें रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख २४ माहे आगष्ट सन १८९६ इसवी.

| नंबर | धनको | रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्रावण वल्द माहादाजी राऊत या नांवची दुकान मालक पुत्र दत्ताजी श्रावण राहाणार खैसपूर. | ६७९ ,, |
| २ | रावजी वल्द रामजी माळी वस्ती मौजे चेंडकापूर तालुके अकोट. | २०० ,, |
| ३ | रायबहादूर मुकुंद बाळकृष्ण बुटी संस्थान सितावर्डी [जमानती बद्दल] दुकान अकोलें | १६० ,, |
| ४ | रामचंद्र अमृतराव बुटी दुकान अकोलें | १०० ,, |

एकूण १०३९-०-०

V. N. Dandekar.
Judge
Bankruptcy Court
Akola District.

---

नमुना नंबर (जी)

दि० मु० नं० २६० सन १८९४

द० र० नं० २४७ सन १८९६

नादारी क्रा. ७ मुकदमा नं० ५ सन १८९६

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोलें

सर्व धनको:—यांस नोटीस देण्यांत येते कीं, भगवान वल्द लक्ष्मण पा. काळे हा नादारी आहे असा आज ता० २५ माहे ८ सन १८९६ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १२ माहे ९ सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिसियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. २७।८।९६ इ०

| नंबर | धनको | रुपये |
|---|---|---|
| १ | सिलिमखा दाउदखा सौदागर वस्ती ताजनापेठ आकोलें. | १५० |
| २ | सिदाजी वल्द उदाजी पाटील राहणार सोमठाणा. | २५ |
| ३ | घासीराम मारवाडी राहणार अक्कलकोट अकोले. | १६ |
| ४ | बाळकृष्ण रामचंद्र तिमसे राहणार अकोले. | ६० |
| ५ | मुकुंदलाल नन्हामल मैत वारीस बायको चुनाबाई जवजे नन्हामल | ४० |
| ६ | गोसखा वल्द माहीत नाहीं राहणार अकोले | ४० |
| ७ | गणपत प्रल्हाद मुनसी राहणार अकोले. | २५ |

एकूण रुपये ३९६

V. N. Dandekar
Judge
Insolvency Court
Akola

---

सन १८८१ चा अक्ट नंबर ५ प्रमाणें

दि० कि० मुा. नंबर १ वर्ग १९

---

९६

प्रोबेट सरटीफिकीट मिळणें विषयीं अर्ज केल्याबद्दल जाहिरनामा.

दिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव बापाचें, नाव राहण्याचे ठिकाण वगैरे.

१. हनवंतराव सोनाजी देशमुख राहणार सीवरबुा. २ विठोबा वल्द दर्याजी देशमुख, ३ बालाजी वा. यादोजी देशमुख, ४ धनसिंग वल्द येसाजी देशमुख, ५ चाहुजी वा. महेमाजी देशमुख, ६ धनसींग वल्द रामाजी कोरडे, व ७ सखाराम वल्द जैराम सयतवाड राहणार सर्व सिवरखुर्द. ८ व सोनाजी वल्द गोंदाजी सयतवाड राहाणार मौजे सिवर बुा. तो. दर्यापूर जिल्हे एलिचपूर. यांस.

मैतें सुंदरसा वल्द गंगासा लाड राहणार मौजे सिवर खुर्द तालुके दर्यापूर जिल्हे एलिचपूर याचे जिनगीचे मृत्युपत्रा प्रमाणें प्रोबेट आकटा प्रमाणें सरटीफिकीट मिळावें ह्मणून अर्जदारानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरील मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २३ माहे सप्टेंबर १८९६ इसवी रोजी सदर्हू अर्जाची चवकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हाजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. कळावे, तारीख २४ माहे अगष्ट १८९६ इ.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur.

---

## वर्तमानसार.

सट्टा करणारा चेटी.

बंगलोर येथें एक मोठा दावा चालला आहे. त्याला म्हैसूरचा वारशाचा दावा असें ह्मणतात. ह्या दाव्यांत एका वारसदारानें साक्ष देतांना एक विलक्षण गोष्ट सांगितली ती अशी:--तो ह्मणाला मला हा दावा चालविण्या करितां पैशाची जरूर लागली तेव्हां शोध करितांना नाटकोटाई चेटी नांवाचा सावकार आढळला. त्याणें पैसे देतो ह्मणून कबूल करून त्याप्रमाणें त्यानें मला २०,००० रुपये दिले व मी त्यास १ लाख रुपयांचा दस्तऐवज लिहून दिला. त्यांत अशी शर्त होती कीं, जर हा पांच लाखाचा दावा मी जिंकिला; तर तुला दस्तऐवजाची सर्व रकम ह्मणजे एक लाख रुपये देईन, नाहीं तर कवडी सुद्धां मिळावयाची नाहीं. कोण धाडस हें! अशा प्रकारच्या सट्ट्यांत मिळाले तर चेटीस एक लाख रुपये मिळावयाचे, नाहीं तर २०,००० जावयाचे ! याचें नांव सट्टा! श्री. स. वि.

मि० ग्रयांडी ह्यांस हिंदुस्थानांतील खाणींचे कायमचे इन्स्पेक्टर नेमिलें. आतां खाणीच्या कामांत हे काय कमजास्त करणार पहावें.

दार्जिलिंग येथील सेंट अंड्र्यूचें देऊळ वाढविण्यासाठीं बंगाल सरकारानें २५००० रुपये खर्च करण्याची मंजूरी दिली.

ब्रह्मदेश एक वेगळा इलाखा करून ह्यावर लेफ० गव्हर्नर नेमावा आणि त्याला कायदे कौन्सिल द्यावें अशी व्यवस्था पुढल्या साला पासून होणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे.

ग्रेटब्रिटनचा अपूर्व कावा.— हिंदुस्थानच्या फौजेस १७५००० पौंड खर्च स्वाकीनकडे लागावयाचा आहे पैकीं १४०००० पौंड ग्रेटब्रिटन हिंदुस्थानास देणार पण ते मिसर देशाकडून परत घेणार. ३५००० पौंड हिंदुस्थानचे खर्च होणार ते मात्र त्यास परत मिळावयाचे नाहींत असें ठरलें आहे!

सन १९०० सालीं पारिस येथें जग प्रदर्शन व्हावयाचें आहे तें पाहण्यास आपण येऊं असें जर्मन बादशहानें कळविलें आहे. हें समेटीचें चिन्ह होय.

गोदावरी नदीस महापूर येऊन राजमेहेंद्री जिल्ह्यांत कित्येक गांवें पाण्यांत डुबत आहेत.

४० हजारांचें जवाहीर चोरीस गेलें— निजामच्या राज्यापैकीं जटपरोलचे राजे हे राणीगंज स्टेशनाहून गुंटकल येथें जात असतां वाटेंत डब्यांत त्यांच्या जवळ असलेल्या पेटींतून ४०००० रुपये किमतीचें जवाहीर चोरीस गेलें. जेव्हां ते गुंटकल येथें उतरले तेव्हां त्यास ही चोरी झालेली समजली. पोलिस तपास सुरू आहे.

बेळगांवाकडे पावसानें कहर केल्यामुळें भाताचीं पिकें हातीं लागणें फार मुष्कील झालें आहे.

भरतपूर शहरास नुसत्या मातीचा परंतु असा रुंद आणि मजबूत परकोट आहे कीं त्यावर इंग्रजांच्या तोफांचाही उपाय चालला नाहीं ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. हल्लीं तो परकोट पाडून टाकण्याची मजूरी इंग्लिश सरकारानें दिली आहे असें ऐकतों.

मद्रास इलाख्यांत काफीचें उत्पन्न चांगलें होतें ह्मणून इंग्लडांतून दोनशे युरोपियन लोक मद्रासेस येऊन दाखल झाले आहेत व काफीची लागवड करण्याचा त्यांचा उद्देश आहे. शु. सू.

कालांतराचा फरक:— पूर्वी गांव असें ह्मणण्यास "धनिकःश्रोतृयो राजा नद्दी वैद्यस्तु पंचमः" हीं पांच लक्षणें तेथें असावीं लागत असत; परंतु आतां या काळांत तद्वावीं दुसरीं पांच लक्षणें व्हावीं लागतात; तीं नसलीं तर त्याला गांव ह्मणणें कठीण वाटूं लागलें आहे ! तीं ग्रमलक्षणें कोणतीं तर "कन्याशाला, दवाखाना तृतीय म्युन्सिपालिटी ॥ ग्रंथालयं सुरागेहमित्येतत्ग्रामलक्षणं" क० आ०

कलकत्यास कोणी चतरजी नांवाच्या गृहस्थानें आपल्या पत्नीस इंग्रजी शिकविण्याकरितां मिस लिन्टन नांवची एक मडम दरमहा ८ आणे देऊन ठेविली होती. ही मडम झनाना मिशनपैकीं होती. एके दिवशीं रात्रीं चातरजी घरीं येऊन पहातो तों आपली बायको व धाकटी मुलगी घरांत नाहींत असें त्यास आढळून आलें. चौकशी अंतीं आपली बायको, तिचा भाऊ व तिच्या दोन मुलगी तेथें न राहतां मेव्हण्या बरोबर परत आली असें त्यास समजलें. चातरजी हा बायकोस व मुलीस परत आणण्याकरितां मिस लिन्टन चे बंगल्यावर गेला असतां त्याच्या बायकोनें आपण येत नाहीं व मुलीसही पाठवीत नाहीं असें स्पष्ट सांगितलें चातरजीनें आतां आपली बायको व मुलगी आपल्या ताब्यांत मिळण्याबद्दल माजिस्ट्रेटपुढें फिर्याद मांडली आहे. ह्या फिर्यादीचा निकाल कांहीं ही होवो. तथापि झनाना मिशनरीकडून आपल्या स्त्रियांस शिक्षण देवविल्यास कशा प्रकारचा अनर्थ होण्याचा संभव आहे हें ह्या उदाहरणावरून चांगलें व्यक्त होत आहे. न्या. सु.

मद्रास येथें एका गोऱ्या सोल्जरानें एक बदमाषगिरी केली. तेथील एका युरोपियन बाईचें या सोल्जराच्याच पलटणींतील एकाशीं लग्न व्हावयाचें ठरलें होतें. तें यांस पसंत नव्हतें तेव्हां दोघांचाही सूड घेण्याकरितां त्यानें पुढील युक्ति योजिली. एके दिवशीं रात्रीं तो त्या बाईच्या घरीं साधा पोशाक करून गेला व तीस ह्मणाला कीं, मी सिव्हिल अधिकारी आहे आपलें लग्न ज्याच्या बरोबर व्हावयाचें आहे तो इस्पितळांत फार आजारी होऊन पडला असल्यामुळें आपल्यास त्यानें बोलाविलें आहे. बाईस तें सर्व खरें वाटून ती निःशंकपणें त्याच्या बरोबर बाहेर पडली, थोड्या अंतरावरील एका अंधाऱ्या रस्त्यांत तीं दोघें गेल्यावर त्यानें तीस मारण्याचा प्रयत्न केला परंतु मोठ्या शिताफीनें त्याच्या हातून ती निसटून गेली. दी. बं.

प्रतापगडा नजीक वाडेगांव आहे त्या नजीकच्या एका खेडेगावच्या महारवाड्यावर डोंगराचा कडा सुटून फस्त झाला पैकीं एक महार जिवंत राहिला अशी बातमी आली आहे.

करकी नदीस महापूर येऊन सगळा सरईकला गांव पाण्यांत बुडून गेला, सुमारें ३०० घरें वाहून पुष्कळ माणसें व गुरेंही ठार झालीं. घरांरहित झालेले लोक फार हालांत आहेत.

येत्या तीन वर्षांत हिंदुस्थानांत नवीन रेलवे करण्याकडे २७ कोट रुपये खर्च होणार!

चितागंजच्या शेजारी भोत्ये सांपडण्याचें एक ठिकाण सांपडलें आहे व तें ठिकाण मालाचीच्या जमीनदाराचें आहे कीं काय याचा बंगाल सरकार तपास करीत आहे.

मंडाले पासून मुलतान पर्यंत २२४ मैल लांबीचीं रलवे करण्यास १८३ लाख रुपये खर्च करण्याची स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली.

मंडाले पासून १०० कोसांवर वास नावाचे लोक असून ते फार त्रास देत असल्या मुळें येत्या हिवाळ्यांत हिंदुस्थान सरकारची कांहीं तोफांसह दोन हजार फौज त्यांच्यावर चाल करून जाणार आहे असें सांगतात.

बाइस्नो जातीच्या एका हिंदु बंगाली बाईचे केंस गुडघ्या पर्यंत लांब असून ती हल्लीं हुगळी येथें आहे.

एका माणसानें ५०० रुपये कर्ज काढून सावकारास गहाणखत लिहून दिलें व फेडीचा एकादा हप्ता चुकल्यास दर रुपयास दरमहा ४ आणे प्रमाणें व्याज देईन असा त्यांत करार केला. दुर्दैवानें हा हप्ता चुकला. अर्थात दरमहा दर रुपयास ४ आणे व्याज याप्रमाणें सावकारानें फिर्याद केली व कोर्टानें ५०० रुपये मुदला बद्दल २,००० रुपयांचा हुकुमनामा केला असें कलकत्ता हाय कोर्टातल्या एका अपिलांत बाहेर आलें आहे.

क्रीट बेटांतला बंडावा बंडावा वाढत असून लढायाही चालूच आहेत.

युरोपाच्या पूर्व भागांत लढाईचीं चिन्हें दिसूं लागलीं असून त्यावरून युरोपांतली शांतता कायम राहावयाची भीति वाटत आहे; आणि अयोग्य राजव्यवस्थेबद्दल प्रायःश्चित भोगावें लागेल असें जरी टर्कीस सांगण्यांत आलें आहे तरी टर्कीस शासन करण्यास एकट्या इंग्लंडानें पुढें सरणें चांगलें नाहीं. आणि बडे राजे ही लढाई होण्याचें टाळतील तर बरें होईल असें गेल्या रविवारीं लार्ड सालिसबरी यांणीं एक ठिकाणीं बोलून दाखविलें.

घोड्या बैलाशिवाय चालणाऱ्या ज्या दोन चाकाच्या गाड्या आलीकडे निघाल्या आहेत त्यांच्या योगानें कोणत्या मालाच्या व्यापाऱ्यांस किती धक्का बसला याचे हे पुढील आकडे एकें ठिकाणीं प्रसिद्ध झाले आहेत:- घोडे शिकविणारांचें ९,००,००,००० रुपयांचें नुकसान झालें; चाकें करणारांचें ३,००,००,००० रु० चें; खोगीर विकणारांचें २,००,००,००० रु. चें; बाजाच्या पेट्यांचें २७०००००० चें, जवाहिऱ्यांचें १६०००००० चें, घड्याळें ८०,००,००० चें; चिरुट वाल्यांचें १,४०,००,००० चें शिंप्यांचें २०००००० चें; रेलवेचें ६०,०८,००० चें; दारू कलालांचें ५०,००,००० चें, वगैरे;

एलजिन प्रांतांत फारसे नावाच्या शहरा जवळ ४ फूट संचौरस व २१ फूट लांब असा एक एकसंधी कडक्या दगडाचा एक घडीव दगड आहे आणि तो सुंदर रीतीनें व कुशलतेनें घडलेला असून त्याच्या एका अंगावर घोड्यांवर बसलेल्या स्वारांची वगैरे चित्रें खोदलेलीं आहेत हा कधीं कोणी तयार केला व त्यावरील तीं चित्रें कशाचीं दर्शक आहेत याचा अजून नक्की असा कांहीं इतिहास कळत नाहीं, तरी १,००० वर्षांपूर्वीं ह्मणजे ९ व्या शतकांत तयार झालेला असावा असें शोधकांचें अनुमान आहे.

मासेडोनियांतल्या लोकांनीं ६० ख्रिस्ती माणसांची कत्तल केली. या ६० त बहुतेक स्त्रिया व मुलेंच होतीं.

विलायतच्या राणीवर कडक टीका केल्याबद्दल इजिप्त देशांतील दोन वर्तमानपत्रें बंद करण्यांत आलीं.

सिरामपूरच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं तेथील मुसलमानांच्या धर्मकृत्यांच्या बाबतींत कांहीं नियम केले. तेथील मुसलमानांत ते नापसंत झाल्यामुळें त्याणीं बंगाल सरकाराकडे अपील केलें. सरकारानें खालच्या अधिकाऱ्यांचे नियम कायम करून अपील रद्द केलें.

गेल्या जून महिन्यांत हिंदुस्थानांत जितकी चांदी आली त्याहून १८ लाखांची जास्त इतकी बाहेर आली. ठा अ.

लांडग्यांचा हल्ला—पुण्या जवळील वालटी गांवांत ८ जांगळी मेंढरें राखींत असतां लांडग्याची एक टोळी येऊन त्यांनीं त्यातील ६ जखमी केलीं आहेत असें समजतें.

मि० कावसजी बादशहा वायव्य प्रांताचे पोष्टमास्तर जनरल ह्यांस हिंदुस्थानच्या पोष्ट खात्याकडील डे० डायरेक्टर जनरल नेमिलें.

सोन्याचा भाव—मुंबई २१ अगष्ट- इंग्लिश लगड २७८३; मुंबई गांवठी २६८६; गिनी १७०२ चांदी ९३.

लाहोर येथें शुद्धि सभा स्थापन झाल्यास २॥ वर्षें झालीं. सदर मुदतींत परधर्मांत गेलेले एकंदर २०९ हिंदु तिनें स्वधर्मांत घेतले.

भजन भोंवले-बागलकोट तालुक्यांत तालीकोट येथें लिंगायतांचा भजन सप्ताह झाला. त्याला गेलेल्या मंडळी पैकीं चारशें लोक पटकीनें मेले असें समजतें ! !

कारकुनावर संक्रांत--मद्रासेतील सेक्रेटरीएट मध्यें व दुसऱ्या खात्यांत टाईपरायटरची यंत्रे दिल्यामुळें व एक यंत्र ३ कारकुनाचें काम करते यामुळें, नकला काढणारे क्लार्क एक तृतीयांश कमी करावे असा हुकूम मद्रास सरकारानें केल्याचें समजतें. कांहीं दिवसांनीं ही पिडा इकडेही यईल.

कराची येथें गेले रविवारी पुनः अतिवृष्टी होऊन पूर आले व फार नुकसान झालें. एका दिवसांत तेथें ८ इंच पाऊस पडला. स. शो.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वासुदेव खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.